
आपले
आभाळ
पेलताना
शैला लोहिया

# आपले आभाळ पेलताना

शैला लोहिया

मानवलोक समाज विज्ञान महाविद्यालय
ग्रंथालय
अंबाजोगाई-४३१५१७, जि. बीड

**आपले आभाळ पेलताना**
शैला लोहिया

808.83 L04

**साकेत प्रकाशन**
क्रमांक - ६६८

आवृत्ती पहिली १९९७

© शैला लोहिया
विद्या नगरी, अंबाजोगाई
जि. बीड

**प्रकाशक :**
2249
बाबा भांड
साकेत प्रकाशन प्रा. लि.
११५, म. गांधीनगर, स्टेशनरोड
औरंगाबाद - ४३१ ००५

ग्रंथालय

**मुद्रक :**
प्रिन्टवेल
एम. आय. डी. सी. चिकलठाणा
औरंगाबाद

**मुखपृष्ठ :**
विकास जोशी

**किंमत :** ७० रुपये

*आपल्या माथ्यावरचे आभाळ*
*आपणच पेलताना*
*दगडकाट्यांच्या जखमा झेलत*
*समर्थपणे पायाखालची*
*जमीन शोधणाऱ्या*
*माझ्या लाख लाख मैत्रिणींना.....*

- शैला लोहिया

# प्रस्तावना

सामाजिक प्रश्नांविषयी उभ्या रहाणाऱ्या चळवळींमध्ये; विचारव्यूह, अनुभव आणि संस्थात्मक कार्य यांचे नेमके नाते काय असावे ? प्राथमिकता आणि अग्रक्रम कशाला द्यावा? असे प्रश्न सतत पुढे उभे राहतात. कोणत्याही तीव्र सामाजिक प्रश्न हाताळणाऱ्या चळवळीत अभ्यास आणि प्रत्यक्ष कार्यक्रमाचा मेळ कसा घालायचा? दूर पल्ल्याचा विचार आणि तातडीचे प्रश्न या दोन्हीचा आवाका पेलणारी कार्यपध्दती कशी निर्माण करायची हे निर्णय सोपे नसतात. चळवळ करणाऱ्या कार्यकर्त्यांना काहीवेळा दैनंदिन कामाला बांधून ठेवणारे संस्थात्मक काम नकोसे वाटते. पण ज्यांचे प्रश्न असतात त्यांना संस्थांचा आधार हवासा वाटतो. संस्था उभारणीचा आधार खरे तर कार्यकर्त्यांनाही होतो. पण त्यांचे भय वा शंकाही निराधार नसतात. कारण संस्थात्मक कामामध्ये काहीवेळा कार्यकर्त्यांचे प्रशासक होतात- चळवळीतील विचारांची धार कमी होते, असेही होते. शेवटी प्रत्येक प्रश्नांभोवती भ्या रहाणाऱ्या चळवळीत परिणामकारकतेचाही मुद्दा महत्त्वाचा, निर्णय अनेकदा त्या अंगाने घेतले जातात.

आज ही चर्चा करण्याचे कारण माझ्यासमोर प्रा. शैला लोहिया यांच्या ग्रंथाचे हस्तलिखित आहे. शैलाताई आणि त्यांचे पती डॉ. व्दारकानाथ लोहिया अनेकवर्षे आंबेजोगाई येथे कार्य करीत आहेत. ग्रामीण भागात कार्य करताना एकक्लमी कार्यक्रम आखता येत नाहीत या जाणिवेने 'मानवलोक' 'दिलासा' 'मनस्विनी प्रकल्प' आणि गांवागांवातील शेतीपाण्याचे प्रकल्प असे त्यांच्या कामाचे स्वरूप आहे. पण या पुस्तकातील लेखांचा संदर्भ आहे तो स्त्रीप्रश्नांचा! वेगवेगळया कारणाने डोक्यावरचे छप्पर गेलेल्या स्त्रियांना 'दिलासा' त आश्रय मिळतो. ही येणारी प्रत्येक मुलगी-बाई म्हणजे एक कथाच असते. या विविध मुलींच्या ज्या वेगवेगळया समस्यांनी त्यांना 'दिलासा'त आणले त्या या लेखांमधून शैलाताईंनी मांडलेल्या आहेत.

महाराष्ट्रात वीसतीसच्या दशकात स्त्रीप्रश्नांविषयीची जागृती, हिंगणे स्त्री संस्थेतून संस्कार घेऊन बाहेर पडलेल्या असंख्य कार्यकत्यांचे संस्थाकारण यातून लेखन झालेले आहे. ठळकपणे लक्षात येण्याजोगी श्रीमती मालतीबाई बेडेकर, श्रीमती कृष्णाबाई मोटे, श्रीमती शांताताई निसळ, श्रीमती शशिकला जाधव अशा लेखिकांनी संस्थेकडे येणाऱ्या स्त्रियांच्या कहाण्या लिहिलेल्या आहेत. समाजशास्त्राच्या अभ्यासात ज्याला 'केस स्टडी' म्हणतात त्याला आपण 'विशिष्ट प्रकरण' म्हणू आणि असे करतांना प्रकरण शब्दाला असणारे कुत्सित अस्तर काढून टाकू. कोणत्याही अभ्यासात सूक्ष्म (Micro) आणि बृहत्

(Macro) या दोन्ही स्तरांचा परस्पर अन्वय लावून पाहावे लागते.

विशिष्ट काळातील स्त्रियांच्या समस्याचा वा ग्रामीण महिलांच्या समस्या असा कोणताही कालसापेक्ष वा परिसर सापेक्ष छेद घेतला तरी त्याच्या गाभ्यात विशिष्ट प्रकरणे आणि त्यात्या प्रकरणातील विशिष्टता असते. शिवाय शैलाताईंसारख्या कार्यकर्त्यां त्या संस्थांमध्ये काम करतात त्या संस्थांमध्ये येणाऱ्या मुलींचे माणूस म्हणून- व्यक्ति म्हणूनही काही प्रश्न असतात. नोकरशाहीच्या काटेकोर चौकटीत न अडकता कार्यकर्त्यांला येणाऱ्या मुलीशी संवाद साधावा लागतो. परिस्थितीने झोडपलेल्या अशा एखाद्या व्यक्तीशी वागताना संयम आणि सहानुभूती असावी लागते. पण केवळ भाबड्या मायेत वाहून न जाता, येणारे नवे माणूस खरे बोलते आहे का? तेही पारखून पहावे लागते. खंबीर राहूनही नैतिक वडिलपणाचा चष्मा चढवून चालत नाही. शैलाताईंनी या संग्रहातल्या लेखात प्रत्येक प्रकरणाच्या विशिष्टतेला स्थान दिले आहे. काहीवेळा विशिष्ट मुलगी संस्थेतून बाहेर जाते त्यावेळी तिच्या पुढच्या आयुष्याची दिशा मान्य करतात.

हे लेख आपण वाचक म्हणून वाचाल, तेव्हा त्यातल्या एकेक्का लेखाविषयी मी काहीच लिहित नाही. पण हे सारेच लेख वाचताना माझ्या मनात ज्या प्रतिक्रिया उमटल्या त्याविषयी लिहिते. वाचकांनाही त्यांच्या प्रतिक्रिया पडताळून पहाता येतील,घर कुटुंब हे स्त्रीच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक आहे असे नेहमी म्हटले जाते. पण हेच घरकुटुंब तिला गरज असेल तेव्हा आधार देत नाहीच. किंबहुना सतत त्या आधाराची किंमत मागते. मग ते घर वडिलांचे असो वा नवऱ्याचे-सासऱ्याचे असो. म्हणून तर दिलासा घराची वा परदेशातील `Home for Battered Women' ची गरज भासते. काहीवेळा अशा प्रश्नांची चर्चा करू लागलो की समाजातील समंजस(?) चेहरा असणारे म्हणतात "असो या तर जुन्या गोष्टी........" हे खरं नाही हे आपल्याला शैलाताईंच्या अनुभवातून लक्षात येईल. पाचवर्षापूर्वी निघालेल्या परित्यक्तांच्या मोर्चातील सर्वात धाकटी सात वर्षाची होती आणि औरंगाबादला आयोजित केलेल्या परित्यक्ता परिषदेला इतकी गर्दी झाली की व्यवस्था कोलमडून पडली हे वास्तव आहे.

या साऱ्या कहाण्यांच्या मुळाशी काय आहे याचा विचार केला तर लक्षात येईल की अज्ञान, दारिद्र्य, अंधश्रध्दा, जातीयता यांचा गुंता आहे. माणूस म्हणून जगण्यासाठी लागणारी किमान आर्थिक सांस्कृतिक सामुग्री नाही. मात्र जातीयता- अंधश्रध्दा यांनी दिलेले सांस्कृतिक अहंकार आहेत - गळ्याला आंवळलेला दैववादाचा फास आहे! कोणत्याही नाडलेल्या वर्गाचा आपण विचार करतो तेव्हा त्यातील प्रत्येक व्यक्ती गुणवान आहे, बिनचूक आहे असा आपला दावा नसतोच मुळी. पण प्रश्न विचारणारे अनेक विशेषतः स्त्रियांच्या संदर्भात त्यांना 'तसल्याच' गटात ढकलण्याचा प्रयत्न करतात. या लेखसंग्रहात शैलाताईंनी या मुलींवर होणाऱ्या अन्यायांची नोंद जशी केली आहे तशीच त्यांच्या तरूण

या मुलींवर होणाऱ्या अन्यायांची नोंद जशी केली आहे तशीच त्यांच्या तरूण ननादेहाच्या हेलकाव्यांची सुजाण दखल घेतली आहे.

अभावग्रस्त घरातील तारूण्य ही अत्यंत केविलवाणी वस्तुस्थिती आहे. घरातले कळंजलेले वातावरण, आजार दारिद्रयाने गांजलेल्या वडिलधाऱ्यांचे एकमेकातले ताणतणाव या वातावरणात देशाच्या तारूण्याच्या जाणीवेने फुलणारे मन घराबाहेर वाट शोधू पहाते. व्यक्तिमत्त्व फुलविण्याचे शिक्षणासारखे वा कलेसारखे कोणतेच सांस्कृतिक मार्ग खुले नसतात, तेव्हा आपोआप पुरूषस्पर्श हीच आपल्या अस्तित्वाची एकमेव दाद मानणाऱ्या या मुली भरकटत जातात. त्यांच्या आयुष्यातील किमान अपेक्षांची फार मोठी किंमत त्यांना द्यावी लागते. या काहाण्या एकेका मुली-बाईच्या असल्या तरी या लेखसंग्रहात नकळत एक समाजपट उलगडत जातो. कामापाठोपाठ फिरणारा समाज, मध्यमवर्गीय वस्तीच्या कडेकडेला राहून रोजगार करणारा समाज, अज्ञानापोटी अंधश्रध्देने गांजलेला समाज यानध्ये दिसतो. पुरूषत्ताक समाजाची अरेरावी, बाइला वस्तू म्हणून वापरताना मनात शंकाही न येणे दिसते. तसेच बाईचे अप्रश्न पिचत रहाणे दिसते.

रहाणीमानाचा गुणस्तर उंचावण्याची चर्चा आपण समित्यांच्या पातळीवर सतत करत असताना प्राणीपातळीवरचे जगणेही बाईसाठी अवघड होताना दिसते. हे सारे या लेखांमधून मांडले गेले आहे. प्रारंभी म्हटल्याप्रमाणे कुटुंब या सामाजिक संस्थेच्या मर्यादा जाणवतात. या कुटुंबाचे लोकशाहीकरण झाले पाहिजे. हेही जाणवते. पण संस्था हे सुध्दा एक विस्तारीत कुटुंबच! त्यामुळे याप्रकारच्या संस्था चालवताना येणारे प्रश्न, कार्याच्या परिणामकारकतेच्या दृष्टिकोनातून त्यात होऊ शकणारे बदल याचीही चर्चा झाली असती तर उपयुक्त ठरले असते. शैलाताईंच्या पुढील लेखनात ते येईल अशी अशा आहे.

हा लेखसंग्रह वाचताना 'स्त्रीप्रश्न' अलग बेटावर ठेवून विचार करता येत नाही हेही जाणवते. समाजाचा समग्र विचार केल्याशिवाय, जगण्याच्या पोताचा विचार केल्याशिवाय स्त्रीच्या सन्मानाने जगण्याचे प्रश्न उमजत नाही. म्हणून तर 'विशिष्ट प्रकरण' समजावून घेताघेता बृहत् प्रश्नाकडे जायला हवे.

या प्रस्तावनेच्या निमित्ताने शैला लोहिया यांना त्यांच्या पुढील लेखनासाठी आणि 'दिलासा' मधील कार्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा!

**- पुष्पा भावे**

# हरेक वेदनेचा रंग वेगळा

स्त्रीच्या असहायतेचे रूप अनेक रंगी नि अनेक तऱ्हेचे असते. शोभादर्शक यंत्राला जरासा धक्का लागला की आतली आकृती अगदी नवे रूप घेते. जे यापूर्वीही नव्हते नि पुढेही नसेल असे. अगदी तसेच बाईंच्या 'बाईपणा' तून येणाऱ्या दुःखाचे, वेदनेचे, असहायतेचे रूप आहे. प्रत्येक प्रश्नाचा पोत वेगळा नि रंगही वेगळा.

मला आठवते तशी ही अनेक विविध रूपे माझ्या मनावर नकळत गोंदली गेली..... मीरा सारळकर, सुरेल आवाजात गाणारी. तिच्या गाण्याचा केवढा दिमाख असायचा, वार्षिक स्नेहसंमेलनात आमचे गायनाचे सर मोठ्या अभिमानाने तिला तबल्याची साथ करायचे. जणू त्यांची नजर म्हणत असायची, पाहा कशी तयार केलीय मी ही शिष्या. पण तिचे लग्न ठरले ते एका गावातल्या औरंगजेबाशी. तिचा तंबोरा माहेरी धूळ खात पडलाय. आणि ती ? तिच्या 'साहेबांच्या' प्रचंड घरातल्या शो-पीससारखी, सूर हरवून जगतेय, आणि शकू ? आम्ही मॅट्रिकला असतानाच तिचे लग्न ठरले. मार्चमध्ये परीक्षा नि लग्नाचा मुहूर्त फेब्रुवारीत. शकू गणित आणि सायन्स मध्ये भलती पक्की. जणू जिभेवर आकडे नाचायचे आणि केमेस्ट्रीतील तापदायक समीकरणंही ! पण 'आपले लग्न थोडे पुढे ढकला' असे सांगण्याची हिंमत ती कुठून आणणार? गेली पस्तीस वर्षे ती उसने हसू ओठांवर घोळवीत आणि पक्क्या गणिताच्या विलक्षण गोड कथा आपल्या मुला-नातवांना सांगत सुव्यवस्थितपणे संसार करतेय.

मला नेहमी प्रश्न पडतो. अशा लाखो स्त्रियांच्या फुलण्याआधीच कोमावलेल्या गुणांचा, कलाशक्तिचा, बुध्दिमत्तेचा साठा किती मोठा असेल बरं? त्याचा स्फोट कधीच होणार नाही का?

खरे तर आम्ही स्वतःसुध्दा स्वतःला मुरड घालतच जगत असतो! आमच्या शिबिरात आम्ही एकदा चर्चा केली. ती अशी, की आपल्याला स्वतःलाही आपल्याच पतिराजांकडून कशी अन्यायकारक वागणूक मिळते. सुरुवातीला सगळ्याजणी जरा बोलायला बिचकतात. पण एकदा का मात्र झाकणे उघडली गेली नि ----

एकीने सांगितलेले असे-

आपले पुरोगामी म्हणवणारे पतिराजसुद्धा कधी कधी विचित्र वागतात. एकदा आमच्या शेतातला सालदार ह्यांच्याशी बोलत होता. दोघांचेही आवाज थोडे चढले. सालदाराने सकाळीच माझ्या कानावर त्याची अडचण सांगितली होती. म्हणून मी बाहेर येऊन त्यांना समजावू लागले तर त्यांनी चढ्ढ आवाज चढवला. बाहेर का आलीस तू? बायकांचं काय काम आहे इथं? आम्ही आमचं पाहून घेऊ. तू पहिले आत जा. वाटलं, माझ्यावर वीज पडतेय. पण गप्प बसले नि आत गेले. आत माझी कॉलेजला जाणारी मुलगी होती. तिचेच डोळे भरून आले होते. माझा हात हातात घेऊन ती म्हणाली, "कभी कभी पिताजी कितना अन्याय करते है तुमपर! माँ ! कैसे सहेती है तू ?" हा झाला एका उच्च विद्याविभूषित कार्यकर्तीचा अनुभव. तर, दुसरा आमच्या सयाबाईचा.ती म्हणाली, आमी मांग हाव. आमच्यात पुरुष बायकोला मारतातच. न्हाय मारलं तर त्याला बाईलवेडा म्हणतात. आमचे मालक बी उगा मारायचे.कारण नाय की काय नाय. मजुराला जशी हप्त्याला हजेरी मिळते ,. तसा मला मार मिळायचा.पन जवापासून ते संवस्थेत काम कराया लागले तवापासना मार बंद झाला. मग मीच इचारलं - आताशा मार न्हाई काई न्हाई. तुमचं मन दुसरीवर तर न्हाई बसलं ? तवा म्हनाले "येडी का काय तू ? बाई बी माणूस हाय. ती काय जनावर हाय? जनावरावर प्रेम करतो आपण. मग कष्टाच्या बायकोला मार कशापायी द्यायचा? " माझ्या नावानं बँकेत पैसे बी ठिवलेत आता त्यांनी.

गेल्या ३० वर्षात कितीतरी जणी मला भेटल्या. त्यांच्या नकळत त्यांचे अनुभव मी माझ्या पदरात भरून घेत होते. त्यातूनच १९८४ साली मानवलोक संचलित ' मनस्विनी महिला प्रकल्पा' चा जन्म झाला.

'मानवलोक' या स्वयंसेवी संस्थेची आधारशिला राष्ट्र सेवादल. विकेंद्रित लोकशाही, समाजवाद, विज्ञान निष्ठा, सर्वधर्मसमभाव, सामाजिक न्याय या तत्त्वांवर श्रद्धा ठेवून राष्ट्रप्रेमाची शिकवण देणाऱ्या, लहान मुलें व तरुण यावर संस्कार करणाऱ्या राष्ट्रसेवा दलाने महाराष्ट्रात हजारो धडपडणारी मुलें निर्माण केली. अनेक घरे सेवादलमय केली. अशाच एका घरात मी वाढले. बाईचे माणूसपण आमच्या घरात स्वयंभूपणे मान्य केलेले होते. राष्ट्रसेवा दलाचे भाऊ रानडे धुळ्याच्या घरी नेहमी येत. लहानपणी

भाऊंबरोबर खेड्यात जायचा योग आला. सभेला एकही बाई नाही. भाऊ म्हणाले, "महिला नसलेल्या सभेत मी बोलणार नाही." मग झाली सुरू चुळबूळ. एखादा तरुण असं काही बोलला असता तर खैर नव्हती. बोलणारा, म्हातारा पांढरे केस नि दाढीवाला. डोळ्यातून नितांत माया वाहणारी. मग कुणीतरी एका वयस्क बाईला, एका आईला आणून बसवले नि सभा सुरू झाली. तर अशा या वातावरणात वाढताना समाजाकडे कुतूहलाने पाहण्याची नजर आपोआप आली. डॉ. द्वारकादास लोहिया १२ व्या वर्षापासून सेवा दल संस्कारांनी भारलेले, घडलेले. पाठीवर मायेचा हात दादांचा उर्फ नारायणराव काळदातेंचा आणि श्री. किंबहुने गुरुजी, ग.धो.देशपांडे या विचारांशी बांधिलकी असणाऱ्या शिक्षकांचा. साथीला जुना सेवा दलाचा संच. नव्या दमाच्या परिवर्तनवादी तरुणांची नवी जोड मिळाली. आणि अशा पारिवारिक वातावरणातूनच 'मानवलोक' आकाराला आले.

संस्था सुरू करतानाच मनाशी खूणगाठ बांधली होती की, एकाने संस्थेसाठी पूर्णवेळ द्यायचा. दुसऱ्याने भाकरीची सोय पाहायची. १९७४ ते ८० पर्यंत हडपसरच्या महाराष्ट्र आरोग्य मंडळाची एक शाखा म्हणून काम केले. या फांदीला नवी पालवी फुटू लागली. आणि १९८२ ला या फांदीतूनच 'मानवलोक' उर्फ मराठवाडा नवनिर्माण लोकायत निर्माण झाले. १९७४ ते ८२ या आठ वर्षात माझे घर मला बांधून ठेवण्याइतके चिमणे राहिले नव्हते. 'मानवलोक' च्या कामात मलाही आस्था होती. हे काम करताना असे लक्षात आले की, भाऊ रानडेंच्या काळातले खेडे अजूनही आहे तसेच होते. स्त्रियांचे जीवन जणू अडथळ्यांची शर्यत. आणि ती त्यांना अगदी नैसर्गिक वाटते. डोंगरभागात काम सुरू केले. तिथे मुलांचे रातांधळेपणाचे प्रमाण ६ टक्के होते. नारू होता, घाण, माशा, डास यांचे थैमान. दरसाली पाच-सहा बायका बाळंतपणात मरत. बाई अडली तर दवाखाना चार कोस दूर. रस्ता नाही. अल्पभूधारकांची संख्या जास्त. दोन-पाच एकर जमीन. तीही कोरडवाहू. पाऊसबाबा धडपणी आला; तर पहिले पीक घेऊन गावातील साठ टक्के माणूस पुण्या-मुंबईकडे वा साखर कारखान्याकडे धाव घेई. मग त्यातून होणारे बायका-मुलांचे हाल.. हे सारे जवळून पाहिले नि मानवलोकने ठरवले की, स्त्रियांच्यासाठी काम सुरू करायचे. ग्रामीण भागातील स्त्रियांचे प्रश्न समजावून घेतल्याशिवाय कामाची आखणी कशी करणार? मग त्याला सुरुवात झाली. प्रत्येक गावात एखादा आड वा डोह असे. ज्यातील आसपास

तरुण सुनांचा बळी घेत. आणि एखादा पिंपळ असे, ज्यावरच्या मुंजाला तरणीताठी बाई बळी म्हणून हवी असे. शिवाय अंगावर चिमणी पडून भाजून मरणाऱ्यांची संख्याही बरीच. हे सारे समजावून घेताना असे मनोमन वाटले की, अडचणीत आलेल्या बाईला 'दिलासा' देणारे घर लाभले तर आसरा नि मुंजाचा जोर थोडा कमी होईल. १९८३ मध्ये पुणे येथे कार्यालय असलेल्या तेरे डे सं होम्स, जर्मनी या संस्थेने निलंग्यात महिला जागृती शिबीर आयोजित केले होते. तिथे माझ्यावर जबाबदारी सोपविली होती ती भारतीय इतिहासातील स्त्री जीवनाचा आढावा घेण्याची. त्यातून या संस्थेशी नाते जुळले. माझ्या मनातली ओढ आणि मानवलोक संस्थेतील शिस्तबद्धता यांची तेरे डे स होम्सच्या विभागीय अधिकाऱ्यांनी दखल घेतली.

आणि आम्ही महिलांसाठी प्रकल्प सुरू करावा असा आग्रह केला. इलग्रीड मेंडोसा, उषा आठल्ये यांच्या सहयोगातून 'मनस्विनी' अवतरली. मी त्या काळात महाभारताने भारलेले होते. इरावती कर्व्यांचे 'युगान्त', दुर्गाबाई भागवतांचे 'व्यासपर्व', आनंद साधल्यांचे 'हा जय नावाचा इतिहास', याचा अभ्यास सुरू होता. आणि त्या प्रवासातच 'मनस्विनी' भेटली. महर्षी व्यासांनी द्रौपदीचे माणूसपण भाविनी, मनस्विनी, अळी कळे या शब्दांतून व्यक्त केले होते. त्या सुमारास स्त्रीच्या देहालाच मोजणाऱ्या समाजाचे चित्र रेखाटणारी 'देहस्विनी' ही माझी कथा 'मेनका' मासिकातून प्रकाशित झाली होती. स्त्रीचे केवळ देहस्विनीपण नाकारण्याचा तो एक प्रयत्न होता, आणि त्यातून 'मनस्विनी' चे ऊर्जस्वल व्यक्तिमत्व मनात साकारले. हे नांव सर्वांनाच भावले, आणि १ एप्रिल १९८४ ला 'मानवलोक' संस्थेचा महिलासाठी काम करणारा विभाग म्हणून 'मनस्विनी महिला प्रकल्प' ची सुरुवात झाली. प्रकल्पाचा आराखडा तयार करणे तसे सोपे नसते. मनातल्या कल्पनांचे पाय जमिनीत नमपणे उभे करायचे असतात. त्यासाठी प्रकल्पाचा हेतू, उद्दिष्टे ती साध्य करण्यासाठी कोणत्या पध्दतींचा स्वीकार करणार या बाबींचा डोळसपणे विचार करावा लागतो. तेही एक शास्त्र आहे. त्या शास्त्राची ओळख करून घेतली.

अडचणीत आलेल्या स्त्रीला अर्ध्या रात्री आधार देणारे 'दिलासा घर' सुरू झाले. महिलांचा प्रतिसाद मिळाला. अवघ्या एका वर्षात लक्षात आले की, दिलासात येणारी बाई लेकूरवाळीही असू शकते. तिच्या मुलांनाही आम्ही दिलासा घरात प्रवेश दिला. 'दिलासा' चे घरपण सुधडपणे सांभाळणाऱ्या

गंगामावशी उर्फ मम्मी बायकांचे माहेरपण करीत. पोरांच्या आजी होत. गेल्या अकरा वर्षात सुमारे २०० हून अधिक महिला दिलासात राहून गेल्या. बहुतेक महिला खेड्यातून येणाऱ्या. अनेकजणी चक्क निरक्षर असत. मग तिथेच त्यांच्यासाठी साक्षरता वर्ग सुरू केला. या महिलांना आर्थिकदृष्ट्या सबल करण्यासाठी, त्यांचे शिक्षण व आवड लक्षात घेऊन प्रशिक्षण देणारा विभाग सुरू केला. त्यात अशिक्षित महिलांना सहजपणे करता येणारे उद्योग शिकविले जात. घायपाताच्या तंतूच्या शोभिवंत आणि गरजेच्या वस्तू करण्याचे प्रशिक्षण देण्यासाठी औरंगाबादहून शिक्षिका बोलावली. शिवणकाम, आरशाचे पारंपारिक भरतकाम, पापड, मसाले इ. चे प्रशिक्षण दिले जाई. मी पुण्या-मुंबईकडे बैठका वा मेळाव्यांना गेले की, चर्चा ऐकू येई. अपारंपारीक उद्योग मुलींना शिकवायला हवेत. किती दिवस माणसांनी लोणच्यात बुडायचे, वगैरे. मनाला ते पटत असे. पण लहान गावात अपारंपारिक उद्योगांना विशेष वाव नसे. आम्हीही प्रयोग केले. सायकलचे पंक्चर काढणे, स्टोव्ह दुरुस्ती, इलेक्ट्रिक फिटिंग, विटेला वीट जोडणारे गवंडीकाम इ. व्यवसाय शिकण्याची मोहीम सुरू केली. कारण आमच्या डोक्यात "बाया माणसाची कामे व गडी माणसाची कामे" यांचे विभाजन फिक्स बसलेले. मग आम्ही एक जोड दिला. तो असा की, शिवण्याच्या कामात स्टोव्ह दुरुस्ती, पंक्चर काढणे, ईलेक्ट्रिक फिटिंग यांचा समावेश केला. मुली हे नवे व्यवसाय उत्साहाने शिकत. स्टोव्ह दुरुस्ती, खडू तयार करणे याचा त्यांना पुढे उपयोग झाला. पण सायकल नि इलेक्ट्रिसिटी यांचे नाते महिलांशी असू शकते याला मान्यता मिळाली नाही. आमची खेडी एखाद्या उत्रवदार शहराजवळ असती तर कदाचित एखाद्या टी.व्ही. वा रेडिओच्या कारखान्यातील जुळणीची कामे बायका करू शकल्या असत्या.

दिलासा घरातील महिलांना सन्मानाने घरी परत जाता यावे, ते शक्य नसल्यास पोटगी व संपत्तीत अधिकार मिळावा या हेतूने मोफत कायदा व कुटुंब सल्ला दिला जाई. दोन वर्षाच्या अनुभवावरून असे लक्षात येते की, अशा तऱ्हेची मदत समाजातील अनेकजणींना हवी असते. कोर्टाची व वकिलाची फी देण्याची ऐपत घरातून हाकलून दिलेल्या बाईला कशी असणार? खेड्यापाड्यातून हिंडताना, बापभावाच्या घरात दिल्या अन्नावर जगणाऱ्या परित्यक्ता भेटत. दिलासा घरात राहायला येणे त्यांच्या बापभावांच्या प्रतिष्ठेला धक्का देणारे असे. ती हिंमत त्या कशी करणार? उलट त्यांचे जगणे अधिक दु:खमय. या अनुभवातून १९८६ च्या जुलैत मोफत

कायदा सल्ला केंद्र उभे राहिले. या केंद्राला मात्र समाजाच्या प्रत्येक थरातून प्रतिसाद मिळाला. दाखल होणाऱ्या प्रत्येक केसचा आम्ही अभ्यास करत असू. केस कोर्टात दाखल करण्यापूर्वी आम्ही सासरच्यांची;नवऱ्याची बाजू ऐकण्याच्या भूमिकेतून त्यांना पत्र पाठवायचे. ५० टक्के लोक प्रतिसाद देत. त्यांच्याशी बोलताना प्रकरणाचा उलगडा होई. शेवटी प्रश्न माणसाचेच. रूढी, परंपरा, धार्मिक रिवाज, संस्कार यांच्यात हरवलेले माणूसपण वर काढण्यात कधी यश येई. मग पुन्हा एकदा पती-पत्नीचे सूर जुळून येत. हे यश न आले, हा ग्रहाचा धूर हटवता आला नाही तर मग कोर्टात जाणे आलेच.

या एकाकी महिलांना केवळ आधार व प्रशिक्षण देण्याइतकेच मानसिक बळ देण्यावर आम्ही भर दिला. तिच्यातील आत्मविश्वास वाढावा; एकट्या स्त्रीलाही जीवनातील सौंदर्य, आनंद अनुभवता येतो याची प्रचीती यावी यासाठी आम्ही विविध उपक्रम आखीत असू. पंचमीचे फेर, ईदमिलापचा महिला मेळा, नवरात्रातील दिपऱ्याचा फेर, उखाण्यांच्या स्पर्धा, नवी गाणी, पथनाट्ये, सहली इ.तून बायका धीट होत. आपले एकटेपणाचे अधुरेपण विसरत, आपण सगळ्याजणी एक आहोत, मैत्रिणी आहोत याची जाणीव त्यांना होई. पाहाता पाहाता कळंब, बीड, माजलगाव, सेलू, केज येथे मोफत कायदा सल्ला केंद्रे सुरू झाली. अर्थात त्या गांवातील गट उत्साही असेल तर केंद्र चांगले चाले. एक केंद्र आम्ही बंद केले. आज पाच केंद्रे सुव्यवस्थितपणे सुरू आहेत. गेल्या नऊ वर्षात सुमारे पाच हजार प्रकरणे नोंदवली गेली. त्यातील अनेकजणी स्वत:चा छोटा व्यवसाय करीत आहेत. बालवाडी शिक्षिका, आरोग्यसेविका म्हणून काम करीत आहेत.

अगदी पहिल्यांदा आलेली कळया कांता भाळ्याच्या बालग्रामची 'सदनमाता' म्हणून काम पाहाते. या संस्थेची स्थापना करण्यात तिची महत्त्वाची भूमिका असल्याने ती कार्यकारिणीची सदस्या आहे. दिलासात आली तेव्हाचा अवतार आजही आठवतो.....धुळीने माखलेले नऊवारी बिनकाठपदराचे लुगडे. उभा आडवा ताठर बांधा, राकट बोलणे. अडूम धुडूम चालणे. "आत मंग? उगा हाय का ह्यो देह? माज्या नोवऱ्यानं पलंगाच्या गजानीनं मारलं. पन म्या हूं की चूं केलं न्हाय. मार म्हणलं, तुझा जीव शांत होइस्तो मार. माज्या सासूलाच कीव आली. तिनंच हितं भैणीकडं आणून घातलं. बाईच बाईचा जीव जाणणार...!!.." हे ती झोकात सांगत असे. कांता दिलासा घरात राहायला आली तेव्हा आपल्याला कोर्टातून न्याय मिळेल,

धुण्याभांड्यापलीकडची नोकरी मिळेल असा विश्वास तिला वाटत नव्हता. दिलासा घरात आल्यापासून जीवनाकडे पाहाण्याचा तिचा दृष्टिकोन बदलत गेला. ती होमगार्ड झाली. तिथे सर्वोत्कृष्ट रक्षक म्हणून ख्याती झाली. कांताला कोर्टातून न्याय मिळाला. ही निर्मळ मनाची. मनमोकळी. परवाच कांताचे स्वतःच्या हस्ताक्षरात पत्र आलेय. ती केवळ साक्षर नाहीतर सुजाण होऊन झाली आहे. कांताच्या नांवाने चार पैसे बँकेत आहेत. मध्यंतरी भेटायला आली तेव्हा कांताला मी सहज म्हटले . "कांता तरुण आहेस. लग्न करायचं काय? त्याची का जाहिरात? तिचे उत्तर असे.

"भाभी, एका कुरकुल्यात शिजलं नाही ते दुसऱ्या कुरकुल्यात शिजेलच याची कोण ग्यारंटी देणार? हाय ती बरी हाय. काय कमी हाय मला? पोटच्याची माय तर कुणीबी होईल पण दुसऱ्याच्या लेकराची माय. होनबी महत्वाचं असतंच की !! " या कांता कुंभारणीने जे शहाणपण शिकविले ते कोणता वेद शिकवील?

अशा अनेक कांता, लता, भागिरथी, शांता, सत्यशीला, पंचफुला, मंगला, सुलताना, ग्रेस.... अनेकजणी.

हातात सहा महिन्याची प्रीती नि एक जुनकट पर्स. एवढं च सामान.

" ताई मी ग्रॅज्युएट आहे. मला एम.ए. करायचं " एवढ च बड बडणारी सुधा . एका मध्यमवर्गीय शिक्षित घरात जन्माला आलेली सुधा एका विज्ञान विषयाच्या प्राध्यापकाची पत्नी आहे. पाठोपाठ चार मुलींना जन्म दिला हाच तिचा दोष. सततची मारहाण. माहेरी होणारी कुचंबणा. यामुळे तिचे मन जणू बधिरले होते. प्राध्यापकाशी सततचा संपर्क साधल्यानंतर महोदय संस्थेत आले. गृहस्थ स्वभावाने गरीब. त्यांच्या काही तक्रारी होत्या. सुधा गबाळी राहाते, मुलींना स्वच्छ ठेवत नाही, जेवणात केस निघतात, मुलींच्या

अभ्यासाकडे लक्ष देत नाही...वगैरे, वगैरे. पण दोघांच्याही तक्रारी एवढ्या भयानक नव्हत्या. मारहाण होत नव्हती. पण शिव्या दिल्या जात हेही दोघांनी कबूल केले. मुलींच्या भवितव्याचा विचार उभयतांनी केला. गेल्या नऊ वर्षापासून सुधा संसार करते आहे. कदाचित ती खूप सुखात नसेलही. पण तिने आणि नवऱ्याने त्यांचे तडकलेले घर सांधण्यासाठी, स्वतःचे काही

आग्रह सोडले आहेत.

"…. माझ्या मामाला इथल्या मोठ्या दवाखान्यात ठेवलं होतं. त्याच्या जवळ कोणीतरी हवं म्हणून मला हितं ठेवलं, माज्या बापानी. तेबी यायचे रोज संध्याकाळी.मी कपडे धुवाया जवळच्या तळ्यावर रोज जायची. तिथच ती बाई भेटली मला. म्हणाली, तू तरणीताठी पोर,इथं कशाला धुणं धुतीस.माज्या घरी चल.तिथंच आंघूळ करीत जा नि कपडे बी धूत जा. बकूळ पानी हाय. मला बरी वाटली बाई, बामणासारखं राहणं नि बोलणं.मग जायला लागले तिथे.जेवू बी लागले.कंदी कंदी मुक्काम पन करू लागले. बापाला सांगितलं की चांगली मावशी भेटलीय.लयी माया करायची माझ्यावर.तिनंच माझ्या केसांची सागरवेणी घालायला शिकवली.मॅक्सी शिवली.पंजाबी ड्रेस घेतला.एक दिवस मामाकडे गेलेच न्हाई.बाईजीकडेच राहिले. तिथे रात्री तरुण पोरं येत.मजा करत.व्हिडिओ बघत.चार पाच पोरी पन येत. एक दिवस मी बी ,एका पोरासंग खोलीत गेले.बाहेरून बायजीनं दार लावून घेतलं…" ती गुलाबी रंगाच्या पंजाबी ड्रेसमधली नखरेल मुलगी बोलत होती.मी सुन्न होऊन ऐकत होते. पोलिस अधिकाऱ्यांनी तिची त्या घरातून सुटका केली होती.कांही कार्यवाही न्यायालयातून व्हायची असल्याने व इथे महिलांसाठी कस्टडी नसल्याने तिला दोन दिवस 'दिलासा' त ठेवले.पण त्या दोन दिवसात लक्षात आले की ती पंधराच्या उंबरठ्यावरची पोर गळ्यागत बुडली होती.वैद्यकीय तपासणीतून लक्षात आले की नको ते रोगही जडले असावेत. दोन दिवसात इथे खूप रमली. बापाचा पत्ता देऊन म्हणाली की, त्याना बोलवा.पहावसं वाटतंय. पोलीस नियमानुसार तिला औरंगाबादला घेऊन गेले. सुधारगृहात ठेवले.पण एक दिवस बाई दिलासात हजर.तिला आमच्याजवळ राहायचे होते.पण ती चार दिवसापेक्षा एक दिवसही इथे राहू शकली नाही.संध्याकाळ झाली की तिचे डोळे लकाकू लागत.तरुण्या पोरांच्या फेऱ्या आसपास वाढल्या.इथली शिस्त तिला मानवेना.शेवटी तिची रवानगी परत पोलिस स्टेशनमध्ये केली.आणि मनाची एक खिडकी बंद करून घेतली.नंतर चारच दिवसांनी तिचे वयस्क वडील काठी टेकीत संस्थेत आले.ही त्याची सर्वात धाकटी लेक. आई तान्हेपणीच वारली.अति लाडामुळे शाळेत गेली नाही. घरात भाऊ-भावजया. घरी काम नाही की अभ्यास नाही.वाढत्या वयात मायेची पाखर न मिळाल्याने ती बेफाम बनत गेली.मामाच्या आजारपणाच्या निमित्ताने शहरात आली, तिथून पळून गेली. . .

"बाई, तुमचं काम मिळालं. वाटलं लेकरू डोळ्यांनी बघावं. ती काई वळणावर येण्यातली राहिली नाही. तिच्या भावांना न सांगता आलोय. मी पण भेट नासिबात नाही. चिमणीचं पिल्लू घरट्यातून खाली पडलं की त्याला पुन्हा घरट्यात घेत नाहीत..." बोलता बोलता म्हाताऱ्याचा आवाज घुसमटून गेला.

अनेकजणी आल्या. पण या पोरीची आत ताण झाली की मन आतल्या आत चिरत जातं. आपल्या मर्यादा खुपायला लागतात.

हे काम खूपदा चटके ही देते. आपल्या आसपासची, सहकारी जनांच्या घरची प्रकरणे हाताळतांना जवळच्यांची नाराजी पत्करावी लागते. द्वेषही सहन करावा लागतो. घरच्या मुलांना, कार्यकर्त्या मुलींना त्रास सहन करावा लागतो. पण या पोचत्या उन्हातही एक हलकीशी सरही सरसरून जाते. जेव्हा ती मदत केलेली महिला चोरून भेटते नि हात घट्ट धरून सांगते, "ताई, लई उपकार वाटून घेतलेत हो. माज्या लेकरासाठी जिवंत राहायचं बळ दिलंत." अशा प्रसंगातून कर्ते सुधारक आणि बोलके सुधारक यांचेही दर्शन घडते.

शांता तीन मुलांची आई. लोकसत्तेतील मधुवंती सप्रेंचा लेख वाचून, तिचे पोस्टातील बंधू संस्थेत आले. तिच्या दोनही मुलांची जबाबदारी त्यांनी स्वीकारली. शांता शिवणकाम, खडू, निर्धूर चुली बनविण्याचे तंत्र शिकली. इंग्रजीचा अभ्यास मन लावून करी. ती आज स्वतःच्या पायावर सन्मानाने उभी आहे. मुलंही मोठी झाली आहेत. पण तिने टाकलेला प्रश्न अजूनही सतावतो.

.... ताई, नवऱ्याला जशी बायको लागते, तसा बाईलाही नवरा हवासा वाटतोच की. तुमीच म्हणता ना की बाई माणूस आहे. ?... - या प्रश्नासाठी कोणते उत्तर आहे आमच्याकडे ?

हरिणीच्या डोळ्यांची, आदबशीर वागणारी वंदना अवघी पंचविशीतील पोर. दोन मुलग्यांची आई. अठरा हजार हुंडा नि दोहो अंगानी खर्च देऊन हिचे लग्न भरपूर पाणथळाची शेती असलेल्या अडाणी पाणथळाशी लाऊन दिले. दीर इंजिनिअर, सरकारी नोकर. शेतीत कष्ट करणार हिचा नवरा आणि माल विकणार दीर. हिने एका वहीत हिशेब ठेवला. तो असा. दोनशे पोती हायब्रीड, पन्नास पोती तूर, चाळीस क्विंटल कापूस... आणि किंमत? दादांना

माहीत. ही वही दिराच्या हाती पडली.आणि तिची रवानगी माहेरी झाली. सहा महिने झाले तरी न्यायला कोणी आले नाही म्हणून ही सासरी आली पण तिला घरात घेतले नाही.बारा दिवस रस्त्यावर नि शेजारच्या ओट्यावर काढले. 'भूमिकन्या मंडळा' च्या बैठकीस ती आली असल्याने संस्थेत आपणहून आली. आज जेवणाच्या डब्यांचा व्यवसाय करणारी वंदना स्वयंसिध्दपणे उभी आहे. दोन खोल्यांच्या स्वत:च्या घरात सन्मानाने राहाते आहे. ती गोकुळला वकील करणार आहे नि अर्जुनला भ्रष्टाचार न करणारा इंजिनिअर बनवायचे आहे. कमल आपल्या अपंग अंगदला बारावीनंतर दुकान घालून देणार आहे. शालन् आपल्या मनीषाला नर्सिंगला घालणार होती पण चांगला मुलगा सांगून आला. त्याने बारावी पास झालेल्या मनीला मागणी घातली. पुढे शिकवणार आहे. शालनची बालवाडी सुरू आहे.

...अशा या अनेकजणी. अवघ्या पंचविशीत आयुष्याचे धिंडवडे होतांना आतल्या आंत करपणाऱ्या. पण त्यांच्या मनांतही इवलीशी स्वप्ने आहेत. आपली स्वप्ने साकार करण्याची उमेद त्यांना देण्याची शक्ति आहे समाजाजवळ? किंवा संस्थेजवळ?...

शारदाच्या नवऱ्याने पत्नीला स्वत:च्या व्यसनासाठी बाजारात बसविण्याचा प्रयत्न केला. सातवीपर्यंत शिकलेली शारदा नवऱ्याने पाठविलेल्या गिऱ्हाईकाची शिकार बनली.पण दुसऱ्या क्षणी तिथून माहेरी निघून गेली. माहेरी तरी कोण होतं? विधवा आई. मग सहा महिने 'दिलासा'त होती. शारदाचा नवरा दारू प्यायला की पशू होत असे. शुध्दीवर असतांना मात्र शारदावर खूप प्रेम केले होते. त्या प्रेमाच्या आठवणी ती विसरू शकत नव्हती. भावाच्या,आईच्या रेट्यामुळे ती कोर्टात गेली. कोर्टातून काडीमोड घेतला. पण तरीही मन त्याच्यातच घुटमळत होतं. ती प्रौढ साक्षरता वर्गाची शिक्षिका झाली. आईकडे राहू लागली. एक दिवस ढोबाईंनी बातमी आणली की शारदा नवऱ्याबरोबर राहू लागली आहे! आम्ही चक्रावून गेलो. दोन चार दिवसांत शारदा स्वत: आली.

"मी नवऱ्याबरोबर राहण्याचं ठरवलं आहे.त्यांनी दारू सोडलीय, नि गाव सोडून ते इथंच राहायला तयार आहेत. इथेच काहीतरी काम करतील. मी पण कष्ट करीन. त्याना पश्चात्ताप झालाय. कसं करू मी? तुमचाही धाक राहील." शारदाने सांगितले..... आणि गेले वर्षभर दोघंही सुखाने राहात

आहेत. शारदाच्या मामाच्या जोडीने नवरा रंगाच्या कामाचं कॉन्ट्रॅक्ट घेतो. मेहनत करतो. आता दारूचं म्हणाल तर ती पूर्णपणे सुटलेली नाही. कधीतरी घेतो. पण पूर्वीसारखा धिंगाणा घालत नाही.

आता शारदाच्या बाबतीत आम्ही हरलो कि जिंकलो? खरे तर इथं हारजीत हा प्रकार नाहीच.प्रत्येक समस्या वेगळी आणि तिचं उत्तरही वेगळं.कोणत्याही पुस्तकात न सापडणारं.

गेल्या चार-पाच वर्षात झालेल्या कामाचे एकूण मूल्यमापन एका तज्ज्ञ मित्रानी केले होते. आलेल्या स्त्रियांत बहुजन समाजाच्या स्त्रिया मोठ्या संख्येने आहेत. ब्राह्मण, मारवाडी, कोष्टी, जैन, मुस्लिम, न्हावी इत्यादी समाजातीलही आहेत. पण दलित समाजातील स्त्रिया त्या मानाने कमी आलेल्या दिसतात. संस्था या स्त्रियांपर्यंत पोचली नाही की या स्त्रियांना हे प्रश्न जाचत नाही? असा प्रश्न समोर ठाकला. प्रश्नाचं उत्तर शोधताना लक्षात आलं, की, मागास समाजातल्या स्त्रिया प्रत्यक्ष दिलासा घरात राहाण्यासाठी अवघ्या चारपाचच आल्या असल्या तरी मोफत कायदा मदत केंद्रात त्या मोठ्या प्रमाणावर आल्या आहेत. मध्यमवर्गीय वातावरणातील स्त्री पुष्कळदा परावलंबी असते. त्यामुळे तिचा आधार नवऱ्याच्या घरातून बाहेर पडताच पार तुटून जातो. पण मागासवर्गातील स्त्री आर्थिकदृष्ट्या अपंग होत नाहीत. उरतो प्रश्न कायद्याच्या मदतीचा. तो घेण्यासाठी त्या येतात. परंतु स्वतः कमावत्या - रोजंदारीवर असल्याने माहेरी त्या बिनधास्तपणे राहू शकतात. शिवाय 'नवऱ्याने टाकलेली बाई' ही गोष्ट मध्यमवर्गीयांना जेवढी लपविशी वाटते. तेवढी सर्वहारा समाजातल्या लोकांना लपवावीशी वाटत नाही.

"नवरा म्हणतो, तुमची वस्तू डावी आहे, तरी पत्करली मी. तिला जन्मभर सांभाळायचं तर तिच्या बापानी अधुनमधून पैसा लावायलाच हवा. बायको म्हंजे वस्तू वाटते त्याला. कधीपण वापरावी नि कधीपण फेकून द्यावी. असं कसं हो?" सुनंदा तडकून विचारते. ही दिसायला खूप काळी. नवरा पुण्याला सरकारी खात्यात ड्रायव्हर आहे. ही बापाची एकुलती एक म्हणून लग्न केलं. एक मुलगाही आहे. नवऱ्याने पुण्याला दोन वेळ जिवे मारण्याचा प्रयत्न केला. बरेच दिवस कोर्टाच्या समन्सला याने दाद दिली नाही. पण आता मात्र समन्स त्याला पोचले आहे. आपल्याला पोटगी द्यावी

लागेल या भीतीने तो पुण्याहून गुंड घेऊन येतो. आणि सुनंदाच्या घरासमोर जाऊन शिव्या-धमक्या देतो. पोलिसांकडे दाद मागितली तर ते लक्ष देत नाहीत. साधा अर्ज दाखल करण्यासाठी कुणाची तरी चिट्ठी लागते. सुनंदा मात्र धीराने उभी आहे. आई-वडिलांच्या सहाय्याने मुलाला वाढवते आहे. मात्र भेटली की एकदा तरी विचारते.

'भाभी, माझा मुलगा तर तो नेणार नाही ना? तेवढा माझा मला राहू द्या. मग कशालाच रडत नाही मी. कोर्ट मुलांचा ताबा तर नवऱ्याला देणार नाही ना!' काय उत्तर देणार आपण? शेवटी पोलीस आणि न्यायाधीश या समाजाचेच घटक. समाजातील वकील असोत, खोट्या साक्षी देणारे निवडलेले साक्षीदार असोत, सामाजिक न्यायदानासाठी समतोल तराजू हातात घेणारे न्यायाधीश असोत किंवा कायदा करणारे तज्ज्ञ असोत ते या समाजाचे घटक असतात.

समाजात स्त्री विषयी जी भूमिका रुजली आहे तीच त्यांनी घेतली तर कोणी कोणाला बोल लावायचा? समाज मनातील स्त्रीचे चित्र बदलायचे असेल तर तळापर्यंत पोचायला हवे.

समाजातील मानसिकता बदलण्याचा प्रयोग म्हणजेच मानवलोक वा मनस्विनीसारख्या सामाजिक संघटना वा संस्था. आज परिवर्तनाचे चक्र वेगाने फिरावे यासाठी झगडणाऱ्यांची संख्या वाढतेय.

या ठिकाणी एक गोष्ट आठवते. जी रामशास्त्री प्रभुण्यांच्या नावाने सांगितली जाते. एक लाल लुगड्यातली विधवा उत्तम प्रवचन करीत असे. प्रवचन ऐकावयास रामशास्त्री आलेले पाहून तिने प्रश्न केला. शास्त्रीजी, स्त्री आणि पुरुष निसर्गत: सारखेच. जन्म सारखा, मृत्यू सारखा. अनुभव घेण्याची शक्ति सारखीच. असे असतांना स्त्रिया व पुरुषांना दुहेरी न्याय का? पती मरण पावला तर बाईला विद्रूप केले जाते. अशुभ मानले जाते पण पुरुषाची पत्नी मरण पावली तर पंधराव्या दिवशी तो दुसरा विवाह करतो असे का? शास्त्रीजी उतरले, 'बाई तुमचे म्हणणे खरे आहे. न्याय देणारे आणि न्यायासाठी कायदे करणारे पुरुषच. एक वेळ अशी येईल, त्यावेळी तुमच्यासारख्या स्त्रिया कायदे तयार करतील. न्यायदान देण्यासाठी आसनस्थ होतील तेव्हा स्त्रियांना जरूर न्याय मिळेल.'

स्त्रीमुक्तीसाठी झगडणाऱ्या कार्यकर्त्या म्हणजे संसार, कुटुंब नाकारणाऱ्या, मुक्त लैंगिक संबंधाची भलावणी करणाऱ्या बायका. अशी भूमिका स्वत:ला संस्कृतीरक्षक समजणारे सोयीस्करपणे पसरवीत असतात. त्यांना काय माहीत की स्त्रीला घर हवे असते. मग ते शोषणमुक्त हवे. जिथे स्त्रीला माणूस म्हणून सन्मान असतो, प्रगतीची संधी असते ते घर तिचेही असते.

बाईचं 'माणूसपण' समाजाला मान्य करायला लावताना शेकडो कोस अनवाणी चालत जावे लागणार आहे. पण अनेकांचे .... सुजाण स्त्री-पुरुषांचे हात जेवढे वाढतील तेवढे हे अंतर सोपे आणि जवळचे होणार आहे. भारतीय तत्त्वज्ञान 'आत्म्याचे अस्तित्व' मानते. मग आत्म्याला जात असते का? लिंग असते का? स्त्रीच्या सतत जळणाऱ्या आत्म्याची कोणती सोय आम्ही लावली?

आत्मा चालला उपासी, दूरदूरच्या गावाले
माय मातीच्या कानांत, दोन सवाल पुशीले...
गांठ गांठ पदराला, वल्या वळाल तलखी
माती मातीला मिळता, पुढं निघाली पाखरी
पाखरीत कोण राणा? त्याले काय रूप रंग?
कुण्या जातीचा पालव, आता डोईवर सांग...
कुळवाचं देन-घेणं, काळजा मन्यांचा वायदा
परदेशी पराईण, तिले कोनाचा कायदा?
काया मातीची वाकळ, आता मागेच सुटली
आभाळाच्या अंतरात, एक जखम गोंदली....

रोज न् रोज मरणांऱ्या अशा कित्येक 'परदेशी पराईणी'. त्यांच्या मृत्यूची बातमी ऐकताना लाखो जखमा उरात गोंदल्या जातात. निदान एकीला तरी मृत्यूनंतर न्याय मिळावा म्हणून आपण साऱ्यांनी तिच्या या दोन प्रश्नांना उत्तर द्यायला बांधून घेतले पाहिजे.

तर, अशा हजारो कहाण्यांपैकी या चार दोन. आपले आभाळ आपणच पेलण्याची उमेद त्यांच्यात निर्माण करण्याच्या एका अधुऱ्या प्रयत्नाचा... धडपडीचा... ध्यासाचा हा गोषवारा.

## रुखसाना .. लक्ष्मी .. की लिली ? एक भारतीय स्त्री ?

लहानशा खेड्याच्या अगदी एकाकी टोकावर असलेलं चिमुकलं देऊळ. त्यात कुणीतरी लावलेली पणती. दाट लेल्या अंधारात एकाकीपणे .... मंदपणे तेवणारी. ते शेवरीच्या कापसासारखं मऊपणे तेवणं जसं मनाला खालावून जातं, तसेच लिलीचे डोळे. ही लिली आमच्या मनात अनेक प्रश्नचिन्हे निर्माण करून गेली.

गेल्या बारा वर्षात दिलासा घरात तऱ्हेतऱ्हेचे प्रश्न....वेदना घेऊन महिला आल्या. हरेक वेदनेचा रंग वेगळा. पोत वेगळा. वाण वेगळा आणि पेळही वेगळी. दलिताच्या कुटुंबातली ती लेक जिद्दी नि हुशार. पाटी पेन्सिलीवर जीव ओतणारी. घरातली कामे करून शाळेत पळे. पाहाता पाहाता सातवी पास झाली नि त्याच वर्षी न्हातीधुती झाली. तिच्या मनाचा...वयाचा विचार करण्याचा प्रश्न येतोच कुठे ? एकदाची खुंट्याला बांधून मोकळे व्हायचे नि सुटल्याचा श्वास सोडायचा एवढेच बापाला माहीत. तसेच केले. शिक्षक आते भावाच्या ....पंचवीस वर्षाच्या आतेभावाच्या गळ्यात पार्वतीला बांधले. पार्वतीला चौदावे वर्ष लागलेले. या नवऱ्याचे आणि त्याच्या शाळेतील एका शिक्षिकेचे पहिल्यापासूनच सूत जमलेले होते. त्याने पंधरा दिवस पार्वतीला नांदवले त्यानंतर परत आणण्यास नकार दिला. त्या पंधरा दिवसात पार्वती नि नवऱ्याच्या मनाचे धागे जुळले नाहीत. पण शरीराचे धागे मात्र जुळले आणि पार्वती पंधराव्या वर्षीच एका मुलाची आई झाली. पार्वतीने परत पाटी पेन्सील हाती घेतली. चांगल्या रीतीने दहावी पास झाली. मुलगा जणू तिच्या आईचाच झाला. गावाजवळच्या एका सामाजिक संस्थेत डी.एड. अभ्यासक्रमाचे महाविद्यालय होते. दोन वर्षांचा अभ्यासक्रम होता. मुलींना वसतिगृहात राहून शिक्षण घ्यावे लागे. संस्थापक पती-पत्नी या मुलींवर विविध माध्यमातून जीवनास उभारी देणारे संस्कार करीत. कोणत्याही प्रकारच्या राजकारणापासून दूर राहून समाजाला निर्भय बनविण्याचा वसा उचललेल्या संस्था आणि कार्यकर्ते गांवातील राजकीय खेळ मांडणाऱ्यांना गैरसोयच असतात. त्यांचा अडथळा दूर करण्यासाठी अत्यंत गलिच्छ प्रकारचे डाव खेळले जातात. या संस्थापक पती-पत्नींची निर्भय सचोटी, त्यांनी हळूहळू जमा केलेला कार्यकर्त्यांचा संच, लोकप्रियता यांचा धसका घेतलेल्यांनी, महाविद्यालयातील मुलींचे आणि

संस्थापकांचे अनैतिक संबंध आहेत त्यासाठी संस्थापकांची पत्नीच सहकार्य करते वगैरे प्रचार सुरू केला. कांही पालकांनी मुलींना वसतिगृहातून काढून घरी बसवले. पार्वती मात्र तिथेच राहिली. तिच्या नवऱ्याला हाताशी धरून, त्याला पैशांची लाच देऊन, त्याच्याकडून पोलिसांत तक्रार करविली की त्याची पत्नी पार्वती व संस्थाचालकाचे अनैतिक संबंध आहेत. कोर्टाने सावित्रीची रवानगी जिल्ह्याच्या महिला स्वीकारगृहात केली. या स्वीकारगृहाचे व्यवस्थापन करणाऱ्या ताईंना पार्वतीसारख्या सुजाण, अबोल, असहाय सुशिक्षित तरुणीने तेथे राहणे योग्य वाटेना. कारण या स्वीकारगृहातील बहुतेक महिला मानसिकदृष्ट्या आजारीच होत्या. त्यांनी आमच्या संस्थेकडे एका महिला कार्यकर्तीद्वारे निरोप केला. पार्वतीची इच्छा आमच्या दिलासागृहात राहाण्याची असल्याचा अर्जही पाठवून दिला. आणि एक दिवस पार्वती त्या व्यवस्थापिकाताईंबरोबर संस्थेत दाखल झाली. परतताना व्यवस्थापिकाताईंनी आणखीन एक अत्यन्त चांगली मुलगी त्या स्वीकारघरात गेल्या तीन वर्षांपासून सडते आहे, तिलाही दिलासागृहात प्रवेश द्यावा आणि तिच्या पायावर उभे करावे अशी विनंती केली. दिलासागृहात सहा महिला एकावेळी राहात. त्यावेळी दोन जागा रिकाम्या होत्या. आम्ही त्यांची विनंती मान्य केली. आणि दोन दिवसांनीच लिली आपले सामान आणि पूर्वेतिहासाच्या भल्यामोठ्या फाईलसह दिलासाघरात दाखल झाली.

लिलीचे अब्बा रेल्वेखात्यात कामाला होते. कोल्हापूरजवळच्या एका गेटवर हिरवा-लाल झेंडा दाखवायची ड्यूटी होती. लिलीला नऊ बहिणी आणि दोन भाऊ. बारा मुलं नि आईबाप असे चौदा जणांचे घर. हातात येणारा पैसा पुरणार कसा ? कोल्हापुरात त्यांच्या वडिलांनी बांधलेले पडके घर होते. त्यात चार भावांचा हक्क. लिलीच्या आब्बांच्या वाट्याला एक खोली, एक पडकी नि थोडी बखळ जागा आली होती. दोन्ही मुलगे शाळेत जात. मुली मात्र सकाळी मौलवीसाबांकडे थोडेफार धार्मिक शिक्षण घेण्यासाठी जात असत. एखादवर्षानंतर तिथे जाणेही बंद होई. अवतीभवतीच्या घरात धुणीभांडी, केरवारे करून चार पैसे कमावण्यासाठी पोरींची पाठवणी होई. लिली एका सुसंस्कृत मराठी कुटुंबात काम करी. त्यांच्याकडे मुंबईहून पाहुणे आले होते. चुटचुटितपणे काम करणारी, गोंडस लिली त्यांना आवडली. त्यांच्या घरात मूलबाळ नव्हते. गृहिणीला हाताशी कोणीतरी हवेच होते. त्यांनी लिलीला मुंबईस नेण्याबद्दल तिच्या आईवडिलांना विचारले. तिला शाळेत घालण्याची, शिक्षण देण्याची हमी दिली. वडिलांना ही बात पसंत

नव्हती. पण आईला मात्र वाटे. तेव्हे आपले आयुष्य रांधावाढा, उष्टी काढा करण्यात गेले. पोरगी शिकून शहाणी झाली तर घराला हातभार लावील. आणि वडिलांचा, नवऱ्याचा विरोध पत्करून रुखसानाला बेगमची रवानगी मुंबईला ....म्हणजे घाटकोपरला झाली. ती आता लिली झाली होती. शालू मावशी नि तात्यांचे दोन खोल्यांचे घर. दोघेही नोकरीला जात. लिली मावशीला मदत करी. आठ वर्षांची लिली भाकरी..पोळ्या झकास करायची. त्याचे कौतुक चाळीतल्या साऱ्यांना वाटे. त्या चाळीसाठी ती लिली होती. शालू मावशीच्या मावसबहिणीची मुलगी. आई नसलेली, सावत्र आईच्या त्रासाने जाचलेली. वगैरे....वगैरे. जूनमध्ये लिलीचे नांव शाळेत घातले. वर्गातील साऱ्या मुली सहा वर्षांच्या आतबाहेरच्या नि लिली मात्र नऊ वर्षांची. तिलाही ते कसेतरीच वाटे. सकाळी सातला शाळा भरे. पहाटे पाचला उठून मावशी आणि ती तिघांचे डबे तयार करीत. साडेसहाला लिली दप्तर उचलून घराबाहेर पडे. परत यायला साडेबारा वाजत. आल्यावर एकटीनेच जेवायचे. मग घर चित्रातल्यासारखे साफ करून चकाचक ठेवायचे. शिवाय कधी हे निवडायचे असे तर कधी ते मिक्सरवर वाटून ठेवायचे असे. दोन खोल्यातल्या कामांना वेळ तो कितीसा लागणार ? तात्या बरोबर सहाला घरात पाऊल टाकत. पंधरा मिनिटात मावशीपण येई. मग चहा करण्याची जबाबदारी लिलीचीच. लिली चहा मोठा सुरेख करी. दिवाळी..दसरा..पंचमी सारे सण हसत खेळत येत. नवा फ्रॉक....रंगीत रिबिनी. शिवाय अधूनमधून हॉटेलात जेवायला जायचे. दिवस पळत होते. पाहाता पाहाता लिली दुसऱ्या नंबराने पास होऊन चौथीत गेली. एक दिवस मधल्या सुट्टीत शिवणापाणी खेळताना एक मैत्रीण लिलीकडे पाहून ई ऽ ऽ ऽ करून ओरडली. लिलीच्या झग्याला लाल डाग पडले होते. लिली घाबरून घरी आली. घरात तरी कोण होते ? दोनदा चड्डी बदलली तरी ती खराबच होई. लिली दिवसभर रडत होती. संध्याकाळी तात्या आले. तेही बावरून गेले. बाहेरच चहा पिऊन येतो सांगून बाहेर पडले. शालू मावशी आली. तिने मात्र पाठीवरून हात फिरवून धीर दिला. आंघोळ घातली. सारे समजावून सांगितले. पण त्या दिवसापासून मावशी नि तात्यांची लिलीकडे बघण्याची दृष्टी बदलली. एरवी अभ्यासात मदत करणारे, डोक्यावरून हात फिरवणारे तात्या हरवून गेले. एरवी शालूमावशी, तात्या आणि लिलीवर घर सोपवून सुट्टीत मैत्रिणीकडे दिवसभर राहायला जाई. पण आता मात्र थोडावेळही तात्या आणि लिली दोघेच घरात नसत. लिलीला झग्यांऐवजी दोन मॅक्सी शिवून आणल्या होत्या. शरीरात होणारे बदल लिलीला जाणवत. खूप...खूप प्रश्न मनात गर्दी करून उठत.

पण विचारणार कोणाला ? वर्गातल्या मुली तर निव्वळ चिंटु कपिंटु क वाटत. तशात खालच्या मजल्यावरच्या सिंधीण मावशीची पुतणी रेणू नाशिकहून दोन महिन्यांसाठी रहायला आली होती. तिची नि लिलीची अगदी घट्ट मैत्री जमली. चौथीतून पाचवीत जातांना दुसऱ्या नंबरने उत्तीर्ण झालेल्या लिलीचे लक्ष पुस्तकातून उडत चालले. रेणूच्या गप्पा खूप निराळ्या आणि चवदार असत. त्या सारख्या आठवत. मग पुस्तकातली अक्षरे दिसेनाशी होत. दोन महिन्यांसाठी आलेली रेणू काकीला मदत करण्यासाठी तिथेच राहिली. तिने आठवीनंतर शाळा सोडून दिली होती. सातवीत असतांनाच तिचे एका वर्गमित्रावर प्रेम जडले होते. तो पण खूप प्रेम करी. इतके की त्याने करंगळीचे रक्त काढून तिचा भांग भरला होता. एका संध्याकाळी बागेत त्याने शपथ घेतली होती. आता तो जर ब्लेडने करंगळीतून रक्त काढतो तर मग रेणूनेही त्याला गोड मुका दिला होता. एक दिवस त्याची चिठ्ठी दप्तरात सापडली नि रेणूची शाळा बंद झाली. तिला घाटकोपरच्या काकीकडे पाठविण्यात आले. रेणूच्या नादात लिलीचे अभ्यासातून तर लक्ष उडालेच पण शालूमावशीही तिला आवडेनाशी झाली. गणितात नापासचा शिक्का घेऊन लिली सहावीत गेली. मुळात लिलीचा रंग गव्हाळ. लांबट डोळे. घनदाट पापण्या. चेहेऱ्यावर नवथर कोवळेपणाची तकाकी चढू लागली होती. शालूमावशीला वाटे इतक्या दुरून पोरीला आणलं. तिला दहावी नंतर नर्सिंगला पाठवावं. पायावर उभं करावं. तात्यांना एका मित्राला गणित आणि इंग्रजी लिलीला शिकवण्यासाठी विनंती केली. काकांनी तात्काळ मान्य केली. काका दुपारी तीन ते चार येत. जीव तोडून शिकवत. पण लिलीचे लक्ष रेणूच्या हाकेकडे असे. काकांचा त्रास कसा चुकवावा हे तिला कळेना. ती युक्ति पण रेणूनेच शिकविली. एक दिवस लिलीने मुसमुसत....संतापत काकांबद्दल मावशीजवळ तक्रार केली. काका तिचा हात गच्च दाबतात. नको तिथे हात लावतात. एक ना दोन. शालूमावशी बिथरली. तिने एक शब्द वेडावाकडा न बोलता शान्तपणे काकांना उद्यापासून येऊ नका असे सांगितले. ती तात्यांकडेही सारखे लक्ष ठेवी. लिली नि रेणूचे भेटणे तिने बंद केले. तरीही दुपारच्या वेळात लिली शेजाऱ्यांच्या नजरा चुकवून रेणूबरोबर फेरफटका मारीच. रेणूचा मावसभाऊ सत्येनचे कापडाचे दुकान सिंधी बाजारात होते. सत्येन त्याच्या आईचा एकुलता एक बेटा. नववीपर्यंत कसाबसा गेलेला. नंतर दुकानाकडे पाहू लागला. पोरीसोरींकडे पाहाण्याची, सारखे बाहेर फिरण्याची सवय तारुमावशीने हेरली. पोराने घाणेरडे सिनेमे पाहू नयेत. दुकानात लक्ष घालावे असे तिला वाटे. पण याचा धिंगाणा

वेगळाच. सत्येन दिवसातून जेमतेम दोन तास दुकानांवर थांबे, बाकी सारे ताखमावशीलाच बघावे लागे. हा सत्येन लिलीला पाहून विरघळला. इवलेसे ओंठ, लांबट डोळे. लांबसडक केस. त्याने रेणूशी दोस्ती वाढवली. लिलीला घेऊन रेणू दुकानात जाई. मग सत्येन तिथेच थांबे. सातवीची परीक्षा जवळ आलेली. लिलीच्या वागण्याला शालूमावशी कंटाळली होती. पण करणार काय ? तिच्या अब्बांची दूर बदली झाली होती. गेल्या सहा-सात वर्षांत त्यांनी कधी चौकशी केली नाही वा पत्राला उत्तर पाठवले नाही. फक्त निरोप आला होता की पोरीला सांभाळा. तिला आमची आठवण येऊ देऊ नका. वाटल्यास हिंदू करून दत्तक घ्या. त्या निरोपाचा विचार करावासा वाटला नव्हता आणि एक दिवस लिली शाळेतून घरी आलीच नाही. खूप शोधाशोध केली. रेणूला पोलिसात नेण्याचे भय दाखवले तेव्हा तिने सारे सांगितले. ताखमावशीने सत्येनचे लिलीशी लग्न करून दिले होते. आणि दोघांना महाबळेश्वरला धाडले होते. लिली जेमतेम सोळाची होती. पोलिसात जावे तर नाते काय सांगणार ? तिच्या पालकांचाही ठावठिकाणा नाही. या विचाराने शालूमावशी नि तात्या गप्प बसले.

अर्थात हे तपशील लिलीच्या फाईलमध्ये नव्हते. लिली बोलती व्हायला सहा महिने लागले. लिली अत्यन्त कमी बोलत असे. अगदी इवलेसे ओठ गच्च मिटलेले असत. आवाज तर इतका गोड आणि नाजूक की, ती काय बोलतेय हे कळायला पाच मिनिटे लागत. कपडे अत्यन्त स्वच्छ धुवी. तिला हातखर्चासाठी जे शंभर रुपये मिळत त्यातले साबणासाठीच पंचवीस तीस रुपये जात. परकर वा साडी कधी फाटलेली दिसणार नाही. ती वेळच्या वेळी नीट शिवली जाई. तिच्या भांडणाचा मुद्दा एकच. हिने माझा साबण पळवला वा तिने सर्फची पावडर चोरली. एक दिवस पेटीसाठी कुलूप आले. साबण कुलूपबंद असत. अगदी वाटोळा चेहरा. अपरे कपाळ. ओळीत बसलेले चिमुकले हात. बांधा मात्र काहीसा आडवा. एक दिवस तिने गंगामावशींना .... दिलासातील मम्मीला विनंती केली की मम्मीने तिला लक्ष्मी म्हणावे. मम्मीशी ती जरा मोकळे बोलत असे. सत्येनने तिचे नाव लक्ष्मी ठेवले होते. लग्नाचे पहिले वर्ष खूप छान गेले. लिलीला घरातली सारी कामे उत्तम येत. हाताला चव होती. सत्येन लग्नानंतर घरात स्थिर झाला. दुकानाकडे पाहू लागला. अकराव्या महिन्यात लिलीने अपुऱ्या दिवसांच्या बाळाला जन्म दिला. त्या बाळाच्या मेंदूची वाढ योग्य रीतीने झालेली नव्हती. अशा बाळाचे कौतुक कोण करणार ? आणि बाळाच्या आईची काळजी तरी कोण घेणार ?

घरात कामाचा ताण. पोटभर अन्न मिळत नसे. तारूमावशी हाल हाल करी. तिला वाटे की लिलीने बाळ घेऊन घरातून निघून जावे. सत्येनला जातीतली चांगली मुलगी करून देण्याचा घाट तिच्या मनात शिजत होता.

"पोरगं बिघडू लागलं. मग म्हटलं वेसवांकडे जाऊन जिंदगी खराब होण्यापेक्षा आईबाप नसलेल्या पोरीशी जुळवून दिलं. लग्न कसलं आलंय ? उगा माळा घातल्या घरात. नि धाडून दिलं महाबळेश्वरला मज्जा मारायला.. पोराची जात. बापाच्या वळणावर गेलीया. तो पण असाच होता. आन त्यातच रोग लागून मेला. मला पन तरास झाला. तवा ही नवी युगत शोधली. रेणूच्या काकिनंबी साथ दिली. आता आपल्या जातीची ... खानदानाची नवी दुल्हन आणू. भाईसा, तिकडं जयपुराकडेच बघा कोना अडल्यापडल्याची पोरगी. इथं काय कमी नाही. पैसा अडका भरपूर आहे". तारूमावशी जयपूरहून आलेल्या तिच्या भावाला आपला बेत सांगत होती.

"वर्षात लेकरू पन झालं. पण ते आहे डोकं नसलेलं, अशक्त. केव्हापण मरेल. नाही तर मलाच काय तरी करावं लागेल. दोगांचा काटा काढावाच लागंल." हे सारं ऐकतांना लिलीच्या अंगावर काटा आला. हीच तारूमावसी लग्नाआधी हौशीनं नवी साडी नेसायला द्यायची. बाजारातून मिठाई, लस्सी, मिसळ आणून खाऊ घालायची. तीच आता अशी वागतेय? बाळाच्या मृत्यूच्या कल्पनेने लिली विलक्षण धास्तावली. आणि एका संध्याकाळी ती घराबाहेर पडली. घराबाहेर पडली खरी. समोर बारा वाटा मोकळ्या होत्या.. पण एकाही वाटेवर घर नव्हतं.... डोक्यावरून हात फिरवील असं माणूस नव्हतं. एक वाट तिला दिसली. आणि ती थेट एस.टी.स्टँडच्या दिशेने चालू लागली. पण चढणार कोणत्या एस.टी. बसमध्ये. बाळाला पदराखाली घेऊन तशीच बसून राहायची. पोटात अन्न नाही. जवळ एक पिशवी नि स्टीलचा ग्लास. दोन दिवस असेच गेले. एस.टी. स्टँडवरच्या लोकांच्या नजरेत हे मायलेकरू बिन रस्त्याचं आहे हे लक्षात आलं असावं. तिसऱ्या रात्री पोलिस आले आणि त्यांनी लिलीची रवानगी ठाण्याच्या महिला स्वीकारगृहात केली. अवघ्या चार दिवसांत ते मूल लिलीच्या मनाला धक्का देऊन कायमचे दुरावले.

तेव्हापासून लिलीचे ओठ जणू गच्च मिटून गेले. पण डोळ्यात एकाकी ... असहाय चमक आली. तीन वर्षे त्या स्वीकारगृहाचे नियम पाळीत

तिथे राहिल्यावर तिची रवानगी लातूरच्या स्वीकारगृहात झाली. लातूरच्या स्वीकारगृहातील बहुतेक महिला गुन्हेगारी प्रवृत्तीची शिकार असलेल्या वा होणाऱ्या कौटुंबिक त्रासामुळे मानसिक संतुलन बिघडलेल्या महिला असाव्यात. तिच्या आणि पार्वतीच्या बोलण्यातून हे लक्षात आले. तसेच पार्वतीला दिलासात घेऊन येणाऱ्या स्वीकारगृहाच्या व्यवस्थापिकेच्या मनांतील खंतही जाणवली. लिली या व्यवस्थापिकेच्यां पूर्वी काम करणाऱ्यांच्या घरी मदत करत असे. त्यामुळे तिचा वेळ बरा जाई. नव्या व्यवस्थापिकांबाईंना वाटे की या अबोल, शहाण्या आणि वंचित मुलीला जगाच्या मुख्य धारेत सहभागी होण्याची संधी मिळावी. त्या हेतूनेच त्यांनी पार्वती आणि लिलीला दिलासात आणले.

लिलीच्या म्हणण्यानुसार ती मॅट्रिक नापास असली तरी तिची झेप जेमतेम पाचवी इयत्तेची होती. वाचनाचा नाद नव्हता. पण टायपिंग शिकण्याचे वेड, हो ... वेडच म्हणावे लागेल, होते. त्यातूनही मराठी टायपिंग अजिबात आवडत नसे. ए बी सी डी टाईप करण्यात दिवसाचे पाच-सहा तास जात. या वेडातून इंग्रजी शिकण्याकडे तिची प्रवृत्ती वाढेल, त्या निमिताने १० वी पास होण्याचा ध्यास तिच्या मनांत घुसवता येईल असे आमच्या संवादिनींना वाटे. पण लिलीची गाडी चार दोन शब्द आणि ए बी सी डी यांपुढे कधी सरकलीच नाही. पुण्यातील आमच्या ... मनस्विनीच्या मैत्रिणीकडे, तिच्या वृद्ध आईला सोबत देण्यासाठी तसेच त्यांची काळजी घेण्यासाठी एक निरक्षर दिलासा-कन्या पाठवली होती. ती तिथे केवळ रमली नाही तर साक्षर झाली. आणि समाजवादी महिला सभेत जाऊन बाहुल्या करण्यास शिकली. दिवसातून दुपारचे तीन तास ती केंद्रावर जाई. आमची मैत्रीण तिच्या नांवाने तीनशे रुपये बँकेत जमा करीत असे. हात खर्चासाठी शंभर रुपये देई. शिवाय ती घरातली एक सन्माननीय सभासद होती. या मैत्रिणीच्यां बहिणीकडे तिच्या वृद्ध मायपित्यांची कांळजी घेण्यासाठी, त्यांना वर्तमानपत्र वाचून दाखवण्यासाठी एका गरजू महिलेची आवश्यकता होती. आम्ही लिलीशी चर्चा केली. लिलीलाही बदल हवाच होता. त्या कुटुंबाशी चर्चा करताना तिच्या मनातील टायपिंग विषयीच्यां कमालीच्या आवडीबाबत सांगितले होते. त्यांच्या घरी टाईपरायटर तर होताच. परंतु लिलीला टायपिंगच्या क्लासमध्ये घालण्याची विनंतीवजा अटही आम्ही घातली. ती त्यांनी प्रेमाने स्वीकारली. लिली आनंदाने पुण्याला गेली. पाचसहा महिने बरे गेले. आणि एक दिवस अचानक फोन आला की लिलीला घेऊन मंडळी येत

आहेत.

लिली त्या कुटुंबातील वृद्धांची सेवा अत्यन्त प्रेमाने, मायेने करी. घरात स्वयंपाकासाठी वेगळी महिला होती. पण हक्काने त्यांना आवडणारे पदार्थ स्वत: तयार करून खाऊ घाली. सारे कसे छान चालले होते. पण अचानक एक दिवस एक अनोळखी माणूस लिलीची चौकशी करीत घरी आला. आठ पंधरा दिवसांनी त्याची खेप होई. दुपारच्या वेळात घरी लिली आणि दोन वृद्ध माणसेच असत. लिलीला समजावून सांगितले. त्या गृहस्थाविषयी माहिती विचारली. पण लिली फक्त मान खाली घालून बसे. नाईलाजाने दोघे पती-पत्नी स्वत: लिलीला पोचवण्यासाठी संस्थेत आले. त्या वेळी दिलासा घरात आठ जणी राहात होत्या. तिथे जागा नव्हती. माझ्या घरी माझे वडील ... पपा, अपंग होऊन आलेले होते.

... आमच्या घरात एक जुनी लाकडी खुर्ची होती. ती घराबाहेरच्या ओट्यावर ठेवलेली असे. सायंकाळी तिच्यावर बसून पपा वाहत्या रस्त्याकडे बघत बसत. डोळ्यांनी वाचता येत नसे. अंधूक दिसे. त्यात पंचावन्न वर्षे संगत देणारी सखी नुकतीच निघून गेलेली. मग वेळ पळवावा कसा ? तो रस्त्याकडे पाहात पळवीत असत. थंडी संपत आली. फाल्गून सुरू झाला. होळी जवळ येऊ लागली. आपल्या लाडक्या खुर्चीचा बळी जाऊ नये म्हणून पपा खुर्ची उचलायला गेले नि पडले. कमरेचे हाड निकामी झाले. सतत भिरभिरणारी पावले पार आडवी झाली होती.

पपांकडे लक्ष द्यायला, त्यांना पेपर वाचून दाखवायला, वेळेवर जेवण वाढायला मायेची व्यक्ति जवळ हवी होती. मग लिली माझ्या घरी येऊ लागली. राहायला मात्र केंद्रावर जाई. कारण तिथे मम्मी, इतर मैत्रिणी होत्या. लिलीच्या मनाचे दरवाजे या काळात अधिक जवळिकीने ठोठावणे शक्य झाले. मूल एकाकी... एकटे... कुठे ही नि कसेही वाढले तरी त्याच्या हृदयस्थ गाभ्यात आई आणि वडिलांबद्दल नितान्त उत्सुकता व कोवळीक असते. लिली टायपिंगच्या क्लासला जात असे. तिथे एक मुलगा लिली वाढली त्या कोल्हापूरच्या परिसरात वाढलेला होता. ओळखीतून विशेष आस्था वाढली. त्यातून कळले कि अब्बा सेवानिवृत्त झाले आहेत. अम्मा दहा वर्षापूर्वीच अल्लाकडे निघून गेल्या. आणि मोठा भाऊ शब्बीरमियाँ चिंचवड रेल्वेस्टेशनवर अब्बांच्या जागेवर काम करतो. अर्थातच लिलीच्या मनातील

उत्सुकता शिगेला पोचली. दरम्यान तो मुलगा क्लासमध्ये येईनासां झाला. एक दिवस खोटे कारण सांगून, लिली जी महिला आम्ही दुसऱ्या घरी पाठवली होती तिला भेटण्याचे निमित्त करून चिंचवडला जाऊन आली. पण तिथेही पत्ता लागला नाही. तिथेच नसीम चाचा... दाढीवाला माणूस भेटला. त्याने वडिलांना भेटवण्याची खात्री दिली. शब्बीरमियाँची बदली मध्यप्रदेशात झाली होती असे तो सांगे. पण त्याच्या बरोबर एकटीने जाण्याची हिंमत लिलीने केली नाही. नसीम चाचा तिचा पत्ता शोधत घरी येऊन गेले. साहेबांना आणि वहिनींना सांगून ते लिलीला घेऊन मध्यप्रदेशात जाणार होते. पण ते यायचे ते नेमके दुपारी, जेंव्हा हे दोघे कामावर गेलेले असत. तिसऱ्यांदा चाचा येऊन गेल्यावर मात्र लिलीला परत पाठवण्याचा निर्णय त्या कुटुंबाने घेतला. लिलीच्या मनात मात्र आता वडिलांना...भावाला...बहिणींना भेटण्याची जबरदस्त आकांक्षा निर्माण झाली होती. दिवाळीत पपांना खामगांवला भावाकडे पोचवले, लिलीच्या मनाचा विरंगुळाही संपला होता. पपांचे सारे वक्तशीर करण्यात ती हौशीने बुडून जात असे. पुन्हा एकदा अब्बांना भेटण्याची ओढ मनाला लागली. एक दिवस सकाळी केन्द्र संवादिनीचा फोन आला की लिलीला पुण्याला जायचे आहे. तिला अब्बांचा शोध घ्यायचा आहे. आम्ही आमच्या परीने त्यांचा शोध घेण्याचे प्रयत्न केले होते. पण शोध लागत नव्हता. तीही आता कंटाळली होती. वयाची तिशी ओलांडलेली जबाबदार तर होतीच. तिने रीतसर विनंतीपत्र लिहून दिलं आणि ती पुण्याला गेली.

सुमारे दोन वर्षानंतर बारामतीच्या स्वीकारगृहाच्या व्यवस्थापिकाताई लिलीसह संस्थेत आल्या. त्यांचे बंधू अंबाजोगाईला नोकरीला आहेत. त्या अंबाजोगाईत येणार म्हटल्यावर लिलीनेही आग्रह केला इकडे येण्याचा. मनापासून भेटायला आली. गळा पडून भेटली. इथून गेल्यावर ती चिंचवडच्या स्टेशन मास्तरना भेटली. पण त्यांनी दोन वर्षांपूर्वीच हे कुटुंब मध्य प्रदेशातील लहानशा गावी बदलून गेल्याचे सांगितले. इतक्या दूर जाणे शक्य नव्हते. ती पुण्याच्या पोलिस स्टेशनमध्ये गेली. तिथून तिला बारामतीच्या स्वीकारगृहात पाठविण्यात आले. तिथल्या ताईंचा अनुभव आमच्यासारखाच. त्यांनी तिला परिचारिकेचे शिक्षण देण्याचा प्रयत्न केला. पण ती तेथे टिकू शकली नाही. वागायला अत्यन्त मायाळू, साधी. बोलण्यात गोडवा. कुणाशीही वाद न घालणारी वा भांडणारी. पण मनाने खूप खूप थकलेली लिली. तिच्या भविष्याची काळजी

त्यांनाही लागली. त्यांनी अनेक ठिकाणी पत्रव्यवहार केला. लिलीने मोकळेपणी सांगितले की ती आता कुणाच्याही घरी काम करणार नाही. तिला संस्थेतच रहायचे आहे, जिथून तिला कोणीही, कधीही काढू शकणार नाही, कुठे ही कामाला पाठवले जाणार नाही अशा संस्थेत.

आणि त्या ताईंनी अशा संस्थेचा शोध घेतला. कदाचित केडगांवच्या रमाबाई महिला अनाथाश्रमात लिली स्थिरावलीही असेल.

जन्मल्यापासूनचा खडतर प्रवास. तऱ्हेतऱ्हेच्या आडवाटांनी जाणारा. ऐन विशी-तिशीत शेवटच्या दिवसाची वाट पाहणारी लिली. समाज, कुटुंब, धर्म न दिलेली, एकाकी भारतीय स्त्री. तिने मम्मीला... आमच्या गंगामावशींना एकदा सवाल केला होता.

मम्मी, मी रुखसानाबेगम की लक्ष्मी की लिली ? तू नवव्या वर्षी विधवा झालीस नि म्हातारी होईस्तो लोकांच्या घरात न्हाईतर भावाच्या दारात धुणीभांडी उपशीत बसलीस. तू हिंदू घरात जनमलीस तर मी मुसलमानाच्या घरात. या जगानं.... आपल्या आईबापानं... या सूर्यानं.... या मातीनं.... काय दिलतंग आपल्याला ? झाडांनी सावली बरीक दिली. पण तीही क्षणभराची. आता पुढच्या जनमाची वाट पाहात बसायचं. बस्स.... मम्मी हे असं का ? ... हे असं का ?

# मेरे हाँथो में नऊ नऊ चुडियाँ रे SSS

"माझी सावत्र आई बहोत छळायची. पिक्चरमध्ये दाखवतात ना, तशी! मला सात बहिणी. मी धरून आठ. धाकटा भाऊ. आमी वरच्या तिघी एका आईच्या नि खालच्या पांच नि भाऊ या आईचा. सात वर्षे गुवाहाटीला होतो आम्ही. दोन साल पहेले लातूरला आलो. इकडं आल्यापासून तर फारच त्रास करायची.... मग काय करावं ?......"

तेजस सावळा रंग. गुबऱ्या गालात बुडालेले अपरे नाक. रुसव्यांची कायमची रेघ असलेले रेखीव ओठ. टपोऱ्या डोळ्यांत गुलाबी छटा. अशी ठेंगणी ठुसकी मीरा स्वत:ची कहाणी सांगत होती.

मीराने तिच्या झोपडीजवळ राहाणाऱ्या मुर्तुझा या मुस्लिम तरुणाशी सिद्धेश्वराच्या मंदिरात जाऊन माळा घालून लग्न लावले. तो मुळचा नांदेडचा. १२ वी नंतर टेक्निकल कोर्स शिकण्यासाठी लातूरला आला होता. तिथे या दोघांची ओळख झाली होती, असे तिने सुरुवातीस सांगितले होते.

"क्या कहूँ भाभी, मेरी सौतेली माँ मुझे इतना मारती थी और चार चार दिन भूखी रखती थी। मुर्तुझा देखता था। वो ही मुझे सबकी नजर चुकाकर खाने को देता था। मै भी उसके पास जाती थी। बहोत प्यार करता था। मेरी सूरत उसे बहोत पसंद थी। शादी के बाद कितना मजेमें रहे हम! उसके दोस्त बहोत अच्छे थे. पंधरा दिन कैसे गुजरे समझा भी नही. फिर क्या करें ? सौतेली माँ की नजर लग गयी। एक दिन कुछ बताये बिना मुर्तुझा भाग गया। मुझे अकेली छोड़कर। ...."

"ताई मला ना हिंदी, बंगाली भाषाच आपल्या वाटतात हो. तीच भाषा ओठात बसलीया." मीरा हे सांगत असतांना श्यामाच्या, आमच्या कार्यकर्तीच्या मनातलं कुतूहल जागं झालं. तिने प्रश्न टाकला.

"तोमार नाम की ? तोमार बाबा नाम की ? शे की करो ? ..." आणि शामापेक्षाही सफाईदार बंगालीत उत्तरे मिळाली.

पहिल्या दिवशीच तिच्या मनाला ताण देण्यापेक्षा, दोन दिवस तिची

माहितीच विचारायची नाही असे ठरवून तिला दिलासात दाखल करून घेतले. दिलासा घराचे नियम पाळण्याचे हमीपत्र लिहून घेतले आणि दोन दिवसात मीरा दिलासाच्या वातावरणात मिसळून गेली. दिलासाच्या नियमानुसार तिची वैद्यकीय तपासणी केली. अवघ्या पंधरा वर्षांची कळी पण फुंकर घालून अकाली उमलवली गेली होती.

मीराचे वडील मजुरी करीत. लातूरच्या तेल कारखान्यात ते कामावर होते.. माणूस गरीब, प्रामाणिक आणि इमानदार. त्यामुळे मालकाच्या अगदी विश्वासातला. मालक काही वर्षांपूर्वी आर्थिक कारणांमुळे येत आसाममध्ये निघून गेले होते. जाताना पैशाअडक्याबरोबर लक्ष्मण जाधवाच्या कुटुंबालाही घेऊन गेले. लक्ष्मणचा संसार मोठाच होता. सहा मुली नि दोघे नवरा बायको. गोहाटीला गेल्यावर दोन मुली आणि धाकटा मुलगा जन्मले. एकदाचा वंशाला दिवा मिळाला. अकराजणांच्या पोटाला भाकर घालण्याची ऐपत मालकातही नव्हती. बंगल्याच्या वळचणीत राहाण्यासाठी दोन खोल्या आणि महिना हजार रुपये लक्ष्मणच्या हातावर ठेवले जात.मुली आणि बायको आजूबाजूच्या घरात कामं करीत. मोठी शान्ता, नंतरची मीरा अकरा नि दहा वर्षांच्या. त्यांना घरकामासाठी दुसऱ्या कुटुंबातून ठेवले होते. मीरा रोज सकाळी सात वाजता सविता दीदीकडे कामाला जाई. तिथेच नाश्ता, चहा, जेवण मिळे. दीदी शाळेत टीचर होत्या. बाबूजी कॉलेजात शिकवत. दिदीची चिमुकली करिश्मा सांभाळायचे काम मीरा करी. शिवाय मछली धुवून घ्यायची. नारळाचा छोल काढून द्यायचा. मिक्सर, फूड प्रोसेसर, वॉशिंग मशीन, फोन इत्यादी आधुनिक उपकरणे सराईतपणे हाताळण्याची तिला सवय होती. मीराला गाण्याची खूप आवड. सविता दिदी रविन्द्र संगीत गाणारी. तिची गाणी ऐकून मीराही खूप गाणी शिकली होती. ती संस्थेत असतानाची गोष्ट. मी एक दिवस "ओ सजना बरखाँ बहार आयी " हे गीत गुणगुणत होते. लगेच मीराने मला मूळ बंगाली गाणे गाऊन दाखवले. मीरा त्या घरीच लिहायवाचायला शिकली. चार माणसांत कसे वागायचे, आलेल्या पाहुण्यांचे स्वागत कसे करायचे, फोनवरचे निरोप घेऊन व्यवस्थित कसे सांगायचे यात मीरा तरबेज झाली होती. सविता दीदीही तिच्यावर खूप माया करीत. कपडेलत्ते चांगले घेत. लाड करीत. जणू ती त्यांच्या घरातीलच.

पाहाता पाहाता चार वर्षे निघून गेली. आणि अचानक मालकाची

जात विस्मान्याला लागली. मालकिणीचा भाऊ आला. सर्व पसारा आवरून वाहिणीला आणि मुलांना घेऊन धारवाडमध्ये निघून गेला. लातूरला परतण्याशिवाय लक्ष्मणसमोर दुसरा मार्ग नव्हता. त्यात मोठ्या शांतानं असामिया टेकरबरोबर पळून जाऊन लग्न लावले होते. तिच्याहून धाकटी मीरा शहाणी होऊन तीन वर्षे झाली होती. सवितादीदींच्या घरचे चांगलेचुंगले खाणे, नीटनेटके कपडे यामुळे ती आधिकच उठून दिसे. शांताच्या मार्गाने ही लेक पण गेली तर कसे ? असा प्रश्न मनाला सतावत राही. त्यामुळे फारसा विचार न करता लक्ष्मणने निर्णय घेतला आणि एक दिवस त्याने सगळा गाशा गुंडाळून थेट लातूर गाठले. सिव्हिल कँपात एका कोपऱ्यात मित्राच्या मदतीने झोपडे ठोकले आणि सारेजण राहू लागले. आसामात भात आणि मासे मुबलक. दोनवेळचे खाणे सहज भागे. पण इथे मात्र महागाई प्रचंड वाढलेली होती. हायब्रीडची भाकर नि एक कालवण खायचे तरी परवडत नसे. इथेही मीरा, रत्ना, पद्मीन, माया, वीणा धुणीभांडी, झाडलोट करायला चार घरी फिरत. आई नऊ बाळंतपणांनी पार खंगली होती. नेहमी खोकला येई, थकवा येई. घरची कामे धाकट्या रेखा आणि मीनू सांभाळीत. मीराच्या झोपडीशेजारच्या बंगल्यात टेक्निकल शाळेची तरुण पोरे राहात. त्यांच्या धुण्याभांड्याचे काम मीरा करी. त्यातच मुर्तुझा होता. मुलांना अधूनमधून 'तिखट' आवडे. मीरा ते बनवण्यात तरबेज होती. पोरं तिच्यासमोर सामान आणून टाकत. मनापासून खपून ती झणझणीत कालवण तयार करी. पोरं खुश. नि शिवाय उरलेला शेरवा, भात, चपात्या घरी न्यायला मिळत. मीराही खुश. सवितादीदींच्या हाताखाली मीरा कालवण करण्यात तरबेज झाली. तिची स्वच्छ आणि आधुनिक राहणी, बोलण्यातला गोडवा यामुळे ती भल्या घरातली मुलगी वाटे.

मीराचे केस कुरळे नि दाट होते. डोक्यावरून पाणी घेण्याची सवय आसामात लागलेली. मोकळे केस पाठीवर टाकून हिंडणारी .... काम करणारी मीरा अनेकांच्या नजरा वळवून घेई. त्यातच मुर्तुझा होता. तो तिला डोक्याच्या पिना, डोळ्यात घालावयाचा सुरमा, भिवया रेखायची पेन्सील, पावडर इत्यादी खास वस्तू आणून देई. मग घरात दुसरी पोरं नसतील तेव्हा त्याचे हट्ट मीराला पुरवावे लागत. सवितादीदींच्या घरात वाढल्याने स्त्रीपुरुष मैत्रीतले नेमके धोके तिला माहीत होते. ती शहाणी झाल्यावर दीदींनी तिला चार गोष्टी समजावून सांगितल्या होत्या. चित्रं दाखवली होती. मुर्तुझाचे शारीरिक हट्ट पुरवताना एक दिवस आईनेच पाहिले. त्या रात्री वडिलांनी

मरेस्तो मारले. आईने दोन दिवस उपाशी ठेवले. अर्थात मुलांचे कामही बंद करून टाकले. घरची देखभाल मीरावर सोपवून आई खोकत खाकत चार घरची धुणीभांडी करू लागली. चार आठ दिवस बरे गेले. आई बाहेर कामाला गेली की धाकट्या भावंडांच्या हातावर चॉकलेट गोळ्या देऊन मीरा मुर्तुझाची खोली गाठे. तोही वाट पाही. खोलीतली बायकोची मुले गावी निघून गेली होती. हा मार्ग मीराच्या ओढीने मोकळा राहिला होता. धाकट्या भावाने, बाळाजीने एक दिवस आईजवळ चहाडी केली. त्या रात्री तर मीराला बापाने इतके बडवले की शेजारच्यांनी सोडवले. मुर्तुझाला त्याच्या मालकाने खोली मोकळी करायला लावली. बापाला वाटले की पोरगी आता तरी ठिकाणावर येईल. मुर्तुझाने शेजारच्या झोपडपट्टीत एका मित्राच्या मदतीने खोली केली. एक दिवस मीरा घरातून नाहीशी झाली. दोघांनी सिद्धेश्वराच्या मंदिरात जाऊन एकमेकांना माळा घातल्या. भांगात सिंदूर, पायात बिछड्या, हातात चुडा, त्यात सवितादीदींनी दिलेली शंखाची बांगडी अशा थाटात मीरा संसाराला लागली. मुर्तुझाही मजुरी करी. दोन वेळचे भागे. जेमतेम महिना झाला असेल नसेल लग्न करून. एक दिवस मुर्तुझा काम शोधायला गेला तो परतलाच नाही. आठ दिवस गेले. एक रात्री त्याचा मित्र आला. वेडंवाकडं बोलू लागला. त्याच्याजवळ मीराने राहाण्याची भाषा करू लागला. मीरा संतापली, आरडाओरडा करून तिने चार माणसे गोळा केली. पण साऱ्यांनी तिलाच दोष दिला.

"बगा ताई. समदे माझ्या तोंडावरच थुंकले. ही पोरगीच चवचाल आहे म्हणे. त्या भाड्याला कुणी दोष दिला नाही. मग दुसऱ्याच दिवशी ती झोपडी खाली केली. एस्टी स्टँड वर लई वेळ बसून ऱ्हाईले. कुठं जावं कळेना. मग नाइलाजानं आईच्या दारात गेले. तिनेपण शिव्या दिल्या. म्हणाली, बाप यायच्या अगूदर काळं कर. तू दिसली तर तुजा गळा कापील. नि जाईल जेलात. त्यो जेलात गेला तर या पसाऱ्याच्या तोंडात काय कोंबू ? एवढी भाकर खा. पानी पी. हे पन्नास रुपये घे नि काळं कर. सावतर आईच. पण तेवढी दया केली बघा. मग पुना स्टँड वर आले. दिसल त्या गाडीत बसले. नि इथे अंबाजोगाईत पोचले. रस्त्यावरून हिंडताना एका ब्युटिपार्लरची पाटी दिसली. तिथं आत शिरले. सवितादीदीने मसाज करायला शिकविले होते. पंधरावीस दिवसांनी मीच दीदीचा चेहेरा साफ करून घायची. म्हटलं ही नोकरी मिळाली तर बरंच हाय. पन नशीब खोटं. त्या बाईच्या नवऱ्याची

बदली झाली होती. ती चार दिवसांनी गावाला जाणार होती. तिनेच तुम्हाला फोन केला नि मला संस्थेत आणले. लई उपकार केले बाबा!"

अशी होती मीराची कहाणी. उच्चमध्यमवर्गीय कुटुंबातील राहाणीमान अंगी पडल्यामुळे मीराला इतर मुलींच्यात मिसळणे जमत नसे. खेड्यात वाढलेल्या इतर स्त्रिया डोक्याला पचपचून तेल लावीत. तर या बाई साहेब महिन्याच्या आदल्या रात्री खास तेल लावणार. दिलासातील महिलांना हातखर्चासाठी संस्था शंभर रुपये देते. पण तेही तिला अपुरे वाटत. मुलगी वा बाई दिलासात रुळली की आम्ही त्यांना बाजारात खरेदीसाठी, उदा. भाजी आणणे वगैरे साठी पाठवीत असू. त्यांच्यातील आत्मविश्वास वाढावा, संस्थेविषयी आस्था निर्माण व्हावी, निर्णय घेण्याची क्षमता यावी हा यामागे हेतू होता. एक दिवस तक्रार आली की मीरा भाजीला गेली की हॉटेलमध्ये चहा पिण्याचा हट्ट धरते आणि दुसरीलाही नेते. लहान गावात विशिष्ट १-२ उपाहारगृहे सोडली तर स्त्रिया हॉटेलमध्ये जात नाहीत. छोट्या गावात सगळे सगळ्यांना ओळखतात. हॉटेल मालकाचाच एक दिवस फोन आला "भाभी पोरीची नजर चंचल वाटते. तिला सांभाळा. उगा आफत यायची. लोक काय टपलेलेच असतात. मी मुद्दाम फोन केला."

एरवी मीरा इतकी गोड, हुशार, बोलण्यात तरबेज. वाचनाची आवड. काय करावे हे सुचेना. आमच्या एका कार्यकर्तीने सुचवले की मीच तिला कामासाठी घरी न्यावे. माझ्या मुलीबरोबर तिची दोस्ती होतीच. सायंकाळी जेऊन खाऊन दिलासात परतावे. त्या बदल्यात मी जेवण, कपडे वगैरे देऊन दीडशे रुपये तिच्या नावे बँकेत भरावेत. घरगुती वातावरणात ती अधिक स्थिर होईल. मीरा मला घरात मदत करी. घर स्वच्छ ठेवणे नि मला स्वयंपाकात मदत करणे एवढेच तिचे काम. दुपारी २ ते ४ संस्थेत शिवण शिकायला मी पाठवीत असे. १९९० साल 'युनोने' बालिका वर्ष म्हणून जाहीर केले. त्या निमित्ताने बालिका मेळावे घेतले. त्यात मीरा पुढे असे. अंताक्षरीत तर कोणालाच हार जात नसे.

केव्हातरी बाजारात जाताना तिला तिचा मामा भेटला. त्याने नंतर संस्थेत पत्र पाठवले. मीराची आई सावत्र तर नव्हतीच तर सख्खी होती. मुर्तुझाबरोबर पळून गेल्यावर ती परत घरी कधी गेलीच नव्हती. आम्हाला सांगितलेल्या माहितीतल्या अर्ध्या गोष्टी खोट्या होत्या. एक दिवस सायंकाळी

आईवडील संस्था शोधीत आले. मीराला परत घेऊन जाण्यासाठी मीराला त्यांच्याबरोबर परत जाण्याची अजिबात इच्छा नव्हती. तिने वडील गोष्टी मीठ मसाला लावून सांगितल्या होत्या. आता वाहेणी नव्हत्या. होत्या सत्याजणी. मोठीने आसामात टेलरकाम करणाऱ्या तरुणाबरोबर लग्न केले होते. मीराचा नंबर तिसरा. तिच्याहून मोठी मीना. तिचे लग्न गेल्यासाली झाले. मीराला नटायमुरडायची खूप हौस. ते आईला आवडत नसे. त्यात ती ज्या घरी कामाला जाई तिथे हातउचल करी. मुर्तुझा हा शिकणारा मुलगा नव्हता. तो कुणाच्याशा फॅक्टरीत पेंटरचे काम करत असे. तो नांदेडचा होता. दिसण्यात देखणा होता. त्याच्याशी मीराची असलेली जवळीक आईवडिलांना आवडत नसे. त्यातून मुसलमान मुलगा आपल्या पोरीला बिघडवतो याचा राग येई. दोघेही मीराला खूप मारत. पण तिच्यातला धटपणा कमी झाला नाही.

मीरा पळून गेल्यावर तिचा शोध घेण्याचा प्रयत्न मात्र त्यांनी केला नाही. बला टळली असेच वाटे. पण आठवण मात्र येत राही. शेवटी पोटची लेक. तिचा पत्ता लागल्याचे भावाकडून कळताच आईने उचल खाल्ली. लेकीला भेटावं असा हेका धरला.

आणि ते संस्थेत आले. "ताई सख्खे आईबाप झाले म्हणून काय झालं ? इतकं मारतात का पोरीला ? कधी तरी मायेनं पोटाशी घेतलंय का मला ? विचारा ना ! मला नका धाडू तिकडे". मीराने हट्ट धरला. मीरा आमच्याकडे १९८९ ते १९९१ या काळात होती. दरम्यान तिला आम्ही ४ थी परीक्षेस बसवले. त्या निमित्ताने वैद्यकीय शास्त्रानुसार तिचे वय निश्चित केले. ते सतरा एवढे भरले. मीरा अठरा वर्षाच्या आतली होती. तिने वडिलांकडे जाणे कायद्याच्या दृष्टीने योग्य होते. वडिलांनी यापुढे तिच्याशी नीट वागण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे तिच्या इच्छेविरुद्ध तिची आईवडिलांबरोबर पाठवणी केली. नियमानुसार तिच्या सामानाची तपासणी झाली. त्यात तऱ्हेतऱ्हेची सेंटस, चेहरा साफ करायचे क्लीनसिंग लोशन, लॅक्मे.... पॉण्ड्स क्रीमच्या बाटल्या, आयब्रो पेन्सिली, चार रंगांच्या ओठ कांड्या (लिपस्टिक्स), गुलाबपाण्याची बाटली, चंदन पावडर असा भरपूर महागडा खजिना सापडला. तो पाहात असताना गेल्यावर्षीच्या माहेर संमेलनात तिने केलेले नृत्य मला आठवले. सुरेख साडी, माथ्यावर बिंदी, नाकात नथनी, कमरपट्टा यात सजलेली देखणी मीरा तबकडीच्या तालावर

नाचत होती.

.....मेरे हाथोमे नऊ नऊ चूडि याँ रे ऽऽऽ
जरा ठैरो सजन मजबूरीयाँ है ऽऽऽ
हातातल्या इन्द्रधनूषी बांगड्या खणकावीत तालात घुमणारी मीरा.

मीराला नवऱ्यावर मनभरून 'प्यार' करायचा होता. स्वैपाकघर सजवून, छान छान पदार्थ बनवून त्याला खिलवायचे होते. एक प्यारीसी गुड्डीपण हवी होती. वडिलांबरोबर परतलेल्या मीराला यातले काय काय मिळाले याबद्दल नेहमीच उत्सुकता वाटे. सुमारे सहा महिन्यानंतर श्यामा, संस्थेची संवादिनी वडिलाचा पत्ता शोधत गेली. पण दोन महिन्यांपूर्वीच मीराचा पूर्ण परिवार गाव सोडून गेला होता.

मीराएवढी लहान मुलगी आजवर संस्थेत आली नव्हती. तिचा बालसुलभ अवखळपणा दिलासाघराला ...मम्मीला ताजवा देत असे. पण कधी कधी तापही होई. बाजारची भजी खाण्याची चटक कार्यकर्तीला नेहमी वैताग आणि. ही बाजार करून बाहेरून आली की कुठे तरी भज्यांचा पुडा खोचून ठेवणार. स्वत: खाणार नि खाणाखुणा करून इतरांनाही खाऊ घालणार. आमच्या शिस्तप्रिय आणि कडक कार्यकर्त्यांच्या दृष्टीने हा गुन्हा महाभयानक. मग जेवण न देण्याची शिक्षा केली जाई. मीराही इतकी हेकेखोर की ताईनी-कार्यकर्तीने 'जेव' म्हटल्याखेरीज घास तोंडात घालणार नाही. पुस्तकी शिस्तीपेक्षा मायेचा मऊपणा अधिक महत्त्वाचा असतो हे कार्यकर्तीला समजाऊन सांगताना माझी तारांबळ उडे. त्यातूनच मग मीराला माझ्याकडे ठेवण्याचा निर्णय घेतला. राखी पोर्णिमेला निरंजन ओवाळून, साग्रसंगीत राखी बांधण्याचा कार्यक्रम फक्त दादाभैयापुरताच नसे. तर आमच्या बालसदनाच्या मुक्तरलाही सन्मानाने राखी बांधली जाई.

पेपर वाचण्याचाही नाद होता. पुण्याला कोणते सिनेमे लागलेत ते या बाईला माहीत असत. त्यातूनच तिला चौथीला बसवण्याचे मला सुचले. आणि पहिल्या वर्गात पासही झाली. मीराचा मामा तिला भेटला नसता तर कदाचित ती आणखी शिकली असती. मीरा आसाममध्ये असताना सविता दीदींच्या सुखवस्तू घरात राहिली. सुशिक्षित आणि स्त्रीपुरुष समतेचा विचार स्वीकारलेल्या घरात तिला स्वतंत्र व्यक्तिमत्व मिळाले. तरूणाईच्या

उंबरठ्यावर पाहिले पाऊल ठेवताना सुखी संसाराचे चित्र जवळून पाहिले. त्यामुळे त्या अधमुऱ्या वयात तिच्या मनात सुखी संसाराबद्दल, प्रियकर..साथीदाराबद्दल सुंदर स्वप्ने पेरली गेली. लातूरला झोपडीतले दरिद्री जीवन जगताना मुर्तझासारखा दिसण्यात तेज, थोडाफार शिकलेला, तिच्या सौंदर्याची स्तुती करणारा मित्र भेटला. परंतु त्याने चार दिवस तिच्या सौंदर्याचा उपभोग घेऊन तिला सोडून दिले. एका बाजूने पारंपारिक संस्कारांच्या मुशीत वाढलेल्या मीराला हा धक्का सहन झाला नाही. आईवडिलांकडे परत जाण्याची हिंमत झाली नाही. दिलासाघरातल्या वातावरणात ती आरपार रमली होती. मीराला निरोप देताना आम्ही सारेच आतल्याआत हेलावलो होतो.

कोणत्याही संध्याकाळी मीरा आठवते . नि मनात येते, मीराच्या हातातल्या चुडियाँ खणखणत असतील का? तिचा सजन तिला सापडला असेल? की उजाड शुष्क डोळ्यांचे बिनबांगड्यांचे हात दारोदारची धुणीभांडी करण्यात निष्पर्ण, राठ, भेगाळ बनत चालले असतील ?

मानवलोक समाज विकास महाविद्यालय ग्रंथालय अंबाजोगाई-४३१५१७, जि.बीड

# उगवाईच्या दिशेने जाणारी शांतू.

“ताई बाहेर या ऽऽ” अशी हाक ऐकून आले. तर दारात पोस्टमन दादा उभे. मनात आले. कुणाचे नॉटपेड पत्र आले? की चक्क धनलाभ? ... मनिऑर्डर?

पोस्टमन हातात कार्ड घेऊन अगदी हसऱ्या उत्सुकतेने माझी वाट पाहात होता. मी दिसताच म्हणाला, ‘बाई तुमच्या मनोशिनी लेकीचं, दस्तुरखुद्द हातांनी लिहिलेलं टपाल आणलंय. चहाचं इनाम हवं, मुद्दाम शेवटी आलोय इथं’

हा पोस्टमन माझा विद्यार्थी आहे. हे इनाम थंडीच्या गारठ्यात हक्काने मागणारच तो ! पत्र होते शांतूचे. लोणावळ्याहून आले होते. शांतूच्या अक्षरातले. “शदीला कृपा, मनोशिनी, अंबाजोगाई.” आणि त्या खाली नवशिक्या विद्यार्थ्याची टीप. ‘हे पत्र भाभीजवळ जरूर पोचवणे’ अशी.

चहा घेऊन पोस्टमन गेला. मला मात्र आनंद लपवता येईना. मीही पत्र हातात घेऊन ‘मनस्विनी’ कडे सुटले.

शांता आमच्या ‘दिलासातली पहिली कळी.’ चौऱ्याऐंशीच्या एप्रिलमध्ये दिलासाची रीतसर सुरुवात झाली. दिलासाघर जानेवारीत सुरू झाले तरी त्यात यायला कोणी तयार होईना. घरातून हाकलून दिलेली मुलगी नदीचा डोह जवळ करील, स्वतःला पेटवून घेईल किंवा झाडाला टांगून घेईल. पण एखाद्या संस्थेत जाणे कमीपणाचे वाटत असे. आजही थोडीफार स्थिती तशीच आहे. दिलासा घर सुरू झाल्यावर आम्ही सर्वत्र निरोप दिले होते. गरजू एकाकी स्त्रियांना कायद्याची मोफत मदत देऊ, वकील लावून देऊ, तिला कांही नवीन कला शिकवू ... वगैरे वगैरे, सारे तपशील भरून, निरोप दिले होते. पण उत्तर साधारणपणे एकच असे “आमच्या गांवात आठ-दहा जणी अशा आहेत हो. पण संस्थेत जाण्यापेक्षा भावाच्या दारात कष्ट केलेले परवडतात त्यांना. भावाच्या दारात अन्नावारी मरेस्तो काम केले तरी अब्रू चार जणात झाकलेली राहाते. संस्थेत जायचे म्हणजे चार माणसांत भावाला नि सासऱ्याला कमीपणाचे.” ही अशी भूमिका सर्वांना मान्य असणारी.

पहिले दोन तीन महिने असेच गेले आणि एक दिवस एक तरणीताठी बाई, धरधरीत नाकाची विचारीत आली. " कुह्याबाई हितचं राहातात का? मला हस्तंकोणबाईनी पाठवलीया. हाईत का घरात ? " बोलण्यातही साधासरळ रांगडेपणा होता. लोहियाबाई ती मीच, असे सांगताच पुन्हा पट्टा सुरू झाला.

"मी शांता. तोरणातची जातीनं कुंभारीण हाय. नवऱ्यानं टाकलेल्या बायांना वसतीग देता म्हनं तुमी फुकटात. मला बी त्या शी भांडान धरायचं हाय. न्हायला यावंच लागल का हितं ? आन घरी धुणी भांडी घासत्ये मी. हरेक घरी दोन इसा म्हणजे चाळीस रुपये मिळतात. हितं फुकटातं रहायला घाल पर चोळी बांगडीला वर पैसे बी लागत्यालंच. ते देणार का ? नि काम काय करावं लागेल ? हस्तकोणबाईकडे बी भांडी घासत्ये मी. त्यांनी तुमचा जिम्मा ... (खाणी) दिला म्हून हितवर आले. काय त्ये लवकर सांगा. मला कामाला जायाचं हाय ! " धडाक्यातले बोलणे संपले नि पाणी मीच प्याले ....

दिलासात राहाण्यासाठी येणाऱ्या महिलेला जेवण, राहाणे आदी मिळेच. शिवाय खर्चासाठी पंचाहत्तर रुपये दरमहा देत होतो. त्यामुळे शांताने दिलासा घरी येण्याचे ठरवले.

दुसऱ्याच दिवशी शांता दिलासा घरात राहायला आली. उंचनिंच, थोराड बांधा, भव्य कपाळ, धरधरीत नाक , पाणीदार डोळे, चालण्यातही वेग आणि झोक. बोलण्यात शब्दांना वजन. अशी ही शांता मनाने मात्र अत्यन्त कोमल होती. ती आली नि तिच्या पाठोपाठ सोना, निर्मला आल्या. 'दिलासा घर' भरून गेले.

शांताला ना शिवणात रस ना खडू तयार करण्यात लक्ष. तिला पाणी भरणे, स्वच्छ झाडलोट करणे यात विशेष आनंद मिळे. पापड लाटण्यातही मजा वाटे. खूपदा सांगूनही शिवणाच्या वाटेला ती फिरकली नाही. बालसदनच्या मुलींना खसखसून आंघोळ घालणे, त्यांच्या तेल चोपडून वेण्या झालणे यात मात्र ती मनापासून रमून जाई. चौघडीच्या पातळ चपात्या करायचे जमत नसे पण थपाथपा भाकरी थापण्यात कोणालाही हार जात नसे. शांताचे मन अतिशय नितळ. खडकातून उसळत्या मारीत वाहात

जाणाऱ्या पाण्यासारखे. बालसदनातल्या नंदा, कमल, संगीता तिच्या लाडाच्या. त्यातही नंदीवर तिची जास्त माया. नंदा भोकरासारख्या मोठ्या ... तपोऱ्या डोळ्यांची. रंग काळा कुळकुळीत. नाक सदा वाहणारे नि भोळीशी. कमा नि संगी तिच्यावर दाब टाकीत. अशा वेळी नंदाची बाजू घेणारी शांता.

शांता धानोऱ्याच्या कुंभाराच्या घरात जन्मली. सर्वात धाकटी. वर बरीच भावंडं. आज पाच शिल्लक आहेत. गांवाजवळून झरा वाहात असे. तिथून माती आणावी. त्यात घोड्याची लीद कालवावी. मळूमळून मऊसूत केलेल्या मातीचे मोठे मोठे रांजण करावेत नि कधी देवळाच्या तर कधी पाटवद्याच्या बाजारात नेऊन विकावेत. शांतूच्या वडिलांच्या घरी हेच धंदा होता. अंगावर सावकाराचा बोजा नव्हता. घरात तीन सुना आल्या होत्या. मोठ्या तिघींचे ... लेकींचे संसार रांगेला लागले होते. काळजी होती धाकट्या शांतूची. शांतू थोराड हाडाची. नाकीडोळी नीटस. पाचव्या वर्षापासून भाकरी भाजायला शिकली. बापाला वाटे की आपले हातपाय थकले. आपल्या मांघारी पोरांचा काय भरोसा ? जीव धड आहे तोवर ज्याची वस्तू त्याच्या घरात ढकलून मोकळे व्हावे. असे मनांत येतेय तोवर जावई दारात चालून आला. चार कोसावरच्या बोरगावच्या कुंभाराचा धाकटा ल्योक. लातुरात मशिनीवर कपडे शिवायला शिकत होता. सातवी पास होता. चौदा वर्षाची उमर होती. मग बैठक झाली. बैठकीत ठरले की पोरीच्या बापानी नवरा, नवरीचे कपडे द्यायचे. सहा माशाची मुदी जावयाला द्यायची नि लगीन लाऊन द्यायचं. मानकरणीचं एक हिरवं इरकली लुगडं सासूला नेसवायचं. पोरगी आठाची झाली की पुढच्या तुळशीच्या लग्नानंतर लेकीचा बार उडवायचा. सारं काही पक्कं ठरलं. शांतूला लगीन म्हणजे छान छान कपडे दिसत. गळ्यात सोन्याची बोर माळ. ढीगभर पाहुणे नि गोडाधोडाचं जेवण, एवढेच कळे. त्या साली पाऊस पडलाच नाही. पोळा उलटून गेला तरी आभाळ कोसळलं नाही. सारीच रानं उजाड .... रिकामी. कुंभाराचा धंदा तरी कसा होणार ? कधी नाही ते सावकाराच्या दारात जावं लागलं. इकडचं तिकडचं करून मार्गशीर्षात लगीन पार पडलं. पण सहा माशाच्या मुदीचा वायदा काही पाळता आला नाही. पटक्यात... डोक्यावरच्या फेट्यात हात बांधून शांतूचा बाप व्याह्यासमोर उभा राहिला नि विनवणी केली. लेक शहाणी झालेली नाही. शाणी झाली की नांदाया पाठवू. तवा सहा माशाची मुदी नि लोखंडी पलंग, गादी पाठवू. एवढी वेळ निभावून घ्या. सासऱ्यानं मानलं. 'सासू शहाणीसुरती बाई. त्यातून हवं तसं इरकली लुगडं मिळालं म्हणून खुशीत

होती. ती तोंड भरून म्हणाली, "ईवाईदादा, तुमचा मान ठेवला आमी. सोईनं मुदी करा. बरीक ईस कॅरेट सोनं घाला. चौदा कॅरेट नको. आमच्या सूनंला खारिक खोबरं खाऊ घालून, लवकर आमच्या घरी पोचती करा."

शांतू बापाच्या घरी, धानोऱ्यातच, होती. लागोपाठ दोन वर्षे पाऊस पडला नाही. गांवातली अनेक माणसे पै-पैशासाठी .... मजुरीसाठी शहराकडे धावली. आधीच थकलेला बाप एक दिवस सकाळी उठलाच नाही.. आई तर शांतूला आठवतच नाही. बापाचाही आधार उठला. मोठा भाऊ मुंबईला गेला. गांवात धाकटा राही. एक बहीण बाळंतपणात खर्चली. तशात शांतू शहाणी झाली. भावाने सासरी सांगावा धाडला. शांतूचा मोठा दीर आईला घेऊन आला. शांतूच्या भावाने सांगितले की, तो काही सहा माशांची अंगठी मुदी करू शकत नाही. चोळी बांगडी करून तो बहिणीची बोळवण करील. दीर मुदीचा हट्ट सोडीना. शेवटी सासू मध्ये पडली. लोखंडी कॉट नि गादी, जावयाला टॉवेल टोपी नि शांतूला लुगडं चोळी करायची. मुदीचा वायदा पहिल्या डोहाळजेवणापर्यंत पुढे ढकलला. भावानेही बहिणीच्या नांदणुकीसाठी थोडीफार अडचण सोसून, तिची पाठवणी केली. शांतू सासू सोबत बोरगावला गेली. पण नवरा मात्र लातूरहून यायला तयार नव्हता. सासू मड की, पागत्या, भावल्या, बैल आदी खेळणी करण्यात तरबेज होती. शांतू सासूच्या हाताखाली सारे शिकू लागली. मोठा दीरही लेकराबाळांसह पुण्याकडे मजुरीसाठी गेला होता. बोरगावात फक्त शांतू नि सासूबाई. मिळकत बरी होती. शांतूचा कामाचा आवाका जबरदस्त होता. नदीवर जाऊन माती आणणे, वनस्पती तोडणे, माती मळणे आदी सारी कामे ती जीव लावून करी. सासूही सूनेवर बेहद्द खुश होती. पण जसजसे दिवस जाऊ लागले तसतशी शांतू सुरेख दिसू लागली. तेज चेहऱ्यावर उमटू लागले. अशावेळी गावातल्या गुंडांची नजर तिच्यावर पडणार या कल्पनेने सासू हैराण होई. शेवटी तिने एक दिवस बैलगाडी केली. लोखंडी कॉट, गादी नि शांतू यांना त्यात कोंबून ती थेट लातूरला आली. नवरा आता चांगला थोराड दिसू लागला होता. बाविशी पार केली होती. आईने लेकाला बजावले. "तुझा माल तुझ्या दारात टाकाया आले.. लई दीस सांबाळलं मी. आता तू नि तुजी बायको. कायबी करा."

असे सांगून निघून पण गेली. त्या रात्रीची हकीकत शांतूनं

सांगितली ती अशी.

"भाभी मनाला लई आशा होती. भीती वाटत होती. शिनीमातला परसंग डोळ्यासमोर येई नि लाज वाटे. रातच्याला मी गोडा भात रांधला. वेणी फणी केली, डोळ्यात काजळ घातलं. कुंकवाचं बोट व्हटाला चोपडलं. पन काय सांगू ? रातीे लई उशिरा त्या दादाप्पा दूस पिऊन आला अन् मला सोन्याची मुदी काढ म्हनू लागला. मी रडाया लागले तर पलंगाच्या लोखंडी दांडीनं मरूस्तो मारलं मला. नि ढाराढूर झोपून गेला."

दुसऱ्या दिवशी शांतू उठली ती थेट सासूच्या दारात उभी राहिली. नंतर दोन वर्ष सासू सुना एकत्र राहात, कमवत, खात. सासूही थकली होती. शेवटी एक दिवस सासून शांतूला अंबाजोगाईला मोठ्या बहिणीच्या दारात आणून टाकले. राहीबाईला सांगितले की सांभाळ तुज्या बहिणीला. सासू दोन दिवस राहून पुण्याच्या लेकाकडे निघून गेली. शांतूच्या आयुष्याला नवे वळण लागले. नवऱ्याने मारले तरी मनात त्याच्याविषयी ओढ होती. दोघी बहिणींनी ठरविले की, शांतूने भरपूर काम करून पैसे साठवायचे. सहा माशाची मुदी नि शर्टचा पीस घेऊन नांदायला जायचे. त्यातच पाठक बाईंचे ... शाळेतील शिक्षिकेचे काम मिळाले. शांतू विश्वासाने बाईकडे पैसे जमा करी. बहिणीचा बारदाना मोठा होता. मेहुणा शाळेत चपराशी. पण चोवीस तास दारूत बुडालेला.. त्यात पेन्शनला आलेला. दोन मुकी मुलं नि चार बोलकी मुलं. असा आठजणांचा संसार. . कितीही कष्ट केले तरी मिळकत पुरत नसे. तरीही दोन वर्षात हजार रुपये साठले. त्यात थोडी पाठकबाईंनी भर घातली. बहीण, मेहुणा शांतूला घेऊन लातूरला गेले. बरोबर सोन्याची मुदी होती. शर्टपीस होता. पण तिथे वेगळाच डाव मांडलेला होता. शांतूच्या नवऱ्याच्या घरात दुसरीचं बाई त्याची बायको म्हणून उभी होती. ती आई होण्याच्या रस्त्यावर होती. मुदी नवऱ्याच्या अंगावर फेकून शांतू संतापाने जळत परत माघारी आली. पाठक बाईंनी तिला मानवलोकच्या मनस्विनी महिला प्रकल्पाचा पत्ता दिला नि शांतू दिलासा घरातली पहिली मानकरीण झाली.

शांतूने लिहायवाचायला शिकावे असा वैदेहीचा ... मनस्विनीतील संवादिनीचा नेहमी आग्रह असे. पण या बाईसाहेबाचं मन त्यात कधी रमलंच

नाही. दिलासात सहा महिने राहिल्यावर आम्ही तिची नेमणूक स्वयंपाक विभागात केली. आमच्या मम्मी ... गंगामावशी आता थकल्या होत्या. त्यांचा भारही हलका होणे आवश्यक होते. त्यातून शांतूला बालसदनातील मुलांचा लळा लागला होता. ती त्यांची काळजी घेऊ शकत होती.

शांतूची विचार करण्याची ताकद विलक्षण होती. कोणत्याही प्रश्नाचे उत्तर तिच्याजवळ तयार असे. दिलासातील महिला एका मुलीची आई होती. मुलगी मामाजवळ होती. जांबुवंतीला शरीरातील भोग छळत. बाई माणूस आहे. तिलाही शरीर वासना ... भावनांची ओढ असते. संस्थेत एक तरुण वॉचमेनचे काम करी. पहाटे पाच वाजता मम्मींला जागे करून तो झोपत असे. जांबू त्याची खोली झाडायचे निमित्त करून तिथेच रेंगाळत राही. रात्रभर जागलेल्या त्याला तिचे रेंगाळणे, वेगळ्याच नजरेने पहाणे अस्वस्थ करी. शेवटी त्याने त्याची अडचण मला सांगितली. ही अडचण डॉ.लोहियांकडे-बाबूजींकडे सांगायचा संकोच वाटला. माझ्या मनासमोर नवाच प्रश्न उभा राहिला. शरीराच्या नैसर्गिक मागण्या संपन्नतेने पूर्ण करणाऱ्यांनी कोणत्या भाषेत त्यागाच्या नि उपवासाच्या प्रतिष्ठेच्या कहाण्या सांगायच्या ? मी बेचैन होते. माझी व्यथा मी शांतूसमोर मांडली. शांतूचे धडक विधान."आन त्यात काय काळजी हो ? अन् एवढं काय मनाला लावून घेता ? ज्याच्या त्याच्या कपाळाची पाटी वेगवेगळीच लिहिली जाते."

तिने जांबूला समजावले ते असे. "जांबू ! यकांदा जिलबी खाल्ली काय नि रोज खाल्ली काय तिची चव येकच की ! तुज्या नसीबात रोजची आठवन आली तर चव आठवावी नि समाधान मानावं. अगं तुला तरी पोटची लेकं आहे. तुजं आजचं आयुष्य शिक्षान नाही म्हणून नासलं. लेकीला शिकीव. पायावर हुबी कंर. त्यासाठी लई कस्ट करावे लागनार. अशी इकडे तिकडे हुंगत बसलीस तर पोरीचं जीवन बी नासून जाईल. जरा शानी हो. दिलासात आलोय आपन. नामी संधी मिळाली. तिचा फायदा घे नायतर तुझ्या माझ्यासारख्या कितीतरी बाया ढोराच्या मौतीनं मरताहेत.... चल लाग कामाला. !"

अशा या शांताने आपल्या मोठ्या बहिणीचे घर पूर्णपणे बदलून

टाकले. राहीबाई खूप कष्टाळू. नवऱ्याला सतराशे रुपये पगार असला तरी तो सारा दारूतच जाई. दोन मुलं मुकी. दोन वेळेला हातातोंडाची गाठ पडण्याची मारामार असे. शांतूने मुलांना शाळेत घालायला लावले. मुक्या मुलाचे नाव मूकबधिर विद्यालयात घालायला लावले. मुलांचे भाची शिवण शिकायलाही येत असे. बालसदनच्या मुलांची माया करतांना ती त्यातच रमत असे. एक दिवस आमच्याकडे लोणावळ्याहून पत्र आले की तेथील बालग्राममध्ये माता हवी आहे. शांतू जाण्यास उत्सुक होती. पण ना लिहिता येतं की वाचता येतं. मग हिशेब कशी लिहिणार ? तरीही आम्ही तिचे नाव पाठवले आणि तिची निवडही झाली. जाण्यापूर्वी तिच्या नवऱ्याविरुद्ध केलेली केसही जिंकली. पण शेवटी तिलाच त्याची कीव आली. त्याने शांतूला भरपाई म्हणून अवघे पाच हजार रुपये दिले. कायदेशीररीत्या शांतू वेगळी झाली. तिचे म्हणणे असे, "त्या गाडवाने तिलाबी फशीवलचं की. मी तिला कसा दोस देऊ ? तिचं लगीन तिच्या भावानं लावलं. मला न का मिळेना सौंसार कराया. तिने तरी लगनाची बायकू म्हणून राहावं. तुमीच सांगितलं न्हवं ? की पयल्या लगनाची बाईच खरी बायकू असते. दुसरीला ठिवलेली म्हनतात. भलेही देवासमूर हार घातले असतील. मी सोडचिठ्ठी मान्य केली तर तिचं लगीन खरं मानतील नव्हं ? मी मायबाप नसलेल्यांचा सौंसार करेल. मायबापाविना वाढणाऱ्या लेकरांची माय होयाला आवडल मला."

शांतू लोणावळ्याच्या आंतरभारती बालग्राममध्ये खूप चांगल्या रीतीने राहिली. गेल्या दोन तीन वर्षापूर्वी त्यातील एकाने बालग्राम भाज्याला सुरू केले आहे. त्या बालग्राममध्ये शांतू केवळ 'बालसदनमाता' म्हणून काम करीत नाही तर त्या संस्थेच्या कार्यकारिणीची ती सन्माननीय सदस्य आहे. तीन वर्षापूर्वी आदर्श सदनमातेचा पुरस्कारही तिला मिळाला आहे.

राहीबाईचा दारूडा नवरा आता या जगात नाही. राहीच्या मूकबधिर मुलाला पनवेलच्या मूकबधिर विद्यालयात घालण्याचे काम शांतूने केले. उरलेल्या मुलांच्या शिक्षणाचीही जबाबदारी घेतली. शांतू दिलासात आली; त्याला दहा वर्षे झाली आहेत. शांतू एकटीच उगवाईच्या दिशेने प्रवास करीत नाही तर अनेकांपर्यन्त ही उगवती दिशा तिने पोहोचवली आहे. या दहा वर्षात शांतूचे जग बदलले आहे. कालपर्यंत ती जगासाठी होती. आज जग तिचे आहे. आभाळ तिच्यासाठी आहे.

# कहाणी निर्मलाची

निर्मला मातोळेबद्दलच्या बातम्या अधूनमधून कानावर येत असतात.. ती पुण्याला अमूक कंपनीत काम करते. पगार बरा मिळतो, चुलत भावाच्या घरी राहाते इत्यादी. एक दिवस अचानक त्या कंपनीत तयार होणाऱ्या पदार्थांचे पॅकबंद पुडे घरी आले. सोबत वार्ताही आली की निर्मला संस्थेच्या दिलासा घरात येऊन गेली. कंपनीत तयार होणाऱ्या गुलाबजामून, जिलबी, इडली, इत्यादी पदार्थाच्या पावडरींचे पुडे तिने आणले होते. स्वत: गुलाबजाम तयार करून दिलासा घरातील सर्वांना खाऊही घातले. आणि एकेक पुडा भाभींसाठी.. म्हणजे माझ्यासाठी फारफार आग्रहाने पाठवला. मी प्रश्न केला.. "निर्मलेला घरी का आणलं नाही ? नाहीतर मी आले असते भेटायला. निदान कळवायचं तरी."

बाई तुमच्यासमोर यायला संकोच वाटतो पोरीला. शिवाय रात्रीच्या बसनी पुण्याला जायचं होतं. ड्यूटीला हजर राहायचं होतं. गंगामावशीनी.. मानवलोकच्या मम्मीने सांगितले. ही मम्मी म्हणजे गंगामावशी पवार. मम्मी आणि निर्मला यांचे नाते सख्ख्या मायलेकींपेक्षा जवळचे होते. एक दिवस मम्मींच्या तोंडूनच कळले की संस्थेच्या बालसदनमध्ये वाढलेला, धोराड बांध्याचा अनाथ मुलगा बाबू आणि निर्मला पुण्याला एकत्र राहातात. हे सांगताना मम्मींची मान खाली गेलेली. आवाज काहीसा कापरा झालेला. "काय करावं बाई ? आपलंच मीठ आळणी. या पोरींसाठी काय कमी उस्तवाऱ्या केल्या ? लातूरला काय कमी खेपा झाल्या ? आणि बब्याला तर लहानाचं मोठं केलं. दहावीपसवर ढकलीत आणलं. आन बघा काय वाढून ठिवलं त्यांनी आपल्या ताटात ? बाबूपरीस ही पोरगी सात आठ वरसांनी वडील असंल. तरी देखील असं वागावं तिनं ? हितंसुद्धा बाबूला जेवण वाढाया लगीबगी उठायची. त्याच्यासाठी चांगलंचुंगलं बाजूला काढून ठेवायची. मला वाटायचं की वडील भैनीप्रमाणे करतेय. पण झालं वेगळंच ... ताई नसिबाचे भोग बरे म्हणायचे, एवढा या शरीराचा भोग.. रोग तरास देतो. त्यानंच असं काही बाही घडतं." मम्मी सांगत होती.

निर्मला पुण्याला जाऊनही सहासात वर्ष होऊन गेली आहेत. गेल्या दहा अकरा वर्षात सुमारे पावणेदोनशे निराधार , एकाकी, गरजू स्त्रिया दिलासाघरात राहून गेल्या. त्यांच्या कहाण्या, तिथेच आणि त्यांच्यातीलच

एक होऊन राहाणाऱ्या मम्मीच्या ओठावर असतात. पण त्यातील काहींची आठवण मात्र तिला नेहमीच येत राहाते,... सतावीत राहाते. निर्मलाची कहाणी अशीच. सतत आठवत राहाणारी. तऱ्हेतऱ्हेचे प्रश्न समोर खडे करणारी. कहाणी आठ दहा वर्षांपूर्वीची. पण आजही डोळ्यासमोर जशीच्या तशी उभी राहाते.

... "भाभी, निर्मला मातोळेला आपल्या दिलासा घरात राहायला यायचेय. तिने मांडव्यांच्या बालवाडीताई सोबत निरोप पाठवलाय. ... आठवते ना निर्मल ? ती औशाची केस. महाराष्ट्रभर गाजलेली. मग काय पाठवू निरोप ?" पलीकडून दामिनी, आमच्या मनस्विनी महिला प्रकल्पातील कार्यकर्ती, जिला आम्ही संवादिनी असे म्हणतो, ती विचारीत होती. खरे तर हा प्रश्न विचारण्याची गरज नव्हती. परंतु आपल्या कोणत्याही कामात, 'व्यक्तिमत्त्वा'ची बाब अगदी आतून नको तितकी आणि नकळत मिसळलेली असते. आपण हा उपचार पाळतो. मग त्याचीही सवय होऊन जाते. तो न पाळणे गंभीर बाब ठरते.

"अगं, तिला प्रवेश देऊन फोन करायचास. गरजू स्त्रीला अर्ध्या रात्री आधार देऊन दिलासा देणारे घर म्हणतो ना आपण ? मग ? " माझी ही वाक्यं सुद्धा आता 'ध्वनिमुद्रित' झाल्यासारखी तोंडातून बाहेर पडतात. मी फोन ठेवला आणि माझ्या मनात निर्मलेचा कोरा चेहरा आकारू लागला.

.... डोक्यावरचे केस पूर्णपणे कापून गोटा केलेला. त्यावर फोड आलेले. खोबणीत जाऊन बसलेल्या डोळ्यातली विलक्षण जिवंत पण बिथरलेली नजर. निर्मलेला पाहाण्यासाठी गावातल्या अर्ध्याहून अधिक महिला वैद्यकीय महाविद्यालयाच्या दवाखान्यात गर्दी करून गेल्या होत्या. महाराष्ट्रातील प्रत्येक वर्तमानपत्रात, तिच्यावर लादलेल्या मृत्यूसमान तुरुंगाची, ... सहा महिन्यांच्या अंधारकोठडीची भीषण कहाणी नोंदवली गेली होती. त्या वर्षीच्या गणेशोत्सवात तिची कहाणी सांगणारे करुण देखावे मांडले गेले होते. अशी निर्मला, वडिलांच्या घरून संस्थेत येऊ इच्छित होती. का ? ते तर तिचे माहेर होते. तिथेही ती उपरी होती का ? दुसऱ्याच दिवशी मोठ्या बहिणीला बरोबर घेऊन ती संस्थेत दाखल झाली. दवाखान्यात होती तेव्हा डोक्याचा पार गोटा होता. गेल्या चार महिन्यात डोईवर थोडे काळे केस आले होते. डोक्यावर पदर घेतला तरच तिच्याकडे बघवत असे. एरवी

काळजात घालमेल व्हावी असा अवतार. सतत रडून रडून डोळ्याभोवती काळेपणा आलेला. सूज आलेली. एका डोळ्यात फूल पडले होते. हाताची कोपरे आणि पायाचे गुडघे सतत त्यांवर लोखंडी बत्ता मारल्याने हिरवेनिळे पडलेले होते. मुळात चांगली उंची नि दुहेरी हाडाचा बांधा. पण आता एवढी काटकुळी झाली होती की फुंकर मारल्यावर उडून जावी ! तिचा हात मम्मीने हातात घेतला. पाठीवरून हात फिरवला. आणि दोघींचे डोळे भरभरून वाहून लागले. आमच्या, नेहमीच्या रीतीनुसार दोनतीन दिवस तिला फारसे प्रश्न विचारायचे नाहीत आणि दिलासा घरातील वातावरणात मिसळून जाण्यास मदत करायची असे ठरले. आणि दोनच दिवसात मनाच्या सगळ्या कळ्या उकळल्या. मोकळ्या झाल्या. तिच्या चेहऱ्यावर तरतरी आली. दिलासा घरात आलेली महिला आमच्यात मिसळून जाण्यासाठी सर्वात महत्त्वाची मदत होते मम्मींची. मम्मीचे नाव गंगाबाई. वयाच्या नवव्या वर्षी लग्न झाले आणि सालभरात नवरा खर्चला. वैधव्य आले. तेव्हापासून दिराच्या नाहीतर भावाच्या दारात कष्ट करून, दिल्या अन्नात आनंदी राहायचे ही हजारो वर्षांपासून चालत आलेली रीत गंगाबाईनेही मनोमन पाळली. दुसरे काय होते हातात ? १९७९ चा सुमार. डॉ.लोहिया 'आणीबाणी वासी' होते. १९ महिने गजाच्या आड. आणि नेमक्या त्याच काळात संस्थेला बालसदन चालवण्याची परवानगी मिळाली. माझ्या नजरेने या मम्मीला केव्हाच हेरून ठेवले होते. आणि दिवाळीत गंगाबाई ९ बालकांच्या मम्मी झाल्या. गेल्या वीस वर्षांपासून त्या मानवलोक परिवाराच्या मम्मी ... मायमाऊली झाल्या आहेत. हजारोंच्या पोटात मम्मीचे प्रेमळ हात पोचले आहेत. आमची अडाणी मम्मी अनुभवातून खूप काही शिकली. अनुभवातून सुदृढ आणि सुजाण झालेला तिचा मायेचा आधार दिलासातील मुलींना अधिक मोकळं करतो. अधिक बोलकं करतो.

निर्मलाही दोन दिवसात हसू लागली. धिटाईने बोलू लागली. स्वतःची कहाणी सलगपणे सांगण्याची, त्यातील संगती शोधण्याची समज तिच्यात आली.

निर्मलेचं घर खाऊन पिऊन टंच. वडिलांच्या दारात बैलबारदाना बांधलेला. पडवीत एक गाय नि दोन म्हशी. वडील ग्रामपंचायतीत निवडून येणारे. बाहेरची बैठक आणि आत अंगण, त्या पलीकडेच स्वैपाकघर, न्हाणी, कणग्यांच्या खोल्या. बैठक नि अंगण यामध्ये जाड चवाळ्यांच्या पोत्याचा पडदा टांगलेला. बायामाणसांनी परगावी ... माहेरी वा सासरी

जाताना पायातल्या चपला हातांत धरून डोक्रीवरचा पदर अंगभर लपेटून किंचित वाकून, बैठकीतून बाहेर पडायचे हा रिवाज. वडिलांनी मुलींना शाळेत बरीक घातले. पण ती 'शहाणी' होईस्तो. म्हणजे मासिक पाळी सुरू होईपर्यंत. थोरली श्यामी सातवीपर्यंत शिकली. पण निमूला सहावीतच नहाणं आलं नि ऐन परीक्षेच्या तोंडावर घरी बसावं लागलं. लगेच धावाधाव सुरू झाली. औशाच्या पोलिस हवालदाराचा मुलगा. त्याचीही पोलिसखात्यात निवड होणार होती. पांढरीत स्वतःचे घर आणि काळीत आठ एकराचं शिवार. सारं छान होतं. भरपूर पैसा लावून पोरगी उजवूनं सावळे पाटील मोकळे झाले.

तेरा चवदा वर्षाच्या मुलींना विवाहानंतरचे जीवन नवेच असणार. काही माहीतच नव्हते असे नाही. श्यामी ताईने सांगितले होते, "गाईवर जसा बैल चढतो ना तसेच सारे, त्रास मात्र खूप होतो. पण मग होते सवय हळूहळू" खेड्यातील मुलींच्या भवताली कुत्री, मांजरं, गाढवं, म्हशी, गायी, कोंबडे यांचा कमी का गोतावळा असतो ? त्यातून खूप काही सहजपणे कळत असते. निमूला त्या गोतावळ्यात आपणही असतो हे कळू लागले. पण नवरा पोलिस व्हायच्या आधीच ऐट करी. घरी पिऊन येई. राडीतांड्यावरून पहिल्या धारेची रोज घरी येत असे. लाडका लेकही बापाबरबर साथीला असे. रोन कोल्हापुरी मसाल्याचं मटण लागे. कधी कधी या साऱ्याची एवढी किळस यैई की डोंगरात जाऊन बकाबका ओकावसं वाटे. निमू माहेरी आलेली तिला वाटायचे एक आठवड्याचा एक दिवस व्हावा नि अशा दिवसांचा एक महिना माहेरी राहावे. सासरी गेलेली मुलगी माहेरवाशीण म्हणून घरी आली की तिला खूप मोकळेपणा असे. गावात कुठेही हिंडता येणार ... मैत्रिणीकडे जाता येणार ... शेतात फेरी मारायला आडकाठी नाही .... सारे कसे मोकळे नि छान. पाहाता पाहाता वर्ष निघून गेले.

लग्नात ११००० रु. रोख, तीन तोळे सोने, वधू वराचे कपडे, मानपान, दोहोकडचा खर्च, एवढे सारे करूनही निर्मलाच्या सासरच्यांची भूक भागलेली नव्हती. वर्षसणाच्या निमित्ताने मोटारसायकल माग असा लकडा त्यांनी मुलामागे लावला. आणि मग निर्मलाला मारहाण करणे सुरू झाले. सासू-सासरे, नणंद यांचे कुजकट बोलणे तर नेहमीच सहन करावे लागे. निर्मला पैसे आणण्यासाठी माहेरी जाण्याचे नांव काढीत नाही असे

पाहून ९ ऑक्टोबर १९७८ रोजी तिच्या वडिलांना 'निर्मला मरण पावली' अशी तार केली. तात्काळ आई-वडील रडतभेकत औशाला आले तर तिथे निर्मला समोर दिसली. कारण विचारताच मुलीची नांदणूक व्हायची असेल तर मोटारसायकल द्या अशी मागणी केली. निर्मलाच्या वडिलांनी नाइलाजाने ४ एकर जमीन विकली आणि जावयाला ४००० रु. दिले. उरलेले पांच हजार रुपये लवकर देतो असा हवाला दिला. परंतु ते वेळेवर देणे जमले नाही. मारहाण, शिवीगाळ यांच्या वर्षावात निर्मला मुकाट्याने आला दिवस पार करीत होती. दोन वर्ष निघून गेली. निर्मलाच्या नवऱ्याने जवळच्याच खेड्यातील मुलीशी दुसरा विवाह केला. नवी नवरी निर्मलाच्या सासूची लांबची भाची म्हणून घरात आली.

निर्मलाला ताकीद दिली गेली की, सवतीची ओळख मावसनणंद म्हणून करून द्यायची. जर तिने खरी गोष्ट सर्वांसमोर आणली तर तिचे तुकडे करून टाकले जातील असा सज्जड धाकही घातला. दरम्यान निर्मलाचे सासरे पोलीस नोकरीतून सेवानिवृत्त झाले व त्यांनी आपल्या मुलास सुधाकरास पोलिस खात्यात नोकरी द्यावी यासाठी खटपट केली. त्यास यश आले आणि सुधाकरची पोलिस प्रशिक्षणासाठी निवड झाली.

निर्मलाव्यतिरिक्त सारे घर सुखात होते. मुलाची पोलीस भरतीत निवड झाली. त्याला दुसरी बायकोही मिळाली. आता निर्मलेची अडचण मात्र सर्वांना जाचू लागली. तिचा खंगलेला चेहरा, खाली पाहून निमूटपणे काम करत राहाण्याची वृत्ती, सतत रडणारे डोळे पाहून सासऱ्याला वाटले की हिला पहाटे मारहाण करून हाकलून दिले तर ती एखादी विहीर गाठील नि प्रश्न सुटेल. पण झाले वेगळेच. सासरा, नवरा ... सासू यांनी मिला मारहाण करून पहाटेच्या अंधारात बाहेर काढले. जीव देणे अवघडच असते. जीवाची आशा कोणाला नसते.? निर्मला पाय ओढीत वडिलांच्या मित्रांच्या जांवयाकडे बहिणीच्या मैत्रिणीकडे गेली. तो औशातच राही. तिची दशा पाहून मित्राची मुलगी व जावई द्रवले. तो दिवस तिने त्यांच्या घरीच काढला. जावयाने तात्काळ सासऱ्यांना व निर्मलाच्या वडिलांना बोलावून घेतले. त्याच काळात जिल्ह्याला अत्यंत कर्तव्यदक्ष पोलीस प्रमुख लाभले होते. त्यांच्या कानावर ही गोष्ट निर्मलाच्या वडिलांनी घातली. त्यांनी प्रकरणाची शहानिशा करून सुधाकरची प्रशिक्षणासाठी झालेली निवड रद्द केली. सुधाकरला तात्काळ घरी पाठवले.

निर्मलेला घेऊन वडील मांडव्याला परतले. मांडवा डोंगरातलं लहानसं खेडं. मातोळे पाटलांच्या घरातला हा बखेडा कुणालाच माहीत नव्हता. माहेरवाशीण चार दिवसांसाठी आली तर लाडाकोडाची. पण महिनोन्महिने राहिली तर त्याची चर्चा होते. घरच्यांना टोमणे बसतात. तसेच होऊ लागले. त्यात सुधाकरच्या बापाचा ... सासऱ्यांचा दोनदा सांगावा आला. निमूच्या सवतीला ... मावसभाचंदेला त्यांनी परत पाठवले होते. निर्मलाने परत यावे असा आग्रह त्यांनी धरला. घरी आई नि मोठी बहीण म्हणत की बाईचा हट्ट किती चालणार ? शेवटी मारतो आपलाच नवरा. बाहेरचा तर कोणी मारत नाही ना ? नवराच बायकोवर हक्क दाखवणार. निमूलाही सुधाकराची आठवण येई. कित्येक दिवसात .. महिन्यात ... दोन वर्षात त्याची संगत मिळाली नव्हती. सासऱ्यांचा सांगावा तिने झेलला. आईकरवी वडलांना निरोप दिला की औशाला नेऊन घाला, पोचती करा. नाहीतरी म्हणतातच की बाईचा जलम, चुलीतल्या ढलपीचा, मुक्याने जळतांना, राख व्हावे. निमूची औशाला पाठवणी झाली. सासरचे वातावरण होते तसेच होते. ती दुसरी बया बरीक नव्हती. सासरा गोडीने सांगे की झालं गेलं विसरून जा. जर तू औरंगाबादच्या मोठ्या सायबांना सांगितलं तर सुधाकरला परत ट्रेनिंगला घेतील. ट्रेनिंग संपलं की बदलीच्या जागी नवं घर करून देऊ. सासूचा त्रास सुटेल. नवा संसार सुरू होईल. सुधाकर ही हेच सांगे. कधीकधी कांगावा करी.

निमू सासरी परतल्यानंतरची दोन वर्षे माहेरशी संबंध नव्हता. ना माहेरी जाणे वा माहेरच्यांनी लेकीला पहायला येणे. त्यात अधिकाचा महिना आला, जावयाने ठरवले की अचानक निर्मलाच्या वडिलांच्या ... सासऱ्यांच्या दारात जायचे, अधिकाचे धोंडे खाऊन मोटारसायकलच्या पैशांची वसुलीही करून घ्यायची. सुधाकर एक दिवस अचानक सासऱ्याच्या दारात मोटारसायकलं घेऊन उभा राहिला. निमूला बालाजीला पाठवल्याचे सांगितले. सारे काही झकास चालले आहे, याचा निर्वाळा दिला आणि मोटारसायकलचे हप्ते भरले नाहीत तर गाडीवर जप्ती येईल, असेही सांगितले. सासऱ्याने इकडून तिकडून हातमिळवणी करून दोन हजार रुपये जावयाच्या हातात ठेवले. पुरणाच्या धोंड्याचे वाण जावयाला दिले नि बोळवण केली.

.... निमूला यात्रेला नेण्याचा देखावा सासूने केला. पण तिची बालाजीची यात्रा झाली वरच्या मजल्यावरच्या अडगळीच्या खोलीत. त्या

खोलीत निमूला कोंडून ठेवले. सर्व खिडक्या बंद, दाराला कुलूप. विधी करण्यासाठी एक घमेले ठेवले. एका भिंतीच्या वरच्या व्हेंटिलेटर मधून जाळीमधून हवा नि उजेड येई त्याचीच काय ती सोबत. रात्री वारा वाजून गेल्यावर सासू येई. दरवाजातून एक चतकोर भाकरी, वाटीभर पाणी देई. दिवसभरातील घाण नाकाला पदर लावून इकडे तिकडे बघत बाहेर टाकी. पुन्हा दरवाजा बंद. असे महिन्यांमागून महिने जात होते. चार महिने झाले तरी निमूला मारून टाकून तिची विल्हेवाट कशी लावायची याचा मार्ग सापडत नव्हता. सुधाकर नि त्याचा बाप दोघेही पोलीस विभागातले. त्यामुळे कायद्याची भीतीही वाटत असणार. निमूला मारून तिचे तुकडे करून ते बाहेर नेण्याचाही घाट घातला. सुधाकर तसा बिनडोक्याचा. त्याने कुऱ्हाड करून आणला आणि रात्री एक्कीड वाजता निमूच्या हाताच्या बोटाचे पेर कुऱ्हाडीर मधून कापले. जीवाच्या आकांताने ती किंचाळली नि मग सारे घरच घाबरले. तिचा आवाज आजूबाजूच्या लोकांनी ऐकला तर धोकाच होता. मग कुऱ्हाडीच्या बेत रद्द झाला. निमू उपासमार, घाण यांनी ... 'नैसर्गिकरीत्या' मरावी म्हणून इतरही उपाय केले जात. तिला मुंग्या लागाव्यात म्हणून भोवती साखर पेरली. तिचे मन खचावे म्हणून समोर कॉट ठेवून त्यावर जाते, दगड बांधलेला विळा वगैरे सामान ठेवले. सहा महिने उलटले. डोक्याला तेल नाही. अंगाला पाणी नाही. पोटात रोज वाटीभर पाणी नि चतकोर भाकरीचा खुराक जात होता. त्यामुळे अंगावरचे नसलेले मांसही झडून गेले. डोळे खोल गेले.

निर्मलाला मारून टाकून विल्हेवाट लावण्यापूर्वी खुनाच्या आरोपात अडकू नये याचीही खबरदारी घेतली होती. स्थानिक वर्तमानपत्रात निवेदन दिले की, आमची तरुण सून बालाजी यात्रेला गेली असताना तिथे हरवली. ती सापडली नाही. कोणाला सापडली तर त्याने कळवावे. इनाम मिळेल वगैरे... माणसाच्या शरीरातील आणि मनातील जीवेच्छा इतक्या बळकट असतात की प्रतिकूल वातावरणातही माणूस जीव जगवत राहातो. जपत राहातो. निमूही जगत होती. मरावेसे वाटले तरी जगत होती.

एक कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी आणि न्याय मिळवून देणारा अधिकारी त्या जिल्ह्यात काम करीत होते. त्यातूनही एका तरुण अधिकाऱ्याच्या कारकीर्दीची सुरुवात असल्याने एक विलक्षण धडाडी त्याच्या कार्यपद्धतीत होती. जिल्ह्याच्या बाहेरही त्यांच्या नावाचा बोलबाला होता.

या बाबीचा फायदा निमूला नकळत मिळाला. आता या प्रकरणाबाबत अभ्यास करीत असताना आमच्या लक्षात आले की निमूच्या सुटकेच्या मुद्यावर काही 'रंजककथा' रचल्या गेल्या. अर्थात या कथांमुळे मूळ प्रकरणाला बाधा येत नाही. एक कथा अशी.

एक दिवस वरच्या व्हेंटिलेटर मधून ... खिडकीतून एक चेंडू खोलीत टपकला. दुपारची वेळ असल्याने सासू झोपली होती. एरवी मुलांनी माडीवर येऊन वरच्या खिडकीतून डोकावण्याचे धाडस केले नसते. एक पोरगं गुपचूप वर आलं. बंद खिडकीचा आधार घेऊन व्हेंटिलेटरमधून चेंडू पाहण्यासाठी आत डोकावलं. आतील भेसूर निमूवहिनीचा अवतार पाहून निमूवहिनीचे जिवंत भूत वरच्या खोलीत राहाते. ते चालते. त्या भुताने त्यास बोलावले. असे मुलाने सांगितले. तो मुलगा घाबरून आजारीही पडला. त्याच्या आईवडिलांनी पोलिसात कळवले आणि मग निमूची सुटका झाली.

निर्मलाने सांगितले ते असे. तिला खोलीत भयानक मारहाण केली जाई. सासूसासरे तिने ओरडू नये म्हणून तिच्या तोंडात बोळे कोंबीत व मारीत असत. तिचा सासरा हा सर्व प्रकार पाहात उभा असे. आमच्या मुलाची नोकरी तू घालवलीस. हिची बोटे तोडा, मान तोडा अशी धमकी देत असे. एकदा सासूने तिला पेटवून देण्याचा प्रयत्न केला व तिला पेटविले देखील. पण ती आरडा-ओरडा करील व आपले बिंग बाहेर फुटेल या भीतीने तिच्या सासऱ्याने तिचे कपडे विझवले. नणंद, सासू, सासरे यांच्या जाचाने तिचे मानसिक बळ कमकुवत झाले होते. सासरा बुटाच्या लाथा मारीत असे. सासू तिला तुडवीत असे. अंधाऱ्या खोलीत एकाच जागी तिला बसून राहावे लागत असे. आडवे होऊन झोपायचे नाही, झोपली तर सासू तिचे गुडघे, हाताचे कोपरे, लोखंडी बत्त्याने सडकून काढीत असे. दररोज तिला रात्रीच्या सुमारास खोली उघडून अर्धी भाकरी नि एक वाटी पाणी तेवढे मिळत असे. त्यावरच ६ महिने ती गुजराण करीत होती. विवाह प्रसंगी निर्मला फार छान दिसत होती. गुडघ्यावर तोंड टेकवून बसल्यामुळे तिच्या गालाला जखमा झाल्या होत्या. एकाच जागी बसून मांड्यांना जखमा झाल्या होत्या. बसलेल्या जागेभोवती साखरेचे रिंगण केल्यामुळे मुंग्या होऊन तिला चावीत असत. एवढा जाच सहन करूनही जर का ती झोपली तर तिला [illegible] खाव्या लागत. खोलीच्या बाहेर पडण्यास बंदी असल्यामुळे नैसर्गिक विधी तिला खोलीतच उरकावे लागत. सहा महिन्यात निर्मलाला तोंड धुवायला

ग्रंथालय
अंबाजोगाई-४३१५१७, जि. बीड

मिळाले नाही की आंघोळीला पाणी सुद्धा मिळाले नाही. सहा महिने ती एकवस्त्रा होती. कित्येकदा सासूने डोक्यात तिखट टाकून मारले. ती कोठडीत असताना तिचा भाऊ व वडील तिच्या भेटीसाठी आले होते. परंतु ती घरात नाही परगावी गेली वगैरे खोटी कारणे सांगून त्यांना पिटाळून लावले होते. तू जर ओरडलीस तर तुझ्या भावाला आम्ही मारून टाकू अशी धमकी तिला राहिली होती. मांडवा गाव एक खेडे. तिथे पेपर कुणाला येणार ? त्यामुळे बालाजीला गेलेली निर्मल हरवली असल्याचे सासऱ्यांनी दिले होते, ते त्यांच्या वाचण्यात आले नाही. त्यांना वाटे की निर्मला मजेत आहे.

एके दिवशी तिच्या नणंदेची मैत्रीण घरी आली. तिला घेऊन नणंद गच्चीवर गेली असताना मैत्रिणीने सहज खिडकी उघडली तर आत निर्मला. मैत्रिणीने पाहिले आता ती बाहेर सांगेल म्हणून तिच्या नणंदेने तिला १०० रु. देऊ केले. मैत्रिणीने धाकास्तव पैसे घेतले व कोणाला सांगणार नाही असे म्हटले. परंतु घरी जाऊन तिने सर्व हकीकत आई-वडिलांना सांगितली. मैत्रिणीच्या वडिलांनी जिल्हा पोलीस अधिकाऱ्यांना सर्व हकीगत पत्राने कळविली.

एक दिवस सकाळी ६ वाजता पोलिसांची जीप दारात येऊन उभी राहिली. त्यामध्ये एक महिला पोलिसही होती. तिने निर्मलाची चौकशी केल्यावर, सासूने सांगितले की निर्मला घरातून पळून गेली आहे व ते पेपरमध्ये सुद्धा दिले आहे. तो पेपर तिने आणून दाखविला. ती पेपर आणावयास गेली यावेळी तिच्या मागोमाग स्त्री पोलिसही आंत गेली. निर्मलेला शोधले. निर्मला सापडली नाही. गच्चीवर अडगळीची खोली आहे असे सांगून त्या खोलीत नेण्याचे सासूने टाळले. परंतु गच्चीवरच्या खोलीत अखेर ती त्यांना दिसली. निर्मलाला खोली बाहेर काढले. त्यानंतर अंबाजोगाईला शासकीय रुग्णालयात दाखल केले. तिथे उपचार करून तिला माहेरी, सुरक्षित ठिकाणी पाठवले. सुरुवातीस अनेक लोक येऊन भेटत. सहानुभूती व्यक्त करीत. जसजसे दिवस जाऊ लागले तसतसे एकाकीपण वाढू लागले. दरवेळी .... प्रत्येकाला तीच ती गोष्ट खुलवून सांगण्याचा कंटाळा येऊ लागला. नि मग मनात येई, पुढचे आयुष्य कसे जाणार? तिची ,एक मोठी चुलत बहीण शकू गावातच दिलेली होती. एका मुलीला जन्म दिला. पंचमीच्या निमित्ताने माहेरी आली ती परत गेलीच नाही. नवऱ्याला बाहेरचा नाद होता. दारूसाठी शेत विकीत राहाणे एवढाच त्याचा उद्योग. तिच्याशी

निर्मला मन मोकळं करीत असे. भावांच्या दारात धुणीभांडी घाशीत नि शेतात मरेस्तो कष्ट करीत बसण्यापेक्षा, स्वतःच्या पायावर उभे रहाणे सर्वात सोयीचे असे शकू नेहमी सांगे. निमूने येत्या २/३ वर्षात पायावर उभे राहावे असे ती म्हणे. एकदा का या भट्टीत आपण शिरलो की पुन्हा सुटका नसते. तिनेच मनस्विनी महिला प्रकल्पाची माहिती निमूला दिली. आपली दुःखी लेक संस्थेत जाणार म्हटल्यावर मातोळे पाटील रागावले. परंतु निर्मलेच्या हट्टापुढे त्यांना हार खावी लागली. आणि निर्मला मनस्विनीत दाखल झाली.

सरकारच्या .. शासनाच्या वतीने तिचे प्रकरण न्यायालयात दाखल झाले होते. अत्यंत धाडसी आणि कर्तव्यदक्ष जिल्हा पोलिस अधिकाऱ्याच्या पुढाकाराने प्रकरण न्यायालयात गेले असल्याने, तिच्या मनात आपल्याला नक्की न्याय मिळेल याबद्दल खात्री होती. आम्हीही या प्रकरणी सतत शासकीय वकिलांशी - पी.पी.शी संपर्क साधीत होतो. पण प्रकरण न्यायाधीशांसमोर येत नव्हते. दरम्यान पोलिस अधिकाऱ्याची बदली झाली. आम्ही एकूण अंदाज घेत असताना असे लक्षात आले की बरेच साक्षीदार बदलले होते. वकिलांच्या शब्दातही 'जरतारी' भाषा येऊ लागली होती. अर्धवट शिकलेल्या, गासाने खचल्या आहेत, अशा स्त्रिया न्यायालयाच्या पिंजऱ्यात उभ्या राहिल्या की खूप एकाकी होतात. त्यांच्यातील सारे धैर्य अक्षरशः गळून जाते. आमची कार्यकर्ती दरवेळी निर्मलाबरोबर लातूरच्या जिल्हा न्यायालयात जात असे. परंतु त्याचा फारसा उपयोग होत नाही असे लक्षात आले. विरुद्ध पक्षाचा वकील तारीखवारांवर विशेष भर देऊन गोंधळात टाकतो, त्यामुळे घराबाहेरच्या जगाशी अजिबात ओळख नसलेली, अक्षर ओळख नावालाच असलेली बाई फारच भांबावते. वकिलांनी घोटवलेली वाक्ये विसरून जातात. घडलेल्या गोष्टी आठवेनाशा होतात. शब्दच उमटत नाहीत. निर्मलाचेही असेच झाले.

.... एक दिवस रात्री दारासमोर रिक्षाचा आवाज आला. पाहुणे अगदीच नवे दिसत होते. पायाने लंगडणारे. डोक्याला चष्मा. ''येऊ का आत'' असे अत्यंत अदबशीरपणे विचारून घरात आले. ते होते आरोपीचे .... निर्मलाच्या सासरच्या मंडळींचे वकील. त्यांना आमच्याशी अत्यंत महत्वाचे, खाजगीत बोलायचे होते. म्हणून ते लातूरहून रिक्षा घेऊन आले होते. मी तात्काळ आमच्या वकिलांना संस्थेत येण्यासाठी निरोप दिला आणि त्या वकिलांना घेऊन संस्थेत गेले. त्या वकिलांचे नांव आपण काहीही धरूया.

अगदी अबक किंवा क्षयज्ञ.. त्या क्षयज्ञ नं बोलण्यास सुरुवात केली.

"भाभी, मी तुम्हाला नि डॉक्टरना ओळखतो. तुमच्या संस्थेबद्दल ऐकून आहे. मला तुमच्या कामामागची भूमिका कळते. निर्मलावर अन्याय झाला आहे. हे मी पण जाणतो. पण मी वकील आहे. कायद्यातले छक्केपंजे मला कळतात. तुम्हाला वाटत असेल की राज्य कायद्याचे आहे. पण राज्य माणसाचे आहे आणि माणसे 'मॅनेज' करता येतात. त्यांना विविध प्रकारे पिळवता येते. न्याय खेचून कसा आणायचा आणि दोषी माणसांना न्यायालयातून निर्दोष कसे शाबीत करायचे याच्या खुब्या माझ्या इतक्या कोणीच जाणीत नाहीत. माझी ओळख लातूरच्या जाणकार वकिलाला विचारून घ्या.

... पण तरीही तुमच्याबद्दलचा आदर आणि निर्मलाची निष्पाप मूर्ती मला इथवर घेऊन आली. आम्ही समझोता करण्यास तयार आहोत. पंधरा हजार रुपये रोख, तिच्या माहेरून आलेली भांडीकुंडी आणि गळ्यातील मंगळसूत्राचे मणी .. जे अर्धातोळा भरतील आणि घरातील एक खोली किंवा त्याचे पैसे पंधरा हजार रुपये रोख देण्यास तयार आहोत. विचार करा आणि दोन दिवसात कळवा.

... तुम्ही नकार दिलात तर एवढीच रक्कम खर्चून न्याय आमच्याकडे खेचून आणू. मानले नाही तर 'हे गेले नि ते गेले' असे म्हणत हात हलवीत बसावे लागेल. शंभरदा विचार करा. असे सांगून क्षयज्ञ निघून गेले. जाताना मला विशेष करून बजावले ते असे.

"ताई, प्रकरण कढईत असते तेव्हा खमंग वास, दहादिशांना पसरलेला असतो. मग मोठे मोठे मोर्चे निघतात. निषेधाची पत्रंके पावसागत कोसळतात. पण आता सारी राळ जमिनीवर स्थिर होऊन बसली आहे. निर्मला मातोळे कोण हेही लोक विसरले आहेत. अशी प्रकरणे फार तर वर्षभर तेजीत असतात. हेही ध्यानात ठेवा."

आम्ही निर्मलाशी चर्चा केली. निर्मला या प्रकरणाला एवढी वैतागलेली होती की, तीस चाळीस हजार रुपये घ्यावे नि प्रकरण कायमचे मिटवून टाकावे असे तिला वाटत होते. आम्हीही तिची बाजू ... तिचे मन समजू

शक्त होतो. वडिलांचा विचार घ्यावा अशी तिची इच्छा असल्याने मातोळे पाटलांना निरोप धाडला. ते आले. त्यांचे म्हणणे असे की लेकीचे एवढे नुकसान केले नि तीस हजारावर बोळवण करतात ? किमान दीड लाख रुपये पोरीला मिळायला हवेत.

ही केस शासनामार्फत होती. आम्ही आमचा वकील देऊ शकत नव्हतो. त्यासाठी करावी लागणारी कार्यवाही अत्यंत किचकट आणि वेळखाऊ होती. तिला नैतिक धाडस देण्यापलीकडे आमच्या हाती काहीच नव्हते. मात्र अंबाजोगाईच्या कोर्टातून पोटगीचा दावा चालू केला होता. निर्मला त्या सहा महिन्यांच्या बंदिवासात इतकी जायबंदी झाली होती की, थंडीत गुडघे नि कोपरं दुखत. डोळे अधू झाले होते.. त्यामुळेच तिला मनोमन वाटे की तो पैसा बँकेत ठेवावा. येणारे व्याज आणि थोडे काम करून येणारे पैसे यांत गुजराण होईल. वडील मात्र शेवटचा आकडा लाखाचा बोलून तिथेच हटून बसले. व्हायचे तेच झाले. पुराव्याअभावी सुधाकर, त्याचे वडील निर्दोष सुटले. प्रत्येक प्रमुख वर्तमानपत्रांतून ती बातमी ठळक अक्षरांत छापून आली. अत्याचार करणाऱ्यांच्या कठोर हातातली अन्याय करण्याची ताकद आणखीन वाढली. स्त्रियांना न्याय मिळावा यासाठी सतत झगडणाऱ्या कार्यकर्त्या .... संघटना व्यथित झाल्या. निर्मला - मात्र वडिलांपासून तुटली. तिने वडिलांना लाखाचा हट्ट सोडण्याची विनंती केली होती. आम्हाला तडजोडीत स्वारस्य नव्हतेच. भूमिका म्हणून तसे करणे कितपत होईल याचा आम्हालाही अंदाज येत नव्हता. कारण "दिलासा घर" सुरू होऊन जेमतेम तीन वर्षे होत होती. आम्हीही शिकतच होतो. पण निर्णय निर्मलाने घ्यावा, तोही आमचा विचार न करता, हे आम्ही तिला पटवले होते. तिला हवे असलेले शांत व सुरक्षित जीवन तडजोडीतून मिळणार असेल तर, ती करावी अशी भूमिका आम्ही घेतली होती. वडिलांच्या हट्टापायी हातचे सारेच गेले. "घी गया और गडवा भी गया ".

नंतर मात्र निर्मला अधिक सैरभैर झाली. तिचे मन अंबाजोगाईत गुंतेना. औरंगाबादला दाई ट्रेनिंगसाठी खाजगी व्यवसाय उत्तम रीतीने करणाऱ्या तज्ज्ञ डॉक्टरांकडे ठेवले. पण त्यातही तिचे मन रमले नाही. कोणत्याही परिस्थितीत वडिलांच्या गावी स्थिर व्हायचे नाही... राहायचे नाही हे मनात पक्के ठरवले. चुलतभाऊ हडपसरला राहात होता. बाबूही वर्षभरापूर्वी हडपसरला गेला होता. त्याच्याकडून भावाचा पत्ता शोधून काढला. मसाले

आणि खाद्यपदार्थ तयार करणाऱ्यां कंपनीत पॅकिंग विभागात रोजगारही मिळणार होता. हे सारे संस्थेतील महिलांना सांगण्याचे धाडस निर्मलात निर्माण झाले नाही. खरे तर तिला बाहेरच्या जगाची ओळख व्हावी म्हणून आम्ही शिबिरांना पाठवले होते. संस्थेच्या हितसंबंधी ताईबरोबर त्यांच्या मुलीच्या लग्नानिमित्त मुंबईतही पंधरा दिवस राहून आली होती. त्यामुळे एकूण परिस्थितीच्या संदर्भात स्वतःच्या भविष्याचा विचार करण्याची ताकद तिच्यात आली होती. परंतु तरीही स्त्रीच्या मनाभोवती काही कुंपणे असतातच. ती ओलांडणे शक्य नाही.

परित्यक्त स्त्रियांनी काही काळ स्त्री-पुरुष समागमाचा अनुभव घेतलेला असतो. त्यातील सुख वा समाधान यांची शरीराला सवय झालेली असते. अशावेळी त्यांच्या भावना समजून घेणे, त्यांच्याशी सतत संवाद साधणे महत्त्वाचे असते. निर्मलाने बाबूशी विवाह करणे यात गैर काहीच नव्हते. किंबहुना तो अधिक सुखाचा आणि सुरक्षित मार्ग आहे. पती पत्नीच्या वयाचा प्रश्न, त्यांच्यातं व्यवस्थित संवाद असेल तर, उद्भवत नाही. मम्मी उर्फ गंगामावशीही तिच्या निर्णयाकडे आता वेगळ्या दृष्टिकोनातून पाहू लागल्या आहेत. पुढच्यावेळी निर्मला इकडे आली की दिलासात चार दिवस माहेरपणाला येईल. मीही तिच्याशी मोकळेपणाने बोलेन. काही दिवसांपूर्वी मम्मी तिच्या बहिणीकडे मुद्दाम जाऊन आल्या आणि निमूचा पत्ताही घेऊन आल्या आहेत. मीही आता निर्मला माहेराला येण्याची वाट पाहात आहे.

निर्मलेने भोगलेला कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, मानसिक ताण आणि त्रास आज एक कहाणी बनला आहे. आज निर्मला स्वतंत्रपणे, स्वावलंबी होऊन स्वतःचे जीवन जगत आहे हे जगणे अडचणी नसलेले आणि पूर्ण सुखी आहे असे मुळीच नाही. पण अडचणींवर मात करण्याची जिद्द वा धाडस आणि त्यांतून मार्ग शोधण्याचा डोळसपणा तिच्यात आला आहे. निर्मला दिलासा घरात राहात असताना सुरुवातीला तिला होणारा त्रास सासू आणि नणंदेच्या फुशीमुळेच कसा दिला जाई हे ती रंगवून सांगत असे. नवऱ्याला दोष देत नसे. जणू तो एक निर्जीव काठी आणि मारणाऱ्या त्या. पण संस्थेत आल्या पासून, हळूहळू तिच्यात बदल घडत गेला. दर बुधवारी दिलासातल्या महिला कायदा सल्ला घेण्यासाठी व वेगवेगळी कौशल्ये शिकण्यासाठी येणाऱ्या महिला एकत्र बसत. गप्पा, गाणी, खेळ यांच्या

बरोबर एखादा नव्याने आलेल्या प्रकरणाची वा वर्तमानपत्रातल्या स्त्री अत्याचाराच्या बातमीची चर्चा करीत. सती प्रकरणाची चर्चा तर दोन तीन बुधवारी सतत रंगली. दररोज सकाळ- संध्याकाळच्या प्रार्थनेच्या वेळी बातम्या वाचून दाखवल्या जात. त्यावरही गप्पा होत. या साऱ्यातून निर्मला, कांता, हंसा... सगळ्याच स्वत: विचार करायला नि ते बोलायला शिकल्या. धीटही झाल्या. एक दिवस मला नगराध्यक्षांचा फोन आला.

"भाभी, तुमच्या दिलासा घरातील बाया भेटायला आल्या होत्या. त्यांना बालवाडीत सेविका म्हणून नोकरी पाहिजे आहे. मी त्यांना म्हटलं की संस्थेत तुम्हाला जेवणखाण, कपडालत्ता मिळतो, राहायची सोय आहे. शिवाय त्या सांगत होत्या की बँकेत शंभर रुपयेही भरतात. मी म्हणालो की सेविकेला मिळतात अवघे दोनशे रुपये. तुमचे त्यात कसे भागणार ? तर एक म्हणाली की आम्हाला तिथे राहायचे नाही. तुमच्या कानावर घालावे म्हणून फोन केला. काय अडचण आहे त्यांना तिथे राहाण्यात ? तुम्ही म्हणाल तर करतो विचार ...." नगराध्यक्ष सांगत होते.

या तिघी परस्पर जाऊन भेटल्या म्हणून मम्मी भयंकर चिडली. मोफत कायदा मदत, मोफत शिवण प्रशिक्षण, प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर पायावर उभे राहण्यासाठी उसनवार आर्थिक मदत आदी सोयी असताना, प्रशिक्षण पूर्ण करायचे सोडून यांना दोनशे रुपयांची नोकरी करण्याची हौस का आली हे आम्हालाही समजेना. मग त्यांच्याशी मोकळेपणी गप्पा मारल्या. त्यातून बरेच धागे उकलले. आम्हीही नवे शिकलो. दिलासा घरातील शिस्त त्यांना कधी कधी नकोशी वाटे. 'घरा'चा ऐसपैस मोकळेपणा त्यांना मिळत नसे.

"मम्मी लईच कड़कड करती नि धाक घालती. एखादिवशी जरा उशीर झाला उठायला तर काय होतं ? रविवारी बी पहाटेच उठायचं का ?" एकीची तक्रार.

"भाभी आपल्या दिलासा घरात फक्त सहा जणींना आधार द्यायची सोय आहे. आता आमी आठ जणी आहोत. मग अडचणीत असलेल्या बायांची कशी सोय व्हावी ? म्हणून मीच नेलं सगळ्यांना मुनशीपालटीत. विवेकसिंधूत जाहिरात वाचली होती. म्हटलं तिघीजणींना नोकरी मिळाली तर, एकत्र राहून. घरून थोडीफार मदत घेऊ. पण स्वतंत्रपणे राहू. एकत्र

राहिलं तर कुणाची टाप आहे त्रास देण्याची ? '' निर्मला शांतपणे सांगत होती.

''हितं राहिलं की मम्मी सारखी बड बड ते की आयतं मिळतं खायला पण तुम्हाला चव नाही. हितं रहाणं म्हणजे दिल्या अन्नावर जगणं. मला आता सही करता येते. थोडं वाचताबी येतं: शिवणबी शिकलेय मी. बघू तर खरी सोवतंत्र राहून. न्हाईतर येऊच्च की हितं '' हंसा बोलली.

हे बोलणे मलाही खूप काही शिकवून गेले. विचार करायला लावून गेले. मम्मी जुन्या काळातल्या. त्या सर्वांवर अपार माया करतात. पण बोलण्यात थोड्याफार शिव्यांचा झिडकावा असतो. त्यांनाही समजावून सांगावे लागले की दिलासा घरातील महिलांना संस्थेकरवी दिले जाणारे सहाय्य म्हणजे उपकार वा दान नव्हे. सावित्रीबाई फुले मुलींचे वसतिगृह, संस्थेत कार्यकर्त्या म्हणून आलेल्या महिला आणि दिलासा घरातील महिला सगळ्याच एकत्र राहातात.. सर्वांसाठी सारख्याच सोयी असतात.. पण इतकी मंडळी एकत्र राहायची म्हणजे नियम, त्यांचे पालन आदींवर भर द्यावाच लागतो. वसतिगृहातील मुली आणि कार्यकर्त्यांना या शिस्तीची गरज माहीत असते. पण घरगुती ... तेही जाचक अशा वातावरणातून आलेल्या दिलासा घरातील महिलांना या शिस्तीची कधी कधी अडचण वाटे. भुलाबाईतले एक गाणे आहे. त्यात मुली म्हणतात.

सासरीच्या वाटे कुचूकुचू काटे
माहेरीच्या वाटे गुलाल बुक्का दाटे ...

दिलासातील लेकींना दिलासा घरातही ''कुचूकुचू काटे '' टोचायला नकोत याची काळजी घेण्याची सजगता निमूच्या निमित्ताने आम्ही शिकलो. आणि म्हणूनच तिच्यापेक्षा वयाने सात आठ वर्षांनी लहान पण मनाचे सूर ज्याने ओळखले आहेत अशा बाबूबरोबर सुखाने संसार करणाऱ्या निमूचे गुलाल बुक्क्यानी दाटलेले माहेरपण करायला 'दिलासा घर' उत्सूक आहे.

## सुधामती ...., भेगाळ भुईवरून भरारणारी !!!

''ताई ओळखलंत का मला ? ''

समोर बसलेली तरतरीत तरुणी मला विचारीत होती. मी मेंदूला खूप ताण दिला. पण काही केल्या डोळ्यासमोर नाव येईना, की व्यक्ति पाहिल्याची खूण पटेना. माझे गोंधळलेले डोळे ... चेहरा पाहून ती हसली.

'ताई मी सुधामती आणि हा तुमचा लाडका बिंदू. खूप दिवसात भेट नाही. आठवण तर यायचीच मला. पण यायला जमलं पाहिजे ना ?' सुधामती म्हणाली. आणि अचानक माझ्या डोळ्यासमोर उभी राहिली आठ वर्षापूर्वीची सुधामती. पाठीवर कोयत्याची जखम, सुजलेला चेहरा, पायानं धड चालता येत नव्हते, दूधपिते लेकरू नवऱ्याने हिसकादून नेलेले अशी एक हताश आई नि बाई. मनस्विनीच्या दिलासा घरात आश्रय घेण्यासाठी आणि आपले दहा अकरा महिन्याचे बाळ परत मिळावे म्हणून कायद्याची मदत मागण्यासाठी, म्हाताऱ्या बापाला घेऊन सुधामती आली होती.

तिचे माहेर डोंगरातल्या दगडवाडीचे. लहान असतानाच आई मेली. घरात म्हातारा, कोरडी जमीन आणि वेशीच्या आत लहानसं पडकं घर एवढीच काय ती जायदाद. जमीन अशी की दगड गोट्यांनी भरलेली .पाऊस वेळेवरी पडला तर पिवळी जवारी ,जवस असलं काहीतरी पदरी पडणार. म्हातारा बाप लोकांची जनावरं, गायी, म्हशी घेऊन रानात जाई. एका जनावरामागं रोज एक भाकर नि महिन्याला वीस रुपये मिळत. भाकर ताजी नाही तर शिळीच. पण काही का होईना दहा भाकरी नेमाने घरी येत. कधीमधी कालवण पण मिळे. तीन माणसांना लागणार तरी किती ? त्यात एक पोरगी. तिने बेतानेच खायचे असते. दोनतीन भाकरी उरतच. त्या कडकडीत वाळवून, त्याचे तुकडे डब्यानी भरून ठेवायचे काम सुधीकडे असे. सकाळी थेंबभर तेलाची फोडणी करून त्यात बदाबदा पाणी ओतायचे. मिठाचा खडा टाकायचा. पाण्याला खळाखळा उकळी आली की त्यात वाळलेले तुकडे टाकायचे. एक वाफ आली की असा खमंग वास येई की तोंड पाण्याने भरून जाई. हे तुकडे म्हणजे रोजचा सकाळचा जनमसावित्री नाश्ता. त्यात बदल नाहीच.

भाऊ, बाबू त्याचे नाव. तोही शेळ्यामेंढ्या राखायला जाई. सीताफळाचे दिवस आले की अख्खे घर सीताफळाच्या टोपल्या आंब्याला म्हणजे अंबाजोगाईला विकायला नेण्यात गुंतत असे. शंभर फळाची एक टोपली आठ दहा रुपयांना विकली जाई. हे रुपये बाजूला पडत. त्यातून वर्षाचा कपडालत्ता आणावा लागे. सुधीला आठवते तेव्हापासून ती शेण गोळा करून, त्याच्या गोवऱ्या लावण्याचे ...थापण्याचे काम करी. कुणाची का जनावरे असेनात. त्यांच्या मागेमागे धावायचे. दिवसभर शेण गोळा करून घरासमोर साठवायचे. दुसऱ्या दिवशी सकाळी उठून गवऱ्या थापायच्या. आंब्याच्या गवळणी दर मंगळवारी येत नि आठ आण्याला शंभर गवऱ्या या भावाने घेऊन जात. दर आठवड्याला रुपया पदरात येई. मग तो मधल्या घरातल्या कोनाड्यातल्या बारक्या गाडग्यात ती ठेवी नि वरून दगड झाकी..

बाप म्हणे,
"सुधीचा हुंडा सुधी साठवतीया."

डोंगरात दुष्काळाचाही सुकाळ असे. कधीतरी वेळेवर पाऊस यायचा. दोन वर्षे लागोपाठ दुष्काळ येई. त्या ऐंशी साली तर उलटी गंगाच वाहिली. दोन महिन्यात शंभर इंच पाऊस झाला. नद्या भरभरून वाहू लागल्या. शेते बदबदून डबडबली. पेरलेले दाणे सडून गेले. जरा ऊन पडले नि हाहाकार आणखीनच वाढला. धड दिसणारे वाडेही कोसळू लागले. दगडमातीच्या घरात राहणाऱ्यांचे हाल तर काय सांगावेत ? उन्हाने माती वापसली.... फुगली नि घरे धडाधड कोसळली. डोईवरचे छप्पर उडाले नि पायाखालची जमीनही बुडाली. पण पोटातली भूक कुठे उडून जाणार ? गांवातल्या माणसांचे जथेच्या जथे मुंबई-पुण्याच्या रस्त्याने धांऊ लागले. गावात फक्त लेकुरवाळ्या बाया आणि म्हातारी माणसे. सुधीचा भाऊ जेमतेम सोळा वर्षाचा होता. त्यालाही मुंबईची ओढ लागली. म्हातारा बाप हात जोडून विनवी, "बाळा रे, एवढी सुरी म्यानात घालून टाक. मंग कुठे बी जा. पन घरात शानी पोर टाकून नग जाऊ. मी म्हातारा मानूस. माझं काय चालणार ? पोरीसाठी नवरा बघ. टाक उरकून नि मग जा. पुरूस असला की झाले. म्हातारा .. लंगडा कसा का असंना. पोरीला दोन येळेला भाकर घालणारा असला की बस !!" तेरा वर्षाच्या सुधामतीसाठी नवरा बघण्याची घाई सुरू झाली. सहा महिन्यांखाली सुधी शहाणी झाली होती. मुळातला गोरा रंग उजळून आला होता. किंचित अपरे नाक. गुबरे गाल. लाल ठिपका रेखावा

तसे नाजूक इवलेसे ओठ. हसली की डाव्या गालावर खळी पडे. दाट कुरळे केस. किंचित सोनेरी .. तपकिरी रंगाचे. ठेंगणा बांधा. फाटक्यातुटक्या कपड्यातली सुधी देखणी दिसे.

एक दिवस बाबूचा मित्र नेकनूराहून एका तरुण माणसाला घेऊन आला. त्याची गावात दोन पानाची दुकाने होती. दिवसाला शंभर रुपये थेट पदरात पडत. गावात घर होते. जवळच्या खेड्यात आठ एकर पाणभरताची जमीन होती. घर होते. दारात जनावरे होती. घरात म्हातारी माय होती. धाकटा भाऊ होता. चार वर्षापूर्वी या माणसाचे लग्न झाले होते. बायको पहिल्या बाळंतपणासाठी माहेरी गेली. ती लेकरू दहा महिन्याचे झाले तरी सासरी परतलीच नाही. दोनदा नवरा घ्यायला गेला. दोनदा मुऱ्हाळी पाठविला. पण ती येईना. खात्यापित्या घरातली लाडकी लेक होती. मुलगी वर्षाची झाली की पाठवू, तोवर जावयानेच अधूनमधून यावे असे सासरेबुवांनी सुचवले. जावई चिडला. " एक नाही तर चार बाया दारात उभ्या करीन." अशी धमकी देऊन घरी परतला आणि मित्रासोबत सुधीला पाहण्यासाठी आला.

सुधी पाहताक्षणी आवडली. दुसऱ्या दिवशी खंडेश्वराच्या देवळात जाऊन माळा घातल्या. नवी नवरी घेऊन संदीपान आपल्या दुसऱ्या बायकोला घेऊन नेकनूरात आला. भरपूर लाड... छान छान साड्या. पोट भरून खायला. सुधी दिवसागणिक उजळत होती. नाकात सोन्याची नथ. कानात झुमके. कपाळावर भलामोठा सूर्य. गौरीसारखी दिसे. लग्न होऊन पांच सहा महिने झाले तोच सुधीला घेऱ्या येऊ लागल्या. पाय जड झाले. मग तर कोडकौतुकालाही उधाण आले. सुधी मुलाची माय झाली. संदीपान पोराचा बाप झाला. दिवस कसे छान चालले होते. आणि एक दिवस पोस्टमनने संदीपानच्या नावाने रजिस्ट्री चा कागद आणला. पहिल्या बायकोने नवऱ्याला वकिलामार्फत नोटीस पाठवली होती. बीडचे एक चांगले वकील तिच्या भावकीतले होते. संदीपानही दुसऱ्या वकिलाला जाऊन भेटला. "चार बाया दारात उभ्या करीन" असं म्हणणे सोपे होते. पहिल्या पत्नीला रीतसर काडीमोड न देता दुसरी बायको करणे कायद्याच्या दृष्टीने फार मोठा गुन्हा होता. त्यासाठी हातकड्याही पडतात. हे सारे कळल्यावर संदीपान घाबरला. पहिली बायको शालू बऱ्या घरची होती. तिनेही दोन वर्ष चांगला संसार केला होता. खरे तर तिचीच गोडीने समजूत घालायला हवी होती.

दुसरी बायको केली तर आपला केस कोण वाकडा करणार ? असे त्याला वाटे. मित्रही म्हणत,
"लेका तर दुसरी बायको. कोन काय म्हनत न्हाई. कायदा कोरडा ति. मोठ्या शहरात. इथं कोन त्याला मानतंय ? कितीक मानसं दुसरी बायकू आणतात. तू काय नवं करतूस व्हय?"

संदीपान वकिलाला जाऊन भेटला. वकिलाने संदीपानला सल्ला दिला. दुसऱ्या बायकोला पळवा नि ती बहीण आहे असे धडधडीत सांगायला लावा. पुढचे पुन्हा पाहू. पण या गोष्टीला सुधी मुळीच तयार होईना. नोटिसा घेऊन पोलिस येऊ लागले. लपता भुई थोडी झाली. धंद्यावर त्याचा वाईट परिणाम होऊ लागला. या साऱ्या प्रकरणात सर्वात निर्दोष असलेली सोळा वर्षाची सुधी बळी ठरली. घरी नवऱ्याचा मार सुरू झाला. सासू घालून पाडून बोले. जेवायला अर्धी चतकोर भाकर नि लाल तिखट मिळे. जणू घर उलटे फिरले. एक दिवस संदीपान सुधीला आणि तान्ह्या बिंदूला ... नितीशला दगडवाडीला; सुधीच्या माहेराला सोडून आला. माहेरी तर अठरा विश्वे दारिद्र्य म्हातारा बाप रोजगार हमीच्या कामावर जाई. भाऊ दुष्काळात मुंबईला गेला. तो तिकडेच होता. बापाला मिळणाऱ्या दहा रुपयात लेकराला दूध कुठून मिळणार ? मग सुधीही कामावर जाऊ लागली. 'बराशी' खंदू लागली. महिना निघून गेला नेकनुराहून येणाऱ्या बातम्यांकडे तिचे कान लागलेले असत. कोणीतरी सांगितलं की संदीपानने पहिल्या बायकोला आणि लेकीला आणलेय. समदे आपसात मिटलेय. अलीकडे सुधीही वैतागून बापावर कडाडे.

"म्हातारपनी कशाला जलमाला घातलंत दादा ? दुसरेपनावर देण्यापरीस हिरीत ढकलून द्यायचं व्हतं. मी तर कशी बी जगेल. पन ह्या लहानग्यानं काय पापं केलंय ? त्याच्या बिगर मी तरी कशी जगू? नि त्याला कुठून खाऊपेऊ घालू ? शिक्षान देऊ ? मला बी साळंत घातलं न्हाई तुमी. लई मोठं पाप क्येलं दादा तुमी. कुठं फेडाल ?..."

इकडे संदीपानच्या घरातलं वादळ शांत झालं होतं. शालूचा राग होता. पण त्याच्याकडे कोण लक्ष देणार ? पण लहानग्या बिट्टूची मात्र संदीपानला सारखी आठवण येई. सुधी लोकाच्यात काम करते. बापाला काम होत नाही. लेकरू वाळलेय असे कानावर येई. मन चळबळून उठे.

मन कशात लागत नसे. एक दिवस त्याने दोन दांडग्या मित्रांना बरोबर घेतले आणि तिघे दगडवाडीला आले. बरोबर कपडे, पैसे घेतले. सुधीच्या बापाला भेटले. माहेरीकराला घेऊन जातो म्हणाले. बापाने दुपारच्याला लेकीला खुशीने वाटे लावले. क्षणभर सुटकेचा श्वास टाकला. पण ....

सांजच्याला गावं ची माणसं सुधीला गाडीत घालून अंगणात आली. संदीपानानं दगा दिला होत . बिट्टूला घेऊन तो गेला होता. विरोध करणाऱ्या दुसऱ्या बायकोला मारहाण करून कुऱ्हाडीने कमरेत घाव घालून तिघेही पळाले होते. पोलिसात जा ते तर तिथेही ओळख लागते म्हणे. वकील करावा तर तिथेही पैसा पाहिजे. म्हाताऱ्यात दम कुठे होता. ? गावातल्या तरुण मंडळींनी आंब्याच्या ... अंबाजोगाईच्या संस्थेचा पत्ता दिला. सुधी दुसऱ्याच दिवशी आमच्याकडे दाखल झाली. जखम फारशी खोल नव्हती. मुका मार मात्र खूप होता. पोलिसांमार्फत मोठ्या दवाखान्यातून तपासणी झाली. संस्थेत आधी आलेल्या चौघी दुःख घेऊनच आलेल्या. दुःखाचा रंग नि पोत वेगळा, एवढेच! चार दिवसात ती रमली. वकिलांकडे तिने एकच हट्ट धरला.

"वकीलसाव, मला नवऱ्यापासून काडवी नको. फक्स्त, माझं दूधपितं लेकरू मिळवून द्या." दुधानं ओली होणारी चोळी नि पदर पाहून कुणाचेही डोळे भरून येत या दाव्यासाठी जिल्ह्याच्या गावी जावे लागणार होते. पण संस्थेने सारे केले. लेकराने मायला पाहताच नोकरांच्या हातातून उडी मारली. सुधीचा चेहरा फुलून गेला. बाळ आईला भेटले. बाळासह सुधी संस्थेत राहू लागली.

दिवस जात होते. सुधीला अक्षरे ओळखता येऊ लागली. सही करू लागली. शिवणाचे प्रशिक्षण सुरू होतेच. आमच्या संस्थेच्या मायच्या ... मम्मीच्या लक्षात आले की एक माणूस सारखा येरझारा घालतो. लेकरासाठी बिस्किटचा पुडा आणतो. तो माणूस संदीपानाच्या दुकानातला जुना म्हातारा होता. कधीमधी तो सुधीशी दोन शब्द बोलायचा प्रयत्न करी. पण हिने कधीही दाद दिली नाही.

एक दिवस रात्री वकील साहेबांचा फोन आला. "दीदी, तुमच्याशी चर्चा करायची आहे. येऊ का ?" चर्चा सुधीच्या प्रकरणाची होती. बिट्टूशिवाय संदीपानाला करमत नव्हते. आपण केलेल्या चुकीची शिक्षा अश्राप

लेकराला आणि गरिबाच्या पोरीला होतेय, या जाणिवेने तो भाजून निघे. सुधीला अर्धे घर नि थोडी जमीन द्यायला तो तयार होता. मात्र लेकरू त्याला हवे होते. सुधी जर त्याच्याजवळ राहाणार असेल तर त्यालाही त्याची मान्यता होती. आमच्यासमोर फार मोठे प्रश्नचिन्ह होते ....!!

दुसरे लग्न करणाऱ्या बेईमान नवऱ्याला शिक्षा व्हायला नको ? निष्पाप मुलीला वाचवले म्हणून घरात आणणाऱ्या नीच, फसव्या, पशुसमान पुरुषाला मोकळे सोडायचे ? दुसरी बायको म्हणजे कायद्याच्या भाषेत 'ठेवलेली बाई'. एका सोळा वर्षाच्या निरपराध पोरीने 'ठेवलेली बाई' म्हणून तथाकथित नवऱ्याबरोबर उभे आयुष्य काढायचे ? आमच्या बरोबर काम करणाऱ्या तरुण पोरींनाही या प्रश्नाने भंडावून टाकले.

"ताई बिट्टूचे पप्पा मला नेणार असतील तर मी जाईन. दुसऱ्या बायकोला नवऱ्याच्या दारात काहीच किंमत नसतीया, हे इथं राहून शिकलेय मी. मी शिकलेली असते तर त्या घरची पायरी कंदीच धरली नसती. पन मी अशी अडानी. बाप म्हातारा. आज आहे तर उद्या नाही. भावाचाही पत्ता नाही. माझं मन लेकरात गुंतलंया. त्याला सोडून खिनभर जगायची नाय मी.

ताई, आमच्या भावकीतली एक मुलगी अशीच दुसरेपनावर दिली. नवऱ्यानंही पुन्हा हाकलून दिलं. चारदोन वर्ष माहेरात बरी राहिली. पुढं निर्लजपण निघाली. सांगाया लाज वाटती. पन सोलापूर रस्त्याच्या दुकल्या केंद्र हाटेलात न्हाते नि तिथे धंदा करते. तिचा तरी काय दोस ? कसा का असेना पुरुसाचा आधार असंल तर बाई इज्जतीनं राहू सकते. एकट्या ..... तरण्या बाईकडे समद्यांचे डोळे असतात. हितं माज्या सारख्या कित्येक बाया यायच्या. कुनाकुनाला कायमचं ठेऊन घेनार तुमी ? आनि आमचं मन चळलं तर ? आमी बी मानूसच. तहान लागली की पाण्यासाठी वनवननारच ! त्या परिस बिट्टूच्या पपाचा आधार बरा व्हईल. त्यांना चांगलं समजून सांगा. पोटाला आन्न, अंगाला कपडा हवा. मारहाण मातुर सोसायची न्हाई...." सुधीच्या म्हणण्यात व्यवहार होता. तो मनाला पटवून घ्यावा लागला. तिला जन्मभर सांभाळण्याचे आश्वासन 'देणे' सोपे होते. पण 'पाळणे' अवघड होते. पुनर्वसन करायचे तर, शिक्षण काहीच नाही. 'जिद्द' होती पण मातृत्वाच्या भावनेने ओथंबलेल्या जिवासमोर अडचणींचा डोंगर दिसे. जिद्द कशी नि कुठून टिकणार ? असे मनात येई. सुधीला संदीपानकडे पाठवताना

मी अत्यंत अस्वस्थ होते. आपण व्यवहाराचा विचार करतांना, आपल्याच विचारांच्या विरुद्ध आचरण करतो आहोत अशी बोच मनाला होती. वनिताला माझे मन कळत होते. पण तेही मला पुनःपुन्हा व्यवहार सांगत ग्रामीण भागातील निरक्षर आणि तरुण परित्यक्तांच्या पुनर्वसनाचा विचार करतांना विचारांची चौकट पुनःपुन्हा पारखून घ्यावी, पुढे काय घडू शकते याचे अंदाज घेऊन निर्णय घेणे महत्वाचे आहे, असे सतत पटवीत. आणि शाहसानेच हा निर्णय घेतला. पहिली दोन वर्ष सुधीची खबर कळत असे. आमची संवादिनी - कार्यकर्ती भेटू नही आली होती. पण गेल्या पाचसात वर्षात काही कळलं नव्हतं.

......

वर्षावर वर्ष उलटत होती. आणि आज सुधी नि बिट्टू समोर होते. "ताई मी हितं घर करतेया. बिट्टू आता पाचवीला गेलाय. चौथीला तालुक्यात तिसरा आला. हितलं शिक्षण चांगलंया. खोली केलीय. तुमचीबी सावली मिळंल....."

माझ्या डोळ्यातला प्रश्न तिला उमजला असावा. तिनं बिट्टूच्या हातात बिस्कीटचा पुडा देत सांगितलं.
"बिट्टू, हितल्या लेकरांची वळख करून घे. त्यानला बिस्किटं दे. तू बी हितं होतास बर का लहानपणी!"

माझ्याकडे वळून ती बोलू लागली.

"ताई मी ठीक हाय. बिट्टूच्या पपानं मारहाण केली न्हाई.. तुमी तवाच बिट्टूच्या नावाने चार एकर रान नि घराचा अर्धा भाग करायला लावला होता. तुमच्या म्होरं कबूल केल्यापरमाने दररोज दस रुपये देत. आता पंचवीस देतात. मी एका दुकानातल्या सुपाऱ्या रोज फोडून देते. ती दुसरीपण बरी हाय. येगळ्याच ऱ्हातो. पन कधीमधी भेटतो. तिचा तरी काय दोस? आम्ही अडानी. आमचे मायबाप अडानी. नवरापन सातवी झालेला. सरकारचे कायदे कानून आमाला सांगनार तरी कोन? नि कळनार तरी कसे? .....बैलाने जू वढावा तसा संसार वढायचा. पोरगा हीच दौलत. त्याचे पपा येतात अधूनमधून. पन पहिल्यासारखं सूत काही जमलं नाही." येते. हिते आले नि वाटलं म्हायेराला आले. भेटते समद्यास्नी. येईल पुन्हा. सुधामतीचं वय अजूनही तिशीच्या आतच असेल. तिच्या वयाच्या कितीतरी शहरी वा मध्यमवर्गीय मुली शिक्षण घेत असतील..... सुंदर सुंदर स्वप्नांच्या

गुलमोहरी झुल्यावर हिंदोळत असतील..... पायाखालच्या भुईचे भान विसरून.

आणि सुधामती ? अशा किती ? आणि किती शतकं त्यांनी भेगाळ भुईवरून तडफडत धावायचे ?

मानवलोक समाज विज्ञान महाविद्यालय
ग्रंथालय
अंबाजोगाई-४३१५१७, जि. बीड

# गीताईचे भागवत ....

" मी मायच्या पोटात होते तेव्हा अण्णांच्या वडिलांनी, माझ्या आजोबांनी, घरी भागवत बसवलं होतं. मी पाचवी लेक. पोरगा झालं तर भागवत नाव ठेवणार होते. पण समाप्तीच्या दिवशीच मायीनं घाई केली नि मी झाले. पुन्हा पोरगीच ! पन पोथी वाचणारा बामण बरा असावा. त्याने समजूत घातली म्हणे. की पांच लेकींचं कन्यादान केलं की स्वर्गातली सीट पक्की होते. देवांनीच पाचवी लेक धाडलीय. गीता नाव ठेवा असंही सांगितलं. म्हणून हे असं सुंदर नाव मिळालं. पण म्हणतात नां ? नाव सोनाबाई आणि हाती कथलाचा वाळा नाही. नांव गीता पन अख्खा जनम रडगाणी गाण्यात चाललाया. " गीता बोलायला लागली की किती बोलू नि किती नको असे होऊन जाई. लहानपणापासून बोलण्यावर नेहमीच 'अळीमिळी गुपचिळी' चा कायदा होता. एकतर ही पाचवी. त्यातून रीतीरिवाजांच्या घट्टबंद घरातली लेक. वडिलांना पंधरा एकर रान होतं. दोन विहिरी होत्या. पण पदरातल्या पाच पोरींचा उताडा घराबाहेर काढायचा ही काय चुटकी वाजवण्यासारखी सोपी बाब होती ?

"भाभी, आजकाल चपराशाची नोकरी मिळवायसाठी तीस-तीस हजार मोजावे लागतात. नोकरीवाला नवरा शोधायचा तर लाखाची तयारी हवी. ती कशी आमच्या अण्णांना पेलणार ? मोठे दाजी आक्केपरीस चौदा वरसांनी वडील आहेत. त्याची पहिली बायकू तिसऱ्या बाळंतपणात खर्चली. तिच्यावर आक्केला दिली. रुपया नि नारळावर लगीन लागलं. दाजींचा वारदाना मोठा. पन्नास एकरात तर नुसती बागायत. आक्के पहिलीची तीन नि स्वत:ची चार अशा सात लेकरांना वाढवतेय. तिसरी माया लईच देखणी होती. म्हणून शेजारगावच्या हायस्कूलातील चपराशाने मागून केली. आक्केनंतरची शांतू लई कामसू नि गरीब होती. तिला कुंबेफळात दिली होती. नवरा टेलर काम करायचा. अण्णांनी दोन एकराचा तुकडा इकून लगीन करून दिलं. वरीसभर सुद्धा नांदली नाही. पंचमीला पहिल्यांदा माहेरपणाला आली तेव्हा खूप घुसमटल्यागत वाटली. डोळे नेहमीच भरून वाहात. आमच्या धाकट्या काकीने खोदून-खोदून इचारलं. पन तिनं काहीच थांगपत्ता लागू दिला न्हाई. आणि नवरात्रीच्या तिसऱ्या माळंलाच तिच्या गावाकडून निरोप आला की सकाळी पानी भरतांना हिरीत पाय घसरून पडली नि तिथंच म्येली. अण्णा नि आई फक्त मातीला पोचले. माय एक दिवस आक्केला सांगत होती की,

तोंडावर, हातावर ओचकाऱ्याचे वरखडे होते. माझ्याहून मोठी रंजा. तिचा नवरा मुंबईत फरशी बसवण्याचे काम करतो. चार महिन्याला फेरी मारतो. रंजा सासू सासऱ्यांना सांभाळते. दोन पोरं आहेत. तीन एकराचा मळा आहे. भरपूर काम करते. मजेत राहाते.

माझ्या नवऱ्याने पहिली बायको टाकून दिली. का तर लेकरू होत नाही म्हणून ! रंजा आणि शांतूच्या लग्नाच्या खर्चात अण्णा बुडालेले होते. माझ्यासाठी त्यांनी फारशी चिकित्सा न करता दोन पैसे देणाऱ्याच्या गळ्यात मला बांधून टाकले. माझ्या नवऱ्याचा व्याजाने पैसे देण्याचा धंदा आहे. पैसा भरपूर. शिवाय पिढीजात पाटीलकी. त्याला कुठल्या की वैदूनं सांगितलं नुकतीच वयात आलेली पोरगी कर. औषध देतो, सहा महिन्यात गरवार राहील. लगीन झालं. वरीस झालं तरी माझी पाळी येत राहिली. नि मग माझ्या छळाला पारावार राहिला नाही. नहाणं येऊन तीनच महिने झाले होते. तोच लगीन झालं, नवऱ्याचा लई त्रास व्हायचा. पन जाणार कुठे ? बापानं मोजून चार हजार घेतले होते. रडत पडत दोन वर्ष त्याच्या घरात राहिले.

ताई, शिणेमात सुद्धा असला त्रास दाखवला नसेल असा छळ तो करायचा. डोक्यावर दगडाचं जातं ठेवून तासन्तास उभं करायचा. शिवाय दोन्ही हातात दगड. जातं तर पडलं नाही पायजे. पैशाच्या जोरावर त्याला तिसरी बायको आणायची होती. मी माहेरी पळून तरी जावे नाहीतर मरून तरी जावे अशी त्याची इच्छा. तो अडाणी नव्हता. बायकोच्या डोक्यात दगड घालायची वा रॉकेल ओतून काडी लावायची बी हिंमत नव्हती. म्हणूनच फार-फार त्रास द्यायचा. भर उन्हात बिनचपलांची उभा करायचा. शेतात नेऊन सारे चाळे चालत. शेवटी सोसवेना म्हणून एक दिवस पळून बापाच्या घरी आले. आईला माराचे वण दावले. तिलाच कळवळा आला. माहेरी तीन वरीस होते. त्या काळातच बाप्पा भेटले. शेतकरी संघटनेचं काम करायचे. बायांच्या मिटिंगा घेत. मी पण तिथे जाई. माझ्या बंद डोक्याचं मशीन पुन्हा चालू झालं. सहावी पसवर वर्गात नेहमी पहिली येत होते. ते दिवस पुन्हा जागे झाले. मिटिंगमध्ये मी पण बोलायची. बाप्पा नि सारेच भाऊ माझं कवतुक करीत. अण्णाला हे आवडत नसे. पण माझ्या पाठच्या भावाने कधी हरकत घेतली नाही. पुण्याला एकदा संघटनेचं बायांचं शिबीर होतं. मला जायचं होतं पण अण्णांची परवानगी नव्हती. आईच्याकडून पैसे घेऊन मी शिबिराला इतर बायांबरोबर गेले. घरी आल्यावर अण्णांनी घरात घ्यायलाच नकार दिला.

बाप्पा माझ्या आजोबांसारखे. गेली चाळीस वर्ष वक्र्यांनेस पक्षात काम करणारे. पण त्यांच्या नि माझ्याबद्दल घाणघाण सौशय घेऊन बोलले. मग मात्र मी ठरवलं. विहीर गाठायची पण माहेराला रामराम ठोकायचा. मग बाप्पांनी मला पिंपळापूरच्या संघटनेच्या ताईंकडे नेले. तिथे महिना काढला. पण पुढे काय ? हा प्रश्न होताच. तेवढ्यात या संस्थेची माहिती कळाली. नि मला बाप्पांनी इथे आणून घातले....." अशी ही गीता चार महिने दिलासा घरात होती. गुबरे गाल. अपरे नाक. नेहमीच उत्सुकतेने विस्फारलेले मोठमोठे डोळे. उंची जेमतेम चार फूट दहा इंच असेल. ठसका बांधा. गीताला संसाराची खूप हौस होती. बाजार करण्यात, स्वयंपाक करण्यात रस होता. अशा या गीताचे लग्न करून द्यावे असा बाप्पांचा आग्रह होता. योग्य मुलगा शोधण्यास मदत करण्याचे त्यांनी आश्वासन दिले. अर्थात गीताशी बोलल्या शिवाय लग्नाचा घाट घालणे योग्य वाटेना. कारण विवाहाच्या संकल्पनेभोवती सांस्कृतिक, भावनिक व धार्मिक रेशीम वस्त्रांची सुनहरी नक्षी विणलेली असली, तरी शेवटी पुरुषाला हवी असलेली "बाई"ची गरज, असेच विवाहाचे मूळ स्वरूप असते. खेड्यात काय किंवा शहरात काय फारसा फरक नसतो. गीताला तर वयाच्या चौदाव्या वर्षीच तिशीच्या घरातल्या, त्यातूनही मूल होत नाही म्हणून बेचैन असलेल्या आणि त्यासाठी हपापलेल्या पुरुषाचा शारीरिक सहवास सहन करावा लागला होता. त्या मानसिक धक्क्याचे नेमके स्वरूप लक्षात घेणे महत्त्वाचे होते.

दिलासा घर सुरू झाल्यापासून प्रथमच मानसशास्त्राच्या तांत्रिक अभ्यासाची उणीव भासली. या लहान गांवात मानसशास्त्राचा अभ्यासक सापडणे अशक्यच होते. गावात शासकीय मेडिकल कॉलेज जरूर आहे पण या आडवळणाच्या गावात यायला तज्ज्ञ डॉक्टरही फारसे तयार नसतात. त्या शास्त्राची जाण आणि आवड असणारी व्यक्ति 'मनस्विनी' ला सुद्धा हवी होती. शेवटी अनुभव, वाचन आणि गीताला अधिक नेमकेपणाने बोलते करणे याचा आधार घेतला आणि एक लक्षात आले की गीताला शारीरिक आघात व ताण जाणवला तरी त्या मानाने मानसिक धक्का कमी होता. खेड्यातला गोतावळा गाई, गुरेढोरे, कुत्री, कोंबड्या, बकऱ्या अशांसह असतो. लैंगिक जीवनाबद्दलची गुप्तता, घृणा इ. भावना मानवी कुटुंबातून सहजपणे जोपासल्या जातात. पण खेड्यातील गोतावळ्यात या भावनांना एक सहज छेद आपोआप मिळतो. प्राण्यांचे कामजीवन, जननप्रक्रिया दैनंदिन जीवनाचा एक अविभाज्य घटक म्हणून अनुभवल्या जातात. वाढत्या वयानुसार,

आपले जीवन आणि प्राणीजीवन यांतील संगतीचे आढावे अंतर्मनात आपोआप घेतले जातात. त्यातून काही गृहिततत्वे जोपासली जातात. घरातल्या पारंपारिक संस्कारातून स्त्री ही 'देणारी' असते आणि पुरुष हा 'घेणारा' असतो ही भूमिका आपोआप तयार होतेच. अगदी सुशिक्षित, मध्यमवर्गीय स्त्रियाही मुलींबद्दल असाच विचार करतात.

"ज्याचा माल त्याच्या दारात नेऊन टाकला की आपण मोकळे. कधी करणार लेकीचं लग्न. आमचीचं ठरवून मोकळे झालो आम्ही !" या शब्दात एक शिक्षक बाई मला टोकत होत्या. मग सर्वसामान्य स्त्रियांबद्दल काय बोलायचे?

गीताने ती लहान असताना वडिलांचं आईच्या पांघरुणात घुसणं पाहिलं होतं. शारीरिक त्रास मात्र जबरदस्त होता. सुरुवातीच्या काळात नवऱ्याने लाड भरपूर केले होते. त्यामुळे स्त्री पुरुष सहवासाची आवड आणि ओढ निर्माण झाली होती. गप्पांच्या ओघात तिने सारे बोलून दाखविले. जोडीदार तरुण आणि तिच्या भावना जाणणारा असावा अशी तिची अपेक्षा होती. गीताला शेतकामाची भरपूर माहिती होती. आवड होती. शेतकरी संघटनेच्या शिबिरातील अनुभव, बैठकीतून शेतीचे व महिलांचे प्रश्न मांडण्याची सवय यामुळे गीताची जीवनाकडे, कुटुंबाकडे, स्वत:कडे बघण्याची दृष्टी अत्यंत सुजाण आणि संवेदनशील होती.

लोणावळ्याला ग्रामीण परिसरात काम करणाऱ्या महिला कार्यकर्त्यांना एक महिन्याचे प्रशिक्षण देण्याचा प्रकल्प एका स्वयंसेवी संस्थेनी आयोजित केला होता. आम्ही दोन कार्यकर्त्या पाठविण्याचे ठरवले. त्यात गीताची निवड केली. वातावरणात, विषयात बदल होईल, त्यातून तिचे मन स्थिर होईल असे वाटले. पण गीता तिथे जेमतेम आठ दिवस राहिली. दोन वर्षे शेतकरी संघटनेच्या लहानमोठ्या कार्यक्रमांत सहभागी होण्याचा अनुभव असल्याने या प्रशिक्षणात तिला काही नवीन वाटेना. त्यांतून तिथे आलेल्या महिलांच्या त्याच त्या गप्पांचाही तिला कंटाळा आला. बहुतेक प्रशिक्षणार्थी संसारी होत्या किंवा कुमारिका होत्या. कुणाला सारखे घर वा मुले दिसत. नवऱ्याची सय येई. तर कुमारिका पोरींची आपसात खुसपूस चाले. गीता तेथे काहीशी एकटी पडली. त्यातून डोंगर चढायउतरायची सवय नाही. शेवटी तिथे लेखी अर्ज देऊन बाई माघारी परत आल्या.

एक दिवस बाप्पा एका बावीस-तेवीस वर्षाच्या तरुणास घेऊन मनस्विनीच्या कार्यालयात आले. या तरुणाचा विवाह तो दहा वर्षाचा असतांना एका पाच वर्षाच्या चिंगुलीशी झाला. चौथी पास झाल्यावर तो तालुक्याच्या गावी शिक्षणासाठी आला. मॅट्रिकची परीक्षा दिली. पण इंग्रजी विषयाने पाय अडकवला नि 'मॅट्रिक फेल' ही डिग्री मागे लावली. खरे तर शाळेत असतानाच रेडिओ दुरुस्ती, लाईट फिटिंग, विजेच्या मोटारींची दुरुस्ती यांची विशेष आवड निर्माण झाली. मग एका रेडिओ मेकॅनिकच्या हाताखाली दोन वर्षे काम केले. मध्ये बराच काळ लोटला होता. लहानपणी ज्या मुलीशी लग्न झाले होते तिच्या वडिलांना तिचा विवाह दुसऱ्या मुलाशी करून द्यायचा होता. यालाही शिकण्याची इच्छा होती. तो नववीत असतानाच रिवाजानुसार काडीमोड झाला होता. रेडिओ मेकॅनिकचा धंदा बरा चालू लागल्यावर लग्न करण्याची इच्छा झाली. पण त्याला पत्नी थोडंफार शिकलेली आणि गांवाकडे राहून शेत व सासू सासऱ्यांची काळजी घेणारी हवी होती. बाप्पांनी गीतूची माहिती दिली. पहिल्या भेटीत दोघांनी एकमेकांच्या आवडी निवडींबद्दल, मागील जीवनातील घटनांबद्दल गप्पा मारल्या. दुसऱ्या भेटीत मुलाने प्रश्न केला की, संस्थेत नोकरी मिळेल का ? बाप्पांचीही इच्छा होती की मुलाला संस्थेच्या व्यापात सामावून घ्यावे. पण आम्ही या गोष्टीला विरोध केला. पूर्वीपासूनच तो संस्थेत असता आणि नंतर संस्थेतील मुलीशी विवाह करण्याचा निर्णय घेतला असता तर, संस्थेने त्याला सहकार्य केले असते. बधाई दिली असती. संस्थेचे नियम वेगळे आणि शिस्त वेगळी. ती पाळणे महत्त्वाचे. भविष्यात या संदर्भात त्याच्या हातून चुका घडल्यास त्याचे परिणाम त्याला स्वीकारावे लागले असते. विवाहाचा एक परिणाम वा फायदा म्हणून नोकरी मिळेलच असे त्याला वाटणे हे आम्हाला योग्य वाटले नाही. कदाचित त्यातून संस्थेच्या कामावर दबावही आला असता. गीताच्या संसारातही त्यातून छोटी-मोठी वादळे निर्माण झाली असती. अर्थात आम्ही आमच्या नकारामागची भूमिका गीता व बाप्पांना समजावून दिली. मुलाला मात्र सध्या जागा नाही, पुढे मागे जागा असल्यास विचार करू असे सांगून समजूत घातली. गीताचा विवाह सत्यशोधक पद्धतीने लावला. नव्या संसारासाठी लागणाऱ्या सामानाची यादी आमच्या दिलासातील इतर मुलींनी अगदी हौशीने तयार केली. प्रेशर कुकरचा आग्रह सर्व जणींनीच धरला. पोळीपाट, कळशी, कढई, जर्मनचे डब्बे, वाट्या, पेले आदी भरपूर सामान मुलींनी जमवलं. मात्र सतरंजी, गादी आणि चादरीला जाणीवपूर्वक चाट मारली. हा निर्णय त्यांचाच.

गीता गावातंच राहात होती अधून-मधून संस्थेत येत असे. नंतर सासरच्या गांवी गेल्याचे कळले. आज पाच वर्षानंतर दोन मुलांना घेऊन गीता समोर उभी राहिली. हातात अर्ज होता.

"मी गीता मधुकर पाखरे मनस्विनीच्या दिलास घरात राहात होते. तिथेच माझे लग्न झाले. आता मी सासरी आनंदात आहे. मला दोन मुले आहेत. माझे जोडीदार मधुकर, पुणे येथे दापोडीस काम करतात. मी गावी सासू-सासऱ्यांसह रहाते. शेतमळा सांभाळते. माझ्या वडिलांनी माझ्या भावांच्या नावे १२ एकर शेत करून दिले. उरलेले सहा एकर शेत माझे नावे करून देतो म्हणतात. माझे भाऊ त्यांना सांभाळत नाहीत. त्यांचे फार हाल होतात. वडिलांची इच्छा माझ्याजवळ राहाण्याची आहे. मधुकरांच्या कानावर मी त्यांची इच्छा घातली. त्यांनी व मी असे ठरवले की तुम्हाला भेटून निर्णय घ्यावा. कृपया मला यावावत सहकार्य करावे ही विनंती.

आपली,

-गीता मधुकर पाखरे.

मोफत कायदा आणि कुटुंबसल्ला मदत केंद्राच्या रीतीनुसार आम्ही तिचे आई-वडील, जोडीदार, सासू-सासरे या साऱ्यांची एक बैठक घेतली, चर्चा केली.

गीताच्या मनात वडिलांविषयीचा राग आलेला परत दाटलेला होता. घरात आईला होणारा जाच तिने जवळून पाहिला होता. भावांचे लाड तर आई नि वडील नको तितके करीत. दोघांनी शिक्षण अर्ध्यातून सोडले होते. एकाला मटक्याचा नाद होता. दुसऱ्याची बायको जळून मेली होती. गीताच्या मनात आई विषयी पण अढी होती. तिला वाटे की, आई सुनेशी नीट वागली असती, मुलाला धाकात ठेवले असते तर तिने जीव दिला नसता. गीताच्या विवाहानंतर गेल्या नऊ-दहा वर्षात माहेरच्यांनी कधी तिची दखल घेतली नव्हती. वाप्पावर नि गीतावर घाणेरडा संशय घेणारे वडील, बाप्पांना घेऊन गीताच्या दारात आले होते. आपले दुःख सांगताना भडभडा रडलेही होते. पहिल्या भेटीत वडिलांना जेऊखाऊ घालून, शंभर रुपये खर्चाला देऊन पण "आता तरी माझा संसार नासवायला येऊ नका" असे ठामपणे बजाऊन त्यांना माघारी धाडले होते.

मधुकर पुण्याहून आल्यावर तिने त्याच्या कानावर सारी हकीगत

घातली. गीताची सासू अतिशय प्रेमळ आहे. गीताने बापाला एवढे टाकूनं बोलायला नको होते असे तिने आवर्जून लेकाला सांगितले. गीताचा बाप रीतीनुसार वागला. संगळा समाजच पोरींना गळ्यातील धोंड समजतो. "ज्याच्या घरी पाप त्याच्या घरी जन्मतात लेकी आपोआप" अशी म्हणच आहे. पाच पोरींना हुंडा द्यायचा म्हणजे बापाच्या मळ्यावर जूच की. त्यातून कोणत्याही वयाचा बाप्या नि लहानगी लोकांची मुलगी एकत्र दिसले की लोकांना संशय येतोच. बाई नि बुवा यांच्यात तीनच .. स्वच्छ नाती असतात. आई, बहीण आणि मुलगी. अशा वेळी त्यांच्या मनात संशय येणे चुकीचे असले तरी ते रीतीनुसार होते. त्यांच्यावर वसावसा रागावण्यापेक्षा त्यांना गोडीने बोलायला हवे होते असे गीताच्या सासूचे मत. सासूचे मत ऐकून गीताला खूप बरे वाटले. सासूबद्दलचा आदर आणखीनच दुणावला. गीता नि मधुकर आधी संस्थेत येऊन आमच्याशी बोलून गेले. मधुकर पुण्यात राहातो. रात्रशाळेत जाऊन त्याने बारावीची परीक्षा दिली आहे. कामगार संघटनेचे कामही उत्साहाने करतो. सासऱ्यानी शेत दिले नाही तरी, लेकीने त्यांना आधार द्यावा असे त्याचे मत. गीताचे सासरे मात्र काहीसे नाराज होते. एकत्र राहाणे कसे जमावे? पटले नाही तर पुढे कसे? असे त्यांना वाटे. अर्थात त्यांच्या म्हणण्यातही तथ्य होते.

मधुकर पुण्यात राहणार. दोन घरातल्या .. सासर नि माहेरच्या चार वयस्कांना 'नांदवणे' ही एक मोठी जबाबदारी होती. गीताचा स्वभाव तसा बडबड्या. काहींसा तापट. तिला ही जबाबदारी नीट पार करता येईल की नाही याची मलाही शंका होती. त्यासाठी तिच्याशी बोलणे महत्त्वाचे होते. ती जबाबदारी आमच्या कार्यकर्तीने..संवादिनीने स्वीकारली. वृद्धाश्रम, त्यामागची कल्पना, तेथील वातावरण, वृद्धांना आवडणाऱ्या कामात त्यांना कसे गुंतवावे लागते वगैरे अनेक गोष्टी तिला सांगितल्या. माहिती दिली. त्यानंतर मधुकर, गीता, तिचे आईवडील , सासूसासरे सगळेच एकत्र बसले. मागील घटना कुणाच्या उकरून काढायच्या नाहीत, एखादी गोष्ट पटली नाही तर मोकळेपणी सांगायचे, टोमणे मारायचे नाहीत. सर्वांनी गीताला मदत करायची, असे ठरले. दोन वर्ष नीटनेटकी, समाधानाने पार पडली तर मग सहा एकर शेती वडिलांनी गीताचे नावें करावी असा निर्णय घेतला. आज या गोष्टीलाही तीनचार वर्ष उलटली आहेत.

आज गीता, सासूसासरे, आईवडील यांच्या सोबत राहाते. वडिलांचे

शेत दुसऱ्याला बटाईने करायला दिले आहे. मधुकर वर्षातून तीनचार वेळा येऊन जातो. माहेरात आसरा न मिळालेली नकोशी मुलगी आज आई-वडिलांना आणि सासूसासऱ्यांना दिलासा देत संसार करीत आहे.

# दैवा ... दैवशीला....!!

"नाव काय तुझं ?" मी

"..............."

"नाव तर असेलच की ! होय? काय हो नांव हिचं ? कुठली आहे ? तुम्हाला कुठे भेटली ?" पुन्हा मी. प्रश्न तिला येथे घेऊन येणाऱ्याला. उत्तर त्याच्या पाशीही नव्हते. दिसण्यात तरतरीत, तिशी पल्याडचा तो माणूस. त्याचे किंचित घारोळे डोळे, माझ्या मनात उगाचच संशय निर्माण करून गेले. "ही बाई गेले दोन दिवस कोरटाबाहीर घोटाळतेय. रातच्याला धरमशाळेत एकटीनेच ऱ्हाणाऱ्या बाईकडे लई लोकांचं ध्यान जात असतया. तसंच माझं बी गेलं. मी तिला चा पाजला. जेऊ घातलं. वचावचा जेवत होती. जेवता जेवता हात थांबवून माझ्याकडं बगायची. तिची नजर एवढी अश्राप होती की माझ्या मनातलं वाकडं पार धून निघालं. आता मी ठरवलं की तिला ठिकाणाला लावायचं. पर ही काईच बोलत नाही. घरी घेऊन जावं, तर बायकोला माझं मन कसं कळनार ? त्यात तिचा तरी काय दोष ? उगा या पोरीलाच ताप व्हायचा. मी कोरटाच्या कारकुनाकडं चवकशी केली. त्यानं तुमचा पत्ता दिला. घेऊन आलो इकडं. ताई कसंबी करा. या पोरीला तुमच्या संवस्थेत ठेऊन घ्या. लई उपकार व्हतील माझ्यावर. पोरगी रस्त्यात सोडून गेलो तर कोन काय म्हननार आहे ? नवऱ्यानंबी सोडलीच की तिला रस्त्यावर ! पन तिची अश्राप नजर सारखी आठवली असती. घास कडू झाला असता तोंडातला. काई पैसं भरायचे तर मी भरतो. हायेत ते ठेऊन घ्या" .... बोलता बोलता तो माझ्या पायाशी वाकला. स्वर जड झालेला होता. ऐकता ऐकता मीही जराशी अवघडले होते.

"हे पहा भाऊ, पाया नका पडू. आमच्या संस्थेत नवऱ्याने सोडलेल्या स्त्रियांना आसरा मिळतो. त्यांना शिवण शिकवतो. कोर्टात केस दाखल करतो, नाहीतर नवऱ्याला बोलावून त्याची समजूत काढतो. काळजी नका करू; पण ......" बोलता बोलता माझे लक्ष तिच्याकडे गेले. ती डोळे विस्फारून माझ्याकडे पाहात होती. डोळ्यात दिलासा चमकत होता. क्षणात हात घट्ट पकडून ती बोलली.

"दैवा .. दैवा म्हनतात माला. दैवशाला कदम नाव हाय माझं. मला कोरटात न्याल मावशी ? मला जज्जासमूर न्याल ? मी समदं सांगीन त्याला.."

दैवशाला दिलासा घरात राहू लागली. तिचं गाव आमच्या अंबाजोगाईच्या जवळचंच आणि माहेर पुढे चार कोसांवर. शिक्षण शून्य. लहानपणी शाळेत घातले होते. पण मास्तर एक नि शाळा चौथी पसवर. मास्तरांचा डोळा चुकवून घरी पळून जायला मजा वाटायची. झाडावरची जांभळे, पेरू, कैऱ्या, सीताफळे शिवाय रानातल्या करमुल्या. यांची हाक कानावर कायमच असायची. मग काय ? बापाने काढून घेतले नाव शाळेतून नि रवानगी केली शेळ्यांच्या मागे राखोळी म्हणून. हे काम मात्र दैवाला खूप आवडायचे. त्या गमतीजमती सांगताना दैवाचे तेजदार डोळे पार हरखून जात. ती सांगे "ताई मास्तर कमळाचा 'क' शिकवायचा. आता कमळ कुठं बघितलया वो आम्ही ? काळं की गोरं ते ! मी मास्तरला म्हनलं की .... गुरुजी कणगीचा 'क' शिकवा की. आम्हाला कणगी म्हाईत हाय. तर केस धरून वढले पहा ....."

"ताई, बदामी बकरीचे डोळे लई सुंदर होते. काळं रेशमी अंग इतकं मऊसूत की इचारू नका. दुदूबी भरपूर द्यायची. तिची चार बाळातपणं मी क्येली. पन लेकरूच वो ! जरासं मोठं झालं की माझा बाप अंबाजोगाईच्या मटन खानावळीत इकून टाकायचा. तवा मातर लई रडून यायचं."

"तू खात नाहीस मटन ?" कुणीतरी दुसरी विचारी.

"आन आता ? आठ दिस न्हाई जिभेला लागलं तर समदं अळणी वाटतंय. मटन तर हवंच. पण आपल्या बकरीचं नको ना"

तर अशी ही दैवा आठ-पंधरा दिवस धड राहिली. एक दिवस सकाळी फोन खणखणला. "ताई दैवा भयंकर त्रास देतेय. रात्रभर आम्ही जागे आहोत. अंगावर रॉकेल ओतून घेत होती. तुम्ही येता ना इकडे ?" संस्थेतील प्रमुख संवादिनी श्यामा बोलत होती. मी लगेच पायात चपला सरकवल्या.

....... समोर दैवाचा अवतार होता. अंगावर ओरबाडून घेतलेले. डोळे लाल झालेले. विस्कटलेले केस. हातातल्या बांगड्या फुटलेल्या. मनगटावर रक्ताचे ठिपके. आमच्या संस्थेतील सर्वांच्या 'मम्मी' गंगाबाई तिला धरून बसल्या होत्या. मला पाहाताच तिने सूर काढला. 'काई न्हायचं नाई मला तुमच्या संवस्थेत. दोन येळंला खायला दिलं तर कांय उपकार केल्ये का ? या मम्मीला हाकलून द्या. माजं सामान द्या. कोरटात नेऊन हुबं करा मला.....

तिचं असंबद्ध बोलणं आतून जोडलेलं होतं. मी तिचा हात धरून ऑफिसमध्ये नेलं. आणि पाण्याचा पेला तिच्या हातात बळेच दिला नि म्हटलं, " आधी पाणी पी. चूळभर. चहा घे नि मग तुझं सामान आण. तुला कोर्टासमोर

नेऊन सोडते. मात्र तुला... एका तरण्यातातल्या बाईला, कोर्टासमोर तिच्या हट्टामुळे सोडलय हे पोलिसांत जाऊन सांगणार मी."

"मला नाही जायचं कोर्टात. तुमी कुठे गेला व्हता चार दिवस ? इथं का आला न्हाई. मी फोन करते म्हनलं तर मम्मी रागावली मला. मी चा पिऊन हितंच बसणारेय.... "

तिच्या या बोलण्यामुळे हसावं की रागवावं हे कळेनासं झालं. "दैवा, तुझं खरं नाव, खरं गाव सांगितलंस तरच मी तुला इथं ठेवून घेईन. दहा दिवस झाले तुला येऊन, पण तू कुणाशी बोलत नाहीस. काय ?" मीही वैतागून बोलले. मग मात्र दैवाने माहिती दिली.

दैवाचं माहेर कऱ्हेरीचं. वडिलांकडे दोन एकर शेती. पण कोरडवाहू. वडील पावसाच्यात सालदारी करायचे नि घरी खरिपाचे पीक घ्यायचे. माय शेतात रोजगार करायची. दैवाला दोन मोठ्या बहिणी. एक लगीन झाल्यावर सहा महिन्यांनी विहिरीत पडून मेली. दुसरीचा नवरा मुंबईला ड्रायव्हर म्हणून काम करतो. ती भारजाला सासरी राहाते. तो अधूनमधून येतो. दैवा तिसरी. तिच्या पाठीवर एक भाऊ. पुन्हा दोन बहिणी. "आमची माय एकतर गरवार असायची न्हाईतर लेकराला अंगावर पाजत तरी असायची. नि शिवाय मरेस्तो काम. आमी भैणी शेण गोळा करायचो. गवऱ्या थापायचो. पानी आनायचो. सरपन गोळा करायचो." दैवा.

दैवा दिसण्यात उजवी. गुलाबी गोरा रंग. मोठे मोठे डोळे. सरळ नाक. दिलासा घरात आली तेव्हा केस खांद्यापर्यंत कापलेले होते. ते नवऱ्याने कापले होते म्हणे ! लग्नाच्या वेळी कमरेपर्यंत वेणी यायची. दैवा वयात आली तेव्हा होती बारा वर्षांची. पण मुलगी वयात येताच आईबापांना लागतो घोर. डोक्यावरचे ओझे फेकून द्यावे तशी नवऱ्याच्या दारात लेक ढकलून मोकळे व्हायचे पाहातात. चौदाची असतानाच दैवाचे लगीन ठरले. नवरा हनुमान नवलवाडीचा सातवीपसवर शिकलेला. मालट्रकवर क्लिनर... क्लिनर होता. वीस रुपये रोज मिळत असत.

लग्न झाले नि दैवा सासरी आली. लग्न होईस्तोवर शेळ्यामेंढ्यांच्या मागे हिंडणाऱ्या दैवाला रसदार स्वैपाक जमत नसे, भाजी भाकरी करता येई.

पण आजीला ना खमंग चव ना भाकरीला गोल भिंगरी आकार. सासू शिकवी. पण शेवटी ती सासू. तिची हाच उंच आहे याचे तिला सतत भान असतेच. मग ती षोडशोपचार शिव्या घालायची. कधी एखादा सटका हाणायची. पण त्याबद्दल दैवाची तक्रार नाही. कारण सासू कशी असते, त्याचे चित्र तिच्या आईने लग्नाआधीच जोरदार रंगवले होते, त्या चित्रापेक्षा तर ही बरीच होती म्हणायची. ! पण बावीस वर्षांच्या नवऱ्याबरोबर चौदा वर्षांच्या पोरीचे सूत काही जुळेना. सकाळी उठल्यावर कंबर ठणकायची. पाय जडावून जायचे. सगळे अंग ठसठसायचे. लग्नातल्या नव्या साड्या, पायातल्या चांदेरी साखळ्या, गळ्यातले पिवळे धमक डोरले, ... हे सारे छान वाटायचे. पण लग्नाचा हा नवा अर्थ उमजत नसे. संध्याकाळ झाली की अंगावर शहारे येत. पळून जावेसे वाटे. आणि दोनदा रात्री पळत ... धावत तिने माहेरची शीव गाठलीही होती. पण लग्न झालेल्या लेकीला माहेर परकेच असते. आईने तिचा जीव ओळखला. कदाचित तिचे दिवस आठवले असतील.

"बाई गं सगळ्याच बायांना जात्यातून जावं लागतं.
काय सांगू भर्ताराचं ? जीव त्यांच्यात मुरला
केवड्याचा गंध जुईफुलानं सोशिला .... !!"

"चार दिवस होतोय त्रास. तो सोसावाच लागतो. एखादं लेकरू झालं की भरताराची गोडी वायफुलावी लागाया लागते. त्रास सोसल्याविनाय गोडी कशी मिळणार ? ......"

असे काही सांगून तिने पहिल्या वेळी दैवाला सासरी जाऊन घातले. पण दुसऱ्या वेळी मात्र बापाने कायदा हातात घेतला. दोन दणके घालून रोखठोक बजावले. " आता तुझं घर त्ये. विसाव्याला दोन दिसासाठी म्हायेराला ये. पन नवऱ्याच्या गोडीनं, सासू सासऱ्यानं धाडलं तरच यायचं. आम्ही पन जमंल तशी चोळी बांगडी करू. शिदोरी देऊन वाट लावू. पन जर का या पुढं पळून आलीस तर पाय तोडून नवऱ्याच्या अंगणात नेऊन घालीन. तुझी तिरडी नवऱ्याच्या घरूनच निघंल. त्या गावची शीव वलांडलीस तर याद राख ....."

तेव्हापासून माहेरची आशा तुटली. नवऱ्याला परळीत चांगली नोकरी मिळाली. मुंबई-पुण्याला जाणाऱ्या मालट्रकवर ड्रायव्हर म्हणून आठशे रुपये मिळत. शिवाय वरची कमाई वेगळीच. लग्नाला दीड वर्ष झालं

होतं. दैवाही घरात रुळायला लागली होती. घरातले काम, शेतातले काम करण्यात हुशार झाली होती. आठ चार दिवसाला नवरा परळीहून मुक्कामाला येई. येताना चिटाचे कापड तर कधी बांगड्या आणी. पावडरचा डबा नि भिवया रंगवायची काळी पेन्सिल गुपचूप हातात देई. त्याला वाटे की, तो आल्यावर हिने पावडर लावावी. थोडे नीटनेटके राहावे. पण पंधरा वर्षाच्या दैवाला नेमके कसे वागावे कळत नसे. पावडरीचा वास सासूच्या नाकापर्यंत जाईल याचेच ती धास्तावत असे.

हनुमंताने नवीन चाल चालवली. पोराचे हाल होतात या निमित्ताने परळीत घर करायचे ठरवले. आणि दैवाची रवानगी परळीत झाली. चार दिवस सासू राहिली. संसाराची मांडामांड करून ती माघारी परतली. नवा गाव .... नवा संसार.... नव्या ओळखी.. गाव बरे होते. दर सोमवारी वैजनाथाचे दर्शन घडायचे. पण काही नव्या गोष्टीही तिच्या ध्यानात आल्या. हनुमान दोन दोन दिवस पुण्या-मुंबईच्या 'लायनी'वर असायचा. घरी आला की धुमाकूळ सुरू. बाटली नि तो. एकमेकांच्या सहवासात. मध्येच जाऊन मटन आणून टाकी. दैवाने मालमसाला घालून मटणरस्सा शिजवायचा. भरपूर पिणे झाले की दोन चार मित्रांना घेऊन तो येई. मग हाताची मनगटे दुखेस्तो भाकरी थापाव्या लागत. कष्टाने मिळालेला पैसा दहा वाटांनी पळून जाई. त्याचे दोस्त म्हणत, '' वा ! काय चव हाय वैनीच्या हाताला. झ्याक रस्सा झालाय. ममईच्या हाटलात बी अशी चव नाय मिळायची.''

असे म्हणायला काय जातेय ? नवरापण फुशारून जाई. पैसे पुरेनात म्हणून तिने दोन बंगल्यातली धुणीभांडी धरली. साठ रुपये येत. तेवढाच आधार. पूर्वी नवरा लाइनीवर असताना दारू जास्त ढोशीत नसे. पण हळूहळू सवय वाढली. एक दिवस दारूच्या नशेत, गाडी रस्ता सोडून पळाली. बरे तर बरे तो वाचला. पण मालाची राखरांगोळी झाली. मालकाने दोन महिन्यांचा आगाऊ पगार हातात कोंबून कामावरून कमी केले. हातात पैसा येईना. दारू नि मटनाची सवय तुटेना. मग घरात राडा. ''लगीन होऊन चार वर्षे झाली तरी लेकरूबाळ होत नाही म्हनून माझं लेकरू दुखी झालया. वंशाला दिवा लागला की समदा कामात हुरूप येतोया. हिच्यामुळंच माझं पोरगं दारूच्या नादी लागलं. हिचा पायगून बरा न्हाई. हिला बापाकडं धाडावं नि नवी सून घरात आणावी.... ! '' असा सासूचा नवा ठेका सुरू झाला.

सवतीच्या नुसत्या कल्पनेने दैवाचा जीव चोळामोळा होऊन जात असे. एका दिवसाची हकीगत. संध्याकाळची वेळ. दैवा घरात एकटीच. घर कसले ? लहानशी झोपडीच. झोपडपट्टीतली. थंडीचे दिवस. सूर्य लवकर बुडतीला लागे. हनुमंताला ... तिच्या नवऱ्याला परळी-गंगाखेड टेम्पोवर नोकरी लागली होती. पण घरी यायला चांगलीच रात्र होई. बाहेर खाऊन पिऊन आठ वाजता घरी येत असे. तर त्या संध्याकाळी बंगल्यातल्या मालकिणीनं दिलेला शिळा भात खाऊन दैवा आडवी पडली. कधी डोळा लागला कळलं नाही. अचानक जाग आली तर कोणीतरी झोपडीचं कवाड लावून घेतय. नवऱ्याचा मित्र दारू ढोसून घरात आला होता. दैवा किंचाळली. चपल्या मारून त्याला बाहेर काढले. नेमका त्याचवेळी नवरा का येऊ नये तिथे ? तोही दारूत बुडून आलेला. त्याने बायकोचा हात खेचला. फरफटत टेम्पोत कोंबलं आणि टेम्पो सुरू केला. दैवा ओरडतेय. हनुमंत गाडी चालवतोय नि एका हाताने तिला मारतोय. टेम्पो चढावाला लागला. गाडीचा दरवाजा खटकन उघडला नि दैवा खाली ढकलली गेली. समोरून गाडीचे दिवे लखलखत चमकले आणि हनुमंत खाड्कन ठिकाणावर आला. करकन ब्रेक दाबून गाडी खडी केली...... उभी केली. अस्ताव्यस्त दैवाला हात लावून पाहिला. जीव जागेवर होता. पण डोक्यातून रक्ताची धार लागली होती. गाडीत घालून थेट अंबाजोगाईचा दवाखाना गाठला. माळवदावरून बायको पडली असे सांगून तिच्यावर उपचार केले. दैवा आठ दिवसात बरी झाली. पण तेव्हापासून तिची नजर बदलली. कोरडी विहीर असावी तशी नजर. खोल, भेदणारी..... पण निर्विकार. बापाने चार दिवस घरी नेले. पण तिचे बोलणे, हसणे पार संपले होते. सासरी आली तरी कुणाशी बोलत नसे. मनात आले तर कामाला हात लावणार. एरवी झोपून राहाणार. नवरा मनातून घाबरला होता. त्याला भय वाटे की हिने जिल्ह्याच्या पोलिस ठाण्यात तक्रार केली तर काही खरे नाही. त्या पोरीस आहे तशी सांभाळावी. पण दैवाने नवऱ्याशी बोलणे साफ तोडले. असे एक वर्ष गेले. एक दिवस हनुमान सुरेखशी साडी, बांगड्या घेऊन आला. येताना मिठाई आणली. बायकोला साडी दिली. दैवाच्या ओठावर फिक्की रेषा चमकून गेली. रात्री हात धरून खोलीत नेले. जवळ घेऊन सांगितले, " दैवा, आपलं नशीब उघडलं. मला बँकेतलं कर्ज मिळतेय. लोन म्हनतात त्याला. बायांच्या नावानं लोन मिळतय. तुज्या नि माज्या दोघांच्या नावावर कर्ज उचलायचंय. आपण नवी गाडी घेऊया. आता दारू पिणं समदी सोडणाराय मी. तुला डागदराकडे नेईन. औषधपाणी करीन. म्होरल्यासाली पाळणा हललाच पाहिजे बघ घरी...... "

दैवाला वाटले जणू आजच लग्न झालेय. गोड गोड बोलणे ....... गोड गोड लाड. दुसऱ्या दिवशी चुलत सासरा, सीताराम काका, हनुमान, त्याचे दोन मित्र नि दैवा तालुक्याला आले. कोणत्याशा हापिसात गेले. तिथला थाट, सूटबूटातली माणसे पाहून दैवांची जीभ पार चिकटून बसली. कोट घातलेल्या सायबानं विचारलं "बाई तुला या कागदावर लिहिलेलं वाचून दाखवलं का?."दैवाची मान खालीच. " व्हय म्याच दाखवलं. मी मानलेला भाऊ हाय बाईचा" हनुमंताचा मित्र बोलला.
"बाई तुमची तक्रार नाही का ?" साहेब.
"............" दैवा.
"हं. करा इथं सही." साहेब.

सही तरीक करता येई. तेवढीच काय ती अक्षर ओळख. समोर कागद. नोटेच्या कागदासारखा करकरीत. वर निळ्या रंगाच्या नितीमित रेघोट्याच की ! काय काय अक्षर लिहिली आहेत, हे कुणाला कळत होतं ? रंगोली काढावी तशी सही करता यायची देवळेच ! पण आज सहीची रंगोलीपण आठवेना. शेवटी साहेब म्हणाले अंगठा लावा बाईचा. दैवाने अंगठा उठवला. सगळे बाहेर आले चुलत सासरे म्हणाले, "हनुमंता, चार दिवस माहेरी नेऊन घालतो पोरीला. पैशे आले की गाडी घेऊ नि मग पोरीला आणू." सासऱ्यांनी माहेरात नेऊन घातले. चापाणी झाले. निघताना दैवाच्या वडिलांचा हात धरून विनवले, " इवाईबुवा तुमची लेक तुमच्या दारात आणून घातली. तिचं काय करायचं ते तुमीच बगा. आताच तालुक्याच्या गावाला काडीमोड घेऊन आलो. तुमची पोर गेलं सालभर येड्यासारखी वागती. बायको असून नसल्यासारखी. माझा पुतन्या तरणा हाय. धडधाकड हाय. त्याला बी संवसार करायची हौस हाय. पन तुमची पोर दगड घेऊन हिंडती... कामाला हात लावीत नाही. हसती तर हसतीच नि रडती तर रडतीच. तवा मान मोकळी करून घेतली आमी. सायबासमूर सही घेतलीया ......."

चुलत सासरा तरातरा निघून गेला. वडील डोक्यावर आभाळातून दगड कोसळावा तसे बघत न्हायले. शुद्ध गेल्यासारखे. आई दाराआडून ऐकत होती. ती भिंतीवर डोकं फोडून घ्यायला लागली. रडायला लागली. थोड्या वेळात गाव जमा झालं. बायाबापड्या, माणसं, लेकरं. दैवा मात्र दगडासारखी निमूट बसून होती. डोळ्यातले पाणी मात्र आटून गेलेले. आता कसे व्हायचं ते ? बाया आईला म्हणत, पोरीला बाधा झाली. कुणालातरी

दाखवा. पण त्यालाही पैसा लागतो. वडील आणि आईचे बोलणे चाले. ही लेक अशी माघारी आली. त्यातून वेड्यागत वागते म्हणून सासऱ्याने आणून घातलेली. धाकट्यांची लग्नं कशी जमायची ? हाच घोर त्यांना जाची. दैवाला सारे कळे. पण वंद ओठ एवढे कुलूपबंद झाले होते की मनात आले तरी ते उघडत नसत. मनातल्या मनातच काय ते बोलायचे. शेवटी एका रात्री मनात वेगळाच विचार आला. पहाटे डबडे घेऊन पांदीकडे गेली ती माघारी परतलीच नाही. साखर कारखान्याजवळ येईस्तो ऊन्हं चांगली भाजायला लागली होती. पाय जड़ावून गेलेले. पोटात भूक. एका झाडाखाली बसली. थकलेल्या जिवाला कधी झोप लागली ते कळलेच नाही. कुणीतरी हलवून उठवीत होते. डोळे उघडले तर एक बाई हाताला धरून हलवीत होती. आणि विचारीत होती, " ए पोरी.. कुणाची हाईस ? कुठं निंगालीस ? पळून चाललीस जनू ? जिकडे तिकडे लायटी चमकायला लागलेल्या अंधार चोहोबाजूंनी भरून आलेला. उरात भीतीचा पूर भरून आला. त्या बाईच्या हाताचा आधार खूप हवासा वाटला.

"चल माय माज्या संग. जेऊन घे. " बाईचा मऊ आवाज. दैवाला धीर आला. तिच्या बरोबर ती शेजारच्या झोपडीत शिरली. आतला थाट वेगळाच होता. मोठा पलंग. जवळ रंगीत टी.व्ही. स्वैपाक घरातली भांडी चकचकीत. दोन तरुण पोरी वेणीफणी करीत होत्या. दैवा सगळीकडे नजर टाकीत पोटभर जेवली. रात्री जाग आली तेव्हा ती बाई कुणाला तरी दबल्या आवाजात सांगत होती. "पोरगी जानजवान हाय. गोरी बी हाय. महिना पंधरा दीस खुराक दिला की दहाजणीत उठून दिसंल. मग बगा एकांदा टरकवाला. भोवनी झाली की तिकडंच जक म्हणावं लाइनीला. मला तामुर दोन हजार रोक पायजेत ......."

दैवाचं मन ऐकता ऐकता थिजून गेलं. पहाट उठून डबा हातात घेऊन संडासला म्हणून गेली. ती झाडझुडपातून लपत छपत सकाळला डांबरी रस्त्याला लागली. हा रस्ता ओळखीचा होता. तालुक्याला जाणारा. ऊन्हं डोक्यावर आली तेव्हा ती कोर्टाच्या दारात उभी होती.

तिने ऐकले होते की कोरटात गेले की बायांना मदत करतात. पण इथे तर नुसती गर्दी. काळे कोट घातलेल्या माणसांची, बायाबापड्यांची नि पुरुषांची. दुपार टळून गेली. संध्याकाळ झाली. कोर्ट बंद झाले. दैवा

समोरच्या धरमशाळेच्या पुढ्यात पदर तोंडावर घेऊन पडून राहिली. दुसऱ्या दिवशी नळावर तोंड धुतले. गट गट पाणी प्याली. आणि परत कोर्टाच्या आवारापुढे थांबली. काल ज्यांनी तिला पाहिले होते त्यांना वेगळीच शंका आली असावी. ते नाव विचारायचे. गुपचूप नोट दिसेल अशी दाखवायचे. पण एक माणूस नरम भेटला आणि ती आमच्या संस्थेत दिलासा घरात आली.

..... दैवानं चहा पिऊन टाकला. मान खाली घालून म्हणाली, "ताई माझं चुकलं. एवढ्यावार माफी द्या. उद्यापासून मी शिवणक्लासला जाईन, समदं करीन."

पण दैवाचं मन संस्थेच्या शिस्तीत रमलं नाही. तिला पाटी पेनसील नकोशी वाटे. सकाळची प्रार्थना तर मुळीच आवडत नसे. "कशाला वं परार्थना ? काय देतो देव ? आन असतो तरी का ? असेल माजा हरी नि देईल खाटल्यातरी असं खेड्यातली मानसं म्हननात. त्यांचा जीव 'हरी हरी' जपण्यात चाललाय. पण हरी देतो का सुख ? देतो आयती भाकर ? कळतं तवापासून मी देवाला दंडवत घालते. काय दिलं त्यानं मला ? घर नि भाकर ? " ती विचारी.

आमच्या दिलासा घरात आल्यापासून जीभ मात्र चांगली वळवळायला लागली होती. ओव्या छान म्हणत असे. माहेर संमेलनात धावण्यात पहिला नंबर पटकावला होता. पण दर दोनचार दिवसांनी झटका येई. मग आरडाओरडा कर, तर कुणाशी वचावचा भांड. लहान लेकरांना - तेही दुसऱ्या बायांच्याच, भरपूर बडवून काढी. अद्वातद्वा शिव्या देई. असले चाळे चालत. शिवणासाठी तर जात नसेच. एक सकाळी दिलासातून ती नाहीशी झाली. आम्ही पोलिसात कळवले. शोधाशोध केली पण तपास लागला नाही.

दिवस जात होते. पण कधी कधी दैवाची आठवण येई नि मन खारे होई. आपण या पोरीच्या मनाला दिलासा देऊ शकलो नाही. तिची समजूत घालू शकलो नाही याची खंत मनाला टोचत राही. नवऱ्याने तर दुसरे लग्न केले होते. बापाने गाव सोडून मुंबईचा रस्ता धरला होता.

एक दिवस संस्थेतला ड्रायव्हर सांगत आला. " ताई परवा दैवा दिसली होती. पंजाबी ड्रेस होता अंगावर. मांजरसुंभ्याजवळच्या हॉटेलात

चहा प्यायला थांबलो तर, आत ही. आम्हाला पाहून जी आत गेली ती बाहेरच आली नाही. ती बसस्थानकावरची बाई, मागं पोलिसांनी हाकलली नव्हती का ? तिनंच मांजरसुंब्यात ढाबा खोलला आहे. दैवाची लिखितं रहाते जणू ..... जाऊ दे. ज्याचं नशीब त्याच्या बरोबर." असं म्हणत ड्रायव्हरने उसासा टाकला नि तो कामाला लागला.

दैवाला मानसोपचार तज्ज्ञाला दाखविण्याचे आम्ही ठरवले होते. एका प्रकरणाच्या बाबतीत आम्ही त्या मुलीच्या पालकांना नांदेडच्या मानसोपचार तज्ज्ञांकडे पाठवले होते आणि त्यांच्या उपचारांचा योग्य परिणामही झाला. ती मुलगी परत नवऱ्याकडे नांदण्यास गेली नाही. तशी अपेक्षा नव्हती. पण तिने स्वतःच्या चिमुकल्या मुलीवर राग काढू नये, तिला सतत मारू नये आणि स्वतः काही उद्योग करावा ही पालकांची इच्छा होती. दोन वर्षांची असताना संस्थेत दाखल झालेली ती छकुडी आता पाचवीत शिकते आहे. तिची आई छोटेसे दुकान चालवते. भावाच्या व आईच्या मदतीने स्वतंत्रपणे प्रपंच चालवते. दैवाने आम्हाला संधीच दिली नाही. जर तिलाही अशा तऱ्हेचे उपचार मिळाले असते तर कदाचित ती अशा तऱ्हेच्या व्यवसायात अडकली नसती. पण असेही मनात येतं, स्त्रियांनाही शारीरिक स्तरावरील इच्छा आकांक्षा असतात. तरुण वयात त्या बळावतात. त्यातून समागम सुखाचा अनुभव घेतलेल्या तरुण परित्यक्तांना शारीरिक भावनांतून होणारी घुसमट अधिक त्रासदायक होते. मनस्विनीसारख्या संस्था आर्थिक पुनर्वसन सहजतेने करू शकतात. पण अशा स्त्रियांचे भावनिक पुनर्वसन कसे करायचे ? हा प्रश्न नेहमीच अस्वस्थ करतो. आणि या प्रश्नाविषयी खुलेपणाने बोलणे संस्थेच्या दृष्टीने अनेकांना धोक्याचे आणि गैरसोयीचे वाटते. ग्रामीण परिसरात परित्यक्त स्त्रियांसाठी काम करणे ही जणू एक परीक्षाच. दाटलेली संध्याकाळ. भणाणणारे वारे. दिवली पदराआड झाकून पल्याड न्यायची आहे. दिवली विझता कामा नाही नि पदरही जळता कामा नाही.

ही एक दैवा आम्हाला माहीत झाली म्हणून ! अशा हजारो 'दैवा' घर ... आपलं घर शोधताहेत ! त्यांना मिळेल का घर ? की रस्त्या .. रस्त्यावरचे ढाबे..., चहाची दुकाने..., हॉटेलंच त्यांनी सजवायची ? त्यांचे दैव कुणाच्या हाती ?

# तीन गज की ओढनी....

वयाची पन्नाशी उलटून गेली तरी माहेरच्या दिशेने ओढ घेणारे मन कधीच वयस्क होत नाही. आईवडिलांच्या निर्व्याज प्रेमाची शाल .. त्यांचा सहवास पन्नाशी उलटेपर्यंत लाभला. तर, माथ्यावरचे केस चंदेरी झाले तरी अंगभर बालपण हुंदडत रहाते. मी त्या बाबतीत भाग्याची . कालपरवापर्यंत आई-पपा होते. त्यांना भेटायला धुळ्याला जाताना, निरवीच्या तलावाभोवतालचा हिरवा डोंगर लागला की माझे मन थेट घराच्या पायऱ्या चढत असे. भर उन्हाळ्यातही खानदेशी गरम वारे तनामनातला वसंत फुलवीत. आई खूप आजारी होती. मी फक्तच तिथे पोचले. चार दिवस निवांतपणे राहिले. आता माहेरी गेले की बाजारात भटकणे आलेच. बॉम्बे कटपीस सेंटर हे आमचे गेल्या २०/२५ वर्षांपासूनचे लाडके दुकान. तिथे जाऊन तऱ्हेतऱ्हेच्या कापडांचे तुकडे सरकवण्यात नि त्यातून हवे ते तुकडे निवडण्यात दोन तास दहा मिनिटांगत अपुरे पडत. त्याही दिवशी पाय त्या दुकानाकडे वळले. पण दुकानाचा बाज आता पार बदलला होता. कटपीसचे दुकान एका तुकड्यात बसवले होते आणि उरलेल्या मोठ्या भागात तयार कपड्यांचा देखणा विभाग थाटात उभा होता. सुरेख झगे दिसले म्हणून आत शिरले. एक झगा न्याहाळते आहे तोच खूप आनंदाने रसरसलेली हाक ऐकू आली. 'भाभी !! दीदी !! तुमी ? कधी आलात ?..' माहेरच्या अंगणात मला भाभी म्हणणारी कोण असा विचार करीत आवाजाच्या दिशेने नजर टाकली तर काजळभरल्या डोळ्यांची टवटवीत नंदा मला हाक देत होती. काही उमजायच्या आत धावत येऊन कडकडून भेटलीही नि तेवढ्या गर्दीत 'पाँव लागू' ही झाले. मग अंबाजोगाईतील सर्वांची खुशाली विचारली. नंदाच्या आवाजातला नम्र गोडवा खूप खूप दिवसांनी ऐकायला मिळत होता. तोच गोडवा दुकानाच्या मालकांना विचारीत होता.

' पिताजी, या भाभी, माझ्या दीदी पण, अंबाजोगाईतल्या भाभी. यांच्याच संस्थेत मी शिवण, भरतकाम, पिको..फॉल लावायला शिकले. आपले वकील आहेत ना, प्रकाश भाऊ? त्यांची मोठी बहीण. मी त्यांना घरी नेऊन आणते. तासभर सुट्टी देता ? संध्याकाळी जास्त थांबेन ?' आता कोणते पिताजी या भावूक विनंतीला नकार देणार ?

सुमारे पांच वर्षांपूर्वीची गोष्ट. धुळ्याहून, तेथील महिला संस्थेस,

त्यावेळी सहकार्य करणाऱ्या वकील महिलेचे . पत्र आले होते. नंदा नावाच्या तीन चिमुकल्यांची आई असलेल्या परित्यक्तेला, शिवण प्रशिक्षणासाठी दिलासा घरात प्रवेश हवा होता. धाकट्या मुलाला घेऊन ती येणार होती. स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारांविरुद्ध जीव झोकून काम करणाऱ्या विजयाताईंच्या संस्थेतून येणारी महिला नक्कीच अडचणीत असणार. तिला पाठवून देण्याबाबत तात्काळ पत्र पाठवले. एका संध्याकाळी नंदा छोट्या केतनसह दिलासा घरात दाखल झाली.

नंदा जेमतेम पाच फूट उंचीची. नाजूक चणीची. मासोळीच्या आकाराचे बाणेदार डोळे. भांगात सिंदूराची ठाशीव सरळ रेघ. माथ्यावर पदर. पायात छमछमणाऱ्या घुंगराच्या बिछड्या म्हणजे जोडवी. बोलण्या-चालण्यात नखऱ्याचा अदृश्य ठेका.

'प्रणाम दीदी. माधुरीताईने लेटर दिया है. घरमे सब खुशहाल है. केतन दीदी को प्रणाम करो..' असं म्हणत तिने केतनला माझ्या पायावर आडवा घातला. गंगामावशीला प्रणाम केला. नंदाच्या बोलण्यातला गोडवा पहिल्या क्षणीच सर्वांना भावून गेला. प्रत्येक प्रांताचे, भाषेचे, समाजाचे काही पारंपारिक वेगळेपण असते. नंदाच्या वागण्याबोलण्यातून ते जाणवत असे.

धुळ्याच्या सातव्या गल्लीतील हनुमान मंदिराचे पुजारीपण परंपरेने तिच्या वडिलांकडे आले होते. मंदिराच्या भवताली गुजराथी मारवाडी समाजाची वस्ती. भाविक लोक देवाला रोज काही ना काही उपहार चढवीत. सणवार, व्रतांची उद्यापने यासाठी सन्मानाने जेवायला बोलवीत. नेहमीच गोडाधोडाचे जेवण, चांगले कपडे आणि पुजारीबाबांची मुलगी म्हणून चारजणीत विशेष मान. तिला पूजापाठ सांगता येत असे. कोणत्या विधीसाठी काय सामान लागते ते माहीत असे. स्तोत्रं सुरेख म्हणत असे. लग्नात वा इतर संस्काराचे वेळी म्हणायची गाणी येत. ती सातवीत असतानाच नहाण आले. पुजारीबाबांनी जावई शोधण्याची मोहीम सुरू केली. मुळात पुजारीपण करणाऱ्यांची जात लहान. खात्यापित्या घरी लेक जावी हा आईचा हेका. सुरतेच्या पुराणिकांच्या घरातल्या धाकट्या मुलाशी -जीवनधरशी- नंदाचा विवाह झाला. साल होतं १९८१. जीवनधर १० वी पास होता. हिऱ्यांना पैलू पाडण्याच्या कारागिरीत तरबेज होता. दिवसाला ऐंशी नव्वद रुपये मिळत. नंदा दिसण्यात गोड. नवरा नव्या नवरीचे भरपूर लाड करी. तऱ्हेतऱ्हेच्या

साड्या, डोवंयाच्या पिना, बांगड्या यांची खैरात तशी. वयाच्या सोळाव्या वर्षीच नंदा आई झाली. लग्नानंतर अवघ्या पाच वर्षात दोन मुली नि धाकट्या केतनला जन्म दिला.

दर बाळंतपणात शरीर थकत गेले. लहान मुलांकडे लक्ष देण्यात आणि घरकामात ती एवढी अडकून जाई की; नवऱ्यामुळे नवऱ्याकडे लक्ष द्यायला वेळच उरत नसे. घर आणि मुलं यांची देखभाल करण्यात जीव इतका गळून.. थकून जाई. मग जीवनधरच्या हौशीमौजीत सहभागी होण्याचा उत्साह येणार तरी कुठून ? मग चिडचिड, रुसवेफुगवे, रडारड, भांडणे. त्यातूनच हाणामारी सुरू झाली. जीवनधरला पत्ते आणि दारूची चटक लागली. तो शुद्धीवर असला की नीट वागत असे. पण अशी वेळ कमीच. नंदाची मोठी जाऊ म्हणजे तिची सख्खी मोठी वहीण. तिच्या नवऱ्याने धाकट्या भावाला वळणीवर आणण्याचा प्रयत्न केला. वेगळे घर केले तर संसाराची जबाबदारी उचलावी लागेल आणि मग घरात गुंतेल. वाईटचे नाद आपोआप कमी होतील असे वाटले. पण वेगळे घर केल्यापासून नंदाचे हाल अधिकच वाढले. जुगाराबरोबर दुसराही नाद लागला. घरातले दागिने नाहीसे होऊ लागले. जीवनधर घटस्फोटाची भाषा बोलू लागला. नंदाने राजीखुशीने सही न दिली तर मुलांसह नंदाला मारून टाकण्याचे बेत तो बोलू लागला. स्वतःच्या मुलांच्या जीवाला धोका पत्करण्याची तयारी कोणती आई दाखवेल ? नंदाच्याच भाषेत सांगायचे तर ते असे.

"अपने पतीको वेश्याके घर तक सन्मानसे ले जाने वाली पतिव्रता या अपने लाडले बेटे को मारकर उसकी सागुती अतिथीके लिये बना नेवाली आदर्श गृहिणी पौराणिक किताबोंमेही होती है. स्वतःच्या नवऱ्याला वेश्येच्या दारात नेऊन घालणारी पतिव्रता पत्नी आणि अतिथीला पोटच्या लेकरांची भाजी करून खाऊ घालणारी आदर्श गृहिणी पुराणातल्या गोष्टीतच भेटतात. त्या 'माणूस' नसतातच. पण माणसाचे शरीर धारण करणाऱ्या आम्ही. त्यांनी कसे अनुकरण करायचे ? नि का करायचे ? "

नंदा व तिच्या वहिणीने विचारपूर्वक निर्णय घेतला. मोठ्या मुलीला सांभाळण्याची जबाबदारी बहिणीने घेतली. धाकटा केतन आणि मधली वैशाली यांना घेऊन नंदा धुळ्याला आली. नंदाने नवऱ्याचे घर सोडून कायमचे माहेरी येणे वडिलांना पटले नाही. परंतु भाऊ आणि आई यांनी

तिची बाजू उचलून धरली. वडिलांनी जावयाला पण पाठवून चार समजुतीच्या गोष्टी सांगितल्या. नंदाच्या भावाला त्याला आणण्यासाठी सुरतेला पाठवले. पण जावयाला पैशाची धुंदी चढली होती. तो दुसऱ्या लग्नाची भाषा अधिक जोरात बोलू लागला.

नंदा सातवीपर्यंत शिकलेली होती. समज चांगली होती. स्वतःच्या पायावर उभे राहून मुलांना शिक्षण द्यावे असे तिला मनापासून वाटे. हिऱ्यांना पैलू पाडणाऱ्या कारागिरांबद्दल तिला सहानुभूती वाटे. ती म्हणे, हिऱ्याला पैलू पाडणाऱ्यांना पैसा भरपूर मिळतो. पण त्या माणसाचे डोळे अर्ध्या वयातच निकामी होतात. ऐन चाळिशीत अनेकजणांना धंद्यातून बाहेर पडावे लागते. पैसा आला की बारा वाटांनी निघून जातो. वाईट सवयी पैशाच्या नादाने लागतात. मग त्यांच्या मुलांनाही तरुण वयात शिक्षण सोडून वडिलांच्या धंद्यात पडावे लागते. तिला आपल्या मुलांना या धंद्यापासून दूर ठेवायचे होते.

धुळ्यात आल्यावर विजयाताई चौकांबद्दल तिने ऐकले. ती त्यांना भेटली. त्यांना सहकार्य करणाऱ्या वकील ताईंना ती भेटली. वडिलांच्या आटोकाट प्रयत्नांमुळे जीवनधर एकदा धुळ्याला गेला. पण त्याला दुसरीशी लग्न करायचे होते. नंदाने घटस्फोटाला मान्यता दिली तरच तो मुलांच्या नावाने दोन पाच हजार बँकेत ठेवणार होता. अर्थात नंदाने व तिच्या भावाने त्याला नकार दिला. पाचसहा महिने धुळ्यात माहेरी काढल्यावर नंदाही खूप अस्वस्थ झाली. तिची अडचण सामाजिक आणि मानसिक होती. भोवताली व्यापाऱ्यांची वस्ती. स्त्रियांना पुढच्या बैठकीत येण्याची परवानगी नसे. बहुदा तिथे दुकान थाटलेले असे. तिथे जाण्याचा प्रसंग दिवाळीत लक्ष्मीपूजनाच्या निमित्ताने येणार. सुनांना तर हातभर घुंगट काढून तिथे जाता येई. लेकींची बात मात्र न्यारी. त्यांना कुठेही प्रवेश असे. त्याही सहामासी चार दिवस येत. माहेरी मनाभरून श्वास घेऊन परत सासरी जात. तर असे हे भोवताली वातावरण. घरातल्या स्त्रियांना मोकळेपणी जाता येण्यासारखे ठिकाण म्हणजे हनुमान मंदिर. घरात भांड्याला भांडे लागून आवाज होणारच. असे आवाज झाले की सासवा नाहीतर सुना नंदाच्या आईकडे येत. निमित्त मंदिरात जाण्याचे. तिथे चार घरच्या चार जणी जमत. गप्पा रंगत. अर्थात गप्पा घराच्या चौकटीतल्या. हिने हे केले, तिने ते केले. ही अशी, ती तशी. कुणाचे सासरी पटत नाही, कुणाच्या नवऱ्याचं लफडं कुठे आहे. वगैरे..वगैरे. अशा वातावरणात नंदा माहेरी चार महिने राहताच, आडून विचारणे सुरू झाले. "इता दिन क्यान रख्या ससुरालवालोंने ?.. ठिक

तो चाल्यो हो ना ?''

हा प्रश्न अनेकांच्या तोंडून येण्याआधीच नंदाने चारसहा महिन्यासाठी एखादा व्यवसाय शिकण्यासाठी इतरत्र जाण्याची इच्छा विजयाताई चौकांकडे व्यक्त केली. आणि त्यांनीच तिला मनास्विनी महिला प्रकल्पाच्या दिलासा घरात केतनसह पाठविण्याचा निर्णय घेतला. तिच्या केतनची जीभ थोडी जड होती. ऐकू चांगले येत असे. त्यामुळेच तो चांगले बोलू शकेल अशी आशा वाटे. केतनला उपचार करण्यासाठी परगावी नेले आहे अशी हूल उठवून नंदा अंबाजोगाईत पोचली.

आल्या दिवसापासून ती सर्वांच्याच मनात शिरली. ती आली त्याच वेळी संस्थेच्या स्वयंपाकघरात डिझेल आणि लाकडाच्या तुकड्यांपासून तयार होणाऱ्या गॅसवर चालणारी शेगडी आणली होती. लाकडाचे तुकडे तयार करण्याच्या हात यंत्रावर काम करण्यास दिलासातील महिला तयार नसत. खरे तर ते काम युक्तीचे होते. शक्तीची गरज नसे. पण युक्ती समजावून घ्यायला लागते. त्यासाठी मन स्थिर ठेवावे लागते. ठेंगणी नंदा हे काम हौशीने आणि सफाईने करी. फॉल लावणे, पिको करणे हे काम ती सहजपणे शिकली. शिवणकाम, भरतकामात तरबेज झाली. केतनला जिभेसाठी डॉक्टरांनी विशिष्ट व्यायाम सांगितला होता. तसेच ठराविक जागी चोळायला सांगितले होते. नंदा हे सारे नियमितपणे करी. केवळ केतनकडेच नाही तर दिलासातील इतर महिलांच्या मुलांकडे ती लक्ष देई. उजव्या हाताने न सांडता, एका जागी बसून जेवावे. संडासात शी करावी. हात साबणाने धुवून पुसावेत. जेवणात पालेभाजी, कोशिंबीर, उसळी असाव्यात यावर तिचा भर असे. यामागचे कारण एकच. वर्तमानपत्र, मासिके, पुस्तके वाचण्याचा नाद. गाण्यात तर एकदम तरबेज. राजस्थानी, गुजराती लोकगीते छान म्हणायची. मराठी बोलताना अडखळे. पण हिंदी मात्र विलक्षण गोडव्याने बोले. आणि त्यामुळेच तिला मराठी गाण्यांपेक्षा ''तीन गज की ओढनी'' हे गाणे फार आवडे. दर बुधवारी महिलांच्या बैठकीत हे गाणे म्हटले जाणारच.

... तीन गज की ओढनी,<br>
ओढनी के कोने चार, चार दिशाओंका संसार .....

बाईचे सारे आयुष्य ३ वारांच्या ओढणीत बांधलेले. चार दिशा सुद्धा ओढणीच्या घुंगटातूनचं दिसणार. घुंगटातली घूटन ..... गुदमर बाईच्याच वाट्याला.

कोठरी के चार कोने
हर दो कोने बीच दिवार ... ऽऽऽ

दिवार बना है घूंगट
घूँगट भीतर घूटन
घूटन भरी है जिंदगी - .....ऽऽऽ

ओढनी है जिंदगी
जिंदगी है ओढनी
ओढनी .... जिंदगी .....ऽऽऽ

हे गीत गातांना प्रत्येक कडव्यानंतर अत्यन्त उदास .. करुण स्वरातले उकार असत. गाता गाता नंदाचे डोळे वाहायला लागत. एवढे वाईट वाटतें, दुःख होतें तर कशाला हे गाणे म्हणायचे ? असे मी म्हणताच मला नंदाने उत्तर दिले होते, " भाभी, हे गाणं म्हणताना विहिरीला पाण्याचे फुटवे फुटतात ना तसे डोळ्यातून पाणी वाहाते. पण त्यामुळे मन खूप शांत होते. काही नवे करण्याची इच्छा पण जागी होते. "

आजही खिचडी करतांना मम्मीला नंदा आठवतेच. तिच्या खिचडीत वांगी किं बटाटे असणारच. कढीसाठी पीठ दळून आणताना त्यात पसाभर उडीदडाणे किं वाटीभर धणे भाजून घालणारच. शिवाय फोडणीत चार मेथीदाणे टाकायला तिनेच नकळत शिकविले.

नंदा दिलासात असतांनाच जीवनधरचे पत्र आले. पहिल्या वाक्यातच " आय लव्ह यू, डू यू लव्ह मी ?" असा प्रश्न होता. नंदाची समजूत घालण्याचा त्यात प्रयत्न होता.. दुसरी बाई सोडून गेली होती. मुलाला भेटण्याची आग्रही विनंती पत्रात होती. पण त्यातील एकाही अक्षराने नंदा विचलित झाली नाही. ती म्हणे की मी गेली ८ वर्षे या थापांना भुलले. जिवावर दगड ठेवून, मुलांच्या भल्यासाठी घराबाहेर पडले. त्याला यायचेच असेल तर

धुळ्यात यावे. आणि नंदाच्या कुटुंबात.... घरात रहावे. कामधंदा करावा, दारू, जुगार, पत्ते चालणार नाही. आता घर नंदाचे, तिच्या मुलाचे असेल. ही तिची ठाम भूमिका होती.

ज्येष्ठी पौर्णिमेस नंदाचा उपास होता.मी न राहवून विचारलेच. "नंदा, आम्हाला पत्ता न लागू देता वटसावित्रीचा उपवास करतेस. करतो चौथ तेरलीस. तीजेला पिंडी करून, केळाच्या हाताने तो कापून सर्वांना देतेस. मग जीवनाधारकडे जायचे नाही असे का म्हणतेस ? "......मी विचारले.

दिलासा घरात येईपर्यंत नवऱ्याच्या जाचाला आणि माराला कंटाळलेल्या मनातही 'पती हाच परमेश्वर' हे वाक्य गोंदलेले होते. माझी बाई मला इथे येईपर्यंत जतावून सांगत होती की, नंदू तुझ्या पतीची बुद्धी काही काळापुरती फिरली आहे. पण हनुमानजी त्याला परत ठिकाणावर आणतील. तुझा परमेश्वर पतीच. त्याला दुवा देत जा. मला कळायला लागले तेंव्हापासून, पती हाच देव आणि त्याच्या दारात, पती आगोदर मरणारी बाई सर्वात भाग्यवान हेच ऐकलेले. जोरात बोलले वा दणदण पाय वाजवीत चालले की बाई ओरडे....ए हलक्या आवाजात बोल. सासरी अशी वागलीस तर आमची अब्रू बाहेर टांगशील.... पापड आवाज न करता, तोंडातल्या तोंडात खायचा. शिळी भाकरी आवडीने खायची. जाता येता खायचे नाही. या साऱ्या गोष्टी तिने लहानपणापासून शिकवल्या. थेंबभर दुधाचा चहा अधूनमधून प्यायला लावी. का तर सासरच्या हालांची आताच सवय व्हावी.

.....मेंदूचा डबा बुरशीशी भरलेला असतानाच झाकण गच्च बसवून टाकले. तो डबा कधी भरलाच नाही. पण इथे दिलासात आल्यापासून क्षणोक्षणी विचार करायला शिकले. मोर्चात सामील झाले. जगात काय घडतंय, देशात काय घडतंय हे वाचण्याची संधी मिळाली. मला वाचनाची खूप आवड. पण पुडीचा कागद वाचू लागले तरी पिताजी रागवत. शिकलेल्या बाईचा संसार चांगला होत नाही असे ते म्हणत. पण इथे आल्यावर मेंदूच्या डब्याचे झाकण कधी मोकळे झाले आणि उघडले ते कळलंच नाही. माझ्यापेक्षाही दुःखी, अडचणींना व अत्याचारांना बळी पडलेल्या मैत्रिणी भेटल्या. त्यांच्याकडे पाहून माझे दुःख फिके वाटू लागले. आहे त्या परिस्थितीला तोंड देण्याची हिंमत माझ्यात आली. स्वतःच्या कष्टाने घर

उभारण्याची जिद्द उभारली.

.... पण तरीही ... भाभी, लहान वयात झालेले संस्कार... तेव्हा मिळालेली शिकवणूक अंगावर उठलेल्या फोडांसारखी असते. फोड फुटून बरा झाला तरी डाग कायमचे राहतात. मनाला कितीही पटले तरी व्रत वा उपवास केल्याशिवाय अंघोळ केल्यासारखे वाटत नाही. भाभी, कुणी सांगावं, आणखीन पाचदहा वर्षांनी हे डागही साफ होतील.

एवढे रामायण घडून गेल्यावर, मी जेव्हा नव्याने घर उभारीन ते माझे नि मुलांचेच असणार. मुलांच्या पप्पांनी यायचे तर जरूर यावं. पण, माझ्या घराच्या चौकटी मानून करून. एकोणनव्वदच्या अखेरीस आलेली नंदा नव्वदच्या ऑगस्ट मध्ये बोलणाऱ्या केतनला घेऊन माघारी धुळ्याला गेली. आज तिचे घर उभे आहे. जीवनधरला त्या घराच्या भिंती भावल्या नाहीत. तो त्या घरात आला नाही. आज नंदा दुकानात काम करते. उरलेल्या वेळात फॉल पिकोचे काम करते. अधूनमधून पत्र येते. त्यात लिहिलेले असते,

"मेरा और केतन का ऑल मानवलोक फॅमिली को धुलीया से अंबाजोगाई तक साष्टांग प्रणाम पहुँचे. मेरे घर आना.

तीच मे है टेबल, आजू बाजू मे गुलदस्ते
खत लिखना समाप्त हुआ, फिरसे कहेती नमस्ते...."

आपकीही नंदा.

नंदासारख्या हजारो... लाखोजणी. ओढणीच्या घूंघटामध्ये गुदमरणाऱ्या. त्यांना त्यांचे घर, जे त्यांच्या जोडीदाराचेही असेल, ते कधी मिळणार ?

मानवलोक समाज विज्ञान महाविद्यालय
ग्रंथालय
अंबाजोगाई-४३१५१७, जि.बीड

# नवीन बालवाङ्मय

**पंचतंत्राच्या गोष्टी**
बाबा भांड

*

**गोष्ट एका चपलेची**
बाबा भांड

*

**अवि आणि मीना**
प्रा. म. सु. पगारे

*

**अवघा धरू सुपंथ**
दत्तात्रय हरदास

*

**चतुर माळी अमृता**
प्र. रा. बोरकर

*

**एक होता विदूषक**
टी. आर. गुरव

*

**फसगत**
विनीता पिंपरखरे

*

**टिट्टू**
धारा भांड